म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
अ. नं. २०५४
१९८८

# काव्यमय टिळक

म्हणजेच

## टिळकविषयक काव्यसंग्रह

★

संकलक व संपादक

काव्यतीर्थ का. र. वैशंपायन,
येवलें

प्रकाशक

केसरी-मराठा संस्था, पुणें

REFBK-0006912

१९४७

मूल्य २॥ रुपये

# मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

संग्रहालय/वाचनालय शाखा.

अनुक्रम नं. ३८२ | विभाग काव्य | क्रमांक २

पुस्तकाचें नांव काव्यमय टिळक

लेखक का. र. वैशंपायन

सूचना—पुस्तक आठ दिवसांवर ठेवूं नका. पुस्तकाची खराबी करूं नका.

२ता. १२-२९

शिल्लक वा. २

REFBK-0006912

# काव्यमय टिळक

म्हणजेच

# टिळकविषयक काव्यसंग्रह

संकलक व संपादक

काव्यतीर्थ का. र. वैशंपायन,
येवलें

प्रकाशक

केसरी-मराठा संस्था, पुणें

१९४७

मूल्य २॥ रुपये

प्रकाशक

आ. रा. भट, एम्. कॉम्., व्यवस्थापक, केसरी-मराठा संस्था, ५६८ नारायण, पुणें २

मुद्रक

आ. रा. भट, एम. कॉम., केसरी मुद्रणालय, ५६८ नारायण, पुणें २



कै. लोकमान्य बाळ गंगाधर टिळक

# टिळकवाङ्मयप्रसिद्धीचा शेवटचा गोड घांस

केसरी संस्थेनें लो. टिळकांच्या 'केसरी'मधील लेखांचे चार खंड आणि त्यांच्या १९०८ च्या पूर्वीच्या व्याख्यानांचा संग्रह यापूर्वी प्रसिद्ध केला आहे. ज्ञानदृष्टीनें टिळकांना पुढील पिढ्यांत जे पाहूं इच्छितात त्यांना गीतारहस्य आणि त्यांचे लेख व भाषणें यांचें साधन उपलब्ध आहे. श्री. बापट यांनीं प्रसिद्ध केलेल्या आठवणींमधून चालतें-बोलतें अनेकांगी टिळक-जीवन एखाद्या चित्रपटाप्रमाणें मनश्चक्षूपुढें उभें राहतें. वेदाभ्यासी आणि संशोधक टिळकांचें स्वरूप ' आर्क्टिक होम ', 'ओरायन' व ' वेदिक क्रॉनॉलजी ' या पुस्तकांमधून दिसतें. टिळक स्वतः कवि नव्हते आणि काव्यविषयाची मोठीशी आवड असणारेहि ते नव्हते हें खरें. पण त्यांचें चरित्र ते जीवमान असतां आणि नंतरहि अनेक वर्षें अनेक कवींच्या प्रतिभेला जागृत करणारें ठरलें. कवींनीं टिळकांकडे पाहिलें ते गुणग्राहक नि कृतज्ञ अशा भक्तिभावानें. चरित्रलेखक जो चरित्रांश विस्तृत गद्यामध्यें मांडतो तो अंश कवि आपल्या रसग्राहक दृष्टीनें पद्यामध्यें आणतो. टिळकांच्यासंबंधीं कविता १८९६ ते १९४६ पर्यंत होत होत्या. त्यांत १९०८ आणि १९२० या दोन प्रसंगांत त्यांना विशेष आणि करुणरसपर भरती आली. त्यांत इंदूर, बडोदें, नागपूर येथपासून कर्नाटकापर्यंत अनेक आबालवृद्ध महाराष्ट्रियांनीं आपली कवित्व-शक्ति लोकमान्यस्मरणानें नि वर्णनानें पावन करून घेतली. त्यांमध्यें स्वातंत्र्य-वीर सावरकर, सेनापति बापट यांच्यासारखे क्रांतिवादी राजकारणी आहेत; विद्वान, शास्त्रीपुराणिक आहेत; आणि टेकाडे, गोविंदाग्रज, गोविंद, तांबे, तिवारी, मुकुंदराय, अज्ञातवासी, माडखोलकर इत्यादि कवीहि आहेत. संस्कृत कविता करणारांमध्यें हा संग्रह संकलित करण्याचें काम आस्थेनें करणारे श्री. वैशंपायन, हे स्वतः आणि विद्यावाचस्पति राशिवडेकर, आत्मारामशास्त्री ओडलमने, बागेवाडीकर, करमरकरशास्त्री, लोकनायक अणे, सेनापति बापट इत्यादि ठळक विद्वान् आहेत. तसेंच लोकमान्यविषयक शेंकडो कवितांतून

निवडून काढलेल्या या संग्रहामध्यें मराठींतील अनेक वृत्तें, अभंग, ओव्या, मेळ्यांतील पद्यें, भूपाळी, आरती, पोवाडा इत्यादि सर्व प्रकार दिसून येतात. टिळकविषयक हा काव्यसंग्रह एकंदर महाराष्ट्रांतील गुणग्राहक विद्वत्तेचा आणि कवित्वशक्तीचा प्रातिनिधिक असा झाला आहे. यांपैकीं बहुतेक कवि आणि विद्वान् यांनीं प्रत्यक्ष लोकमान्यांना पाहिलेलें होतें. पण यामध्यें ज्यांना लोकमान्यांचें प्रत्यक्ष दर्शन झालें नाहीं अशांनीं त्यांचें चरित्र वाचून किंवा प्रतिमा पाहून स्फुरलेली कविताहि आहे.

टिळक-जीवनाचा काव्यसृष्टींत येणारा भाग म्हणजे त्यांचे उत्कट गुण, त्यांच्या आयुष्यांतील परीक्षेचे प्रसंग, राष्ट्रावरील त्यांचे उपकार, जनतेला वाटणारी कृतज्ञताबुद्धि व भक्ति, तेजस्वी चारित्र्य, स्वार्थत्याग आणि लोकसंग्रह या गोष्टी होत. टिळकज्ञान गीता-रहस्यानें होईल, टिळक-कर्माचा परिचय त्यांच्या लहानमोठ्या चरित्रग्रंथांवरून होईल, तसेंच महाराष्ट्रांतील दोन-तीन पिढ्यांनीं टिळकांवर जी निस्सीम भक्ति केली, तिचें सर्वांगीण दर्शन या काव्यसंग्रहानें होईल. भक्तिमार्गाच्या प्रकरणाला टिळकांनीं आपल्या गीतारहस्यांत 'शेवटचा गोड घांस' असें नांव दिलें आहे. तद्वतच केसरी-मराठा संस्थेचें हें प्रकाशन म्हणजे टिळक-विषयक वाङ्मय-प्रसिद्धीचा शेवटचा गोड घांस आहे. या संग्रहाचें संकलन करण्यास काव्यतीर्थ का. र. वैशंपायन यांच्यासारखे अभ्यासी टिळक-भक्त आणि काव्यमर्मज्ञ लाभले, यामुळें हा संग्रह प्रातिनिधिक आणि उच्च श्रेणीचा झालेला आहे. तो महाराष्ट्रांतील टिळक-भक्तांना प्रिय होईल अशी आशा आहे.

पुणें,
दि. २३–११–४७

**ग. वि. केतकर**
विश्वस्त, केसरी-मराठा संस्था

# संकलकाचें निवेदन

**नरस्तुती वर्ज्य सदा करावी ।**
**गुणस्तुती सार्थ परी करावी ॥** ( स्वकृत )

" स्तुति देवाची करावी; मनुष्याची स्तुति वृथा करूं नये " असें जुनें सुभाषित आहे. त्याचा भावार्थ लक्षांत घेऊन मी एक सुभाषित माझ्या नाशिकच्या एका थोर मित्राच्या सन्मानप्रसंगीं रचलें होतें, त्यांतील आवश्यक चरणें दिलीं आहेत. ईश्वराची स्तुति आस्तिक्य बुद्धि निर्माण झाल्यापासून आजवर पृथ्वीच्या पाठीवरील मनुष्यें करीत आलीं आहेत व ती बुद्धि कायम राहिली तर भविष्यकाळांतहि ईशस्तुति होत राहील. 'एका'ची अनेकांनीं स्तुति करण्याची ही प्रथा परमेश्वराच्या बाबतींत जशी आहे, तशीच ती ईश्वराचे अवतार म्हणून ज्यांना मानिलें जातें, त्यांच्या बाबतीं-तहि आहे. दशावतारांत श्रीराम व श्रीकृष्ण यांच्या स्तुतिपर असंख्य काव्यें आहेत. वाल्मीकि कवीचें रामायण व व्यास महर्षींचें महाभारत हीं तर स्तुति-गौरवाचीं ठसठशीत उदाहरणें आहेत.

धार्मिक पंथांत संस्थापकांचे व गुरूंचे गुणगौरव धर्मानुयायी करीत असतात. त्यांत एक पवित्र भावना व बहुतांशीं आंधळी श्रद्धा कारणीभूत असते. सांप्रत ती अंधश्रद्धा राजकारणांतहि स्वैर वावरूं लाग-ल्यानें स्तुत्य व्यक्तींच्या गुणांचें सम्यक् ज्ञान होत नाहीं. पण कांहीं असो अलौकिकत्वाची मूळ कल्पनाच व्यक्तिस्तुतीच्या बुडाशीं आहे. एकावर अनेकांनीं काव्यें लिहणें याचा अर्थ तो एक ईश्वरी अंश आहे अशी कवीची कल्पना होय. लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांजवरील हा कवितासंग्रह लोकमान्यांचें अवतारित्व अल्पांशानें कां होईना व्यक्त करीत आहे.

'एकावर' अनेकांनीं लिहिलेल्या काव्यांत संकलन करतांना एक गोष्ट प्रामुख्यानें ध्यानांत येते ती ही कीं, ग्रंथनिर्णयाच्या सहा कसोट्यांपैकीं 'अभ्यास' अपरिहार्य होतो. परंतु काव्य म्हणजे वेदाभ्यासजडाचा प्रांत

नव्हे. काव्यांत कठोर तर्काला वावरणें अशक्य होतें. हळुवार हातानें हलवलेल्या वेलीवरून पडलेल्या प्राजक्तांच्या फुलांचा सडा काव्यांत हवा असतो. जसा कवीचा हात तसा त्यांतील आकर्षकपणा. कवीनें लिहावें व रसिकांनीं डोलावें; लतेनें फुलावें व समीरणानें सुगंध दरवळून द्यावा !

लोकमान्य टिळकांवरील प्रस्तुत काव्यसंग्रहांत जेवढ्या कवितांचा समावेश करतां आला तितका मुक्तहस्तानें केला आहे. लोकमान्यांवर प्रेम आहे म्हणून कविता लिहिणें हें वेगळें व त्या कवितासंग्रहांत प्रसिद्ध होणें हें वेगळें. काव्यलेखन हा उत्कट प्रेमाचा विषय असला तरी त्या काव्यांचें प्रकाशन करणें हा व्यवहाराचा विषय आहे. केसरीच्या विश्वस्तांनीं दिनांक ६ मे १९४७ च्या केसरीच्या अंकांत ' टिळकविषयक काव्यसंग्रहा 'चें पहिलें पत्रक प्रसिद्ध केल्यापासून जूनच्या ३० तारखेपर्यंत असा एक दिवस गेला नाहीं कीं, ज्या दिवशीं लोकमान्यांवरील एक कविता आली नाहीं किंवा मी कोठें जाऊन मिळवून आणिली नाहीं. सुमारें २०० च्या वर कविता मजकडे पोष्टानें आल्या किंवा मी जाऊन आणिल्या. त्यांतील कांहीं कविता केवळ प्रसिद्धीसाठीं कोणत्या तरी वृत्तपत्रांत छापलेल्या, तर कांहीं प्रसंगप्रधान म्हणून म्हटल्या गेलेल्या व कांहीं तर कविता या सदरांतच न बसणाऱ्या अशा होत्या. अद्यापीहि अमूप काव्य लोकमान्यांवर लिहिलेलें शेष आहे व तें सारें प्रसिद्ध करण्यास बराच कालावधि लागेल व कागदाचा सुकाळहि व्हावा लागेल. सांप्रतचें काव्यसंकलन हें प्रथम-खंडाच्या स्वरूपाचेंच म्हणावें लागेल.

या काव्यसंग्रहांत " पावणेदोन इयत्ता शिकलेल्या कवीपासून " विद्वन्मान्य कवीपर्यंत साऱ्यांच्या कविता आहेत. स्त्रियांच्या व तरुण विद्यार्थ्यांच्या कविताहि यांत आहेत. यांत शाहिरी वाङ्मयाचा नमुना आहे, तसाच चित्रकाव्याचाहि आहे. जगन्नाथ पंडित चित्रकाव्याची अधम काव्यांत गणना करीत असले, तरी काव्य रचणारा माणूस अधम नाहीं, हें लक्षांत

घेऊन त्याच्या टिळक-प्रेमाला या संग्रहांत अत्यल्प कां होईना वाव दिला आहे. समारंभाच्या प्रसंगीं किंवा वाद्याच्या साथीनें तिलकगुणगान करतां यावें अशी इच्छा असणाऱ्या व्यक्तींसाठीं रागतालयुक्त अशा कांहीं पदांचा यांत संग्रह आहे. कविवर्य मोरोपंतांनीं १०८ रामायणें रचिलीं व रामचंद्राची दिलखुष स्तुति करून घेतली. नीरस रचनेंत स्वतः कवि प्रेमातिरेकानें रसोत्पत्ति झाली असें मानतो व यांतच चित्रकाव्याचा जन्म होतो.

वाल्मीकि-रामायणांत प्रभुरामचंद्रांच्या सर्व गुणांचें वर्णन संपल्या-नंतर, कवि वाल्मीकीनें " गुणैर्विरुरुचे रामो दीप्तः सूर्य इवांशुभिः ", असें अर्धें अनुष्टुभ् अंतीं दाखल केलें. किरणांनीं सूर्य लखलखावा तसा सद्गुणांनीं प्रभु रामराया लखलखला हा वर्णनाचा हेतु. कवि गोविंदाच्या भूपाळींत — हिला पाहिलें स्थान दिलें आहे — पूज्य लोकमान्यांचे असंख्य गुण मार्मिक व ठसकेबाज भाषेंत वर्णिले आहेत; इतके कीं वरील वाल्मीकीच्या वचनांत किंचित् फरक करून असें म्हणतां येईल कीं, " गुणैर्विरुरुचे बालो दीप्तः सूर्य इवांशुभिः ". व्यक्तीच्या अंगीं अनंत गुण असणें हें त्या व्यक्तीच्या महात्म्याचें द्योतक आहे व या अशा गुणां-मुळेंच " लोकमान्यांचें विविध दर्शन " अपरिहार्य होऊन बसतें.

या संग्रहांत लोकमान्यांचे अनंत गुण विविध कवींनीं वर्णिले आहेत. त्यांत विशेषतः निर्भयत्व, विमल चारित्र्य, अखंड व्यासंग, झुंझार-वृत्ति, निःस्वार्थीपणा, लोकसंग्रही वृत्ति या गुणांचा प्रामुख्यानें उल्लेख आहे. कुणाला टिळक हे दीनांचे त्राते वाटतात तर कुणाला ते धर्माचे आधार-स्तंभ वाटतात; कुणाला टिळक प्रेमळ वाटतात; तर कुणाला कठोर वाट-तात. परस्परविरुद्ध गुणांचे एकाच्या ठिकाणीं आरोप हे त्या व्यक्तीच्या ईश्वरांशाचें द्योतक आहेत. महिम्नस्तोत्रांतलि ' वयानें मोठा तूं अतितरुण घे त्र्यक्षनमन ' किंवा गीतेंत ' निर्गुणं गुणभोक्तृ च ' ' भूत-

भून्न च भूतस्थो ' इत्यादि गीतावचनें याचींच निदर्शक होत. टिळक थोर, टिळक अवतारी हींच साध्या कवींची कल्पना ! !

रामायणांत राम — रामचंद्र — दशरथनंदन अशींच नांवें हजारों काव्यें वाचलीं तरी त्यांत सांपडणार, पण म्हणून ते नीरसता उत्पन्न करीत नाहींत. हा संग्रह लोकमान्य टिळकांवरच असल्यानें यांतहि, लोकमान्य, टिळक, बाळ, गंगाधरसुत, हिंदकेसरी इ. लोकमान्यांच्या अनेक उपपदांचा कवींनीं उपयोग केला आहे. लोकांनीं नांवें ठेवणें वेगळें व नांवें पडणें वेगळें ! अशा नांवांना पदव्या म्हणतात. राजसत्तेपेक्षां लोकांनीं स्वयंस्फूर्तीनें दिलेल्या पदव्याच अधिक ग्राह्य व काव्यविषयीभूत होतात. टिळकांवर काव्य लिहिणाऱ्या एकाहि कवीनें लोकमान्यांच्या बी. ए., एलूएल. बी.चा किंवा नामदारांचा उल्लेख केला नाहीं. पदवी ही सामान्य माणसांना खुलून दिसते, असामान्य माणसांना पाहून पदवी भिऊन पळते.

स्वातंत्र्यभाट कवि गोविंद, कविवर्य तांबे, स्वातंत्र्यवीर सावरकर, साधुदास, पांगारकर, आजगांवकर, रणदिवे, सेनापति बापट, देवासकर, कृ. ना. आठल्ये, तिवारी, अनंततनय, माडखोलकर, प्रो. नेहेरे, अज्ञातवासी इत्यादि प्रथित कवींच्या व सौ. उषा सुलाखे व सौ. विजया जोशी इ. स्त्रियांच्या कविता आहेत. कवि गोविंदांची कविता ( भूपाळी ) अनेकांच्या मुखांत वावरत आहे. महाराष्ट्रभाषाचित्रमयूर आठल्ये व तिवारी यांच्या कविता सुंदर आहेत. कोल्हापुरचे रणदिवे यांनीं १९०८ सालीं लिहिलेली कविता उत्कृष्ट आहे. तिचा व इतरहि बऱ्याच कवितांचा मराठी गद्यपद्यवेच्यांत अंतर्भाव करतां येईल.

" चरित्र परिशीलनें तव नुरेल देशापदा "

इत्यादि चरणें आकर्षक असून

" जगीं विरल रे सख्या विरल रे तुझ्यासारखा "

अशा अनन्वयगर्भ ओळी तींत बऱ्याच आहेत.

या संग्रहांत आधुनिक प्रथितयश कवींच्या कविता नाहींत, त्या त्यांच्याकडून करून मागवाव्या अशी मजकडे एक सूचना आली होती. परंतु ज्या कवींना आज २७ वर्षें टिळकचरित्र वाचून व त्यांची जयंती पुण्यतिथि समारंभ झालेले पाहून व त्यांच्या चरित्रावरील व्याख्यानें ऐकून त्या महापुरुषाचें गुणगान करण्याची स्फूर्ति झाली नाही त्यांच्या आग्रह-प्रेरित कवितांनीं हा संग्रह सुशोभित करणें हा जिवंत कवींच्या प्रतिभेचा अपमान आहे.

या संग्रहांत एकूण १५० मराठी कवितांचा — लहानमोठ्या — समावेश आहे. त्यांत वैविध्य आहे, हें प्रारंभींच निवेदिलें आहे. लोकमान्यांच्या जिवंतपणीं रचल्या गेलेल्या सुमारें १२ कविता प्रथम, नंतर लोकमा-न्यांच्या मृत्यूनंतरच्या कविता असा क्रम आहे. मृत्यूनंतरच्या कवितांचें वर्गीकरण गौरवपर, गुणवर्णनपर, स्वागतपर व चित्रकाव्यस्वरूप असें आहे. त्यांतहि पोटभेद म्हणजे वृत्तबद्ध कविता आधीं दिल्या असून नवीन 'चालींच्या' कविता त्यानंतर दिल्या आहेत. कवि साधुदास यांची छोटिशी कविता बहारीची आहे. टिळकांच्या प्रतिस्पर्ध्यांची किंवा विरोध-काची कविता मला 'गांवली' नाहीं. विरोधी भक्तीची निदर्शक कविताहि आढळली नाहीं.

तसें पाहिलें तर हा संग्रह अल्प आहे. लो. टिळकांवरील शाहिरी वाङ्मय, मेळ्यांतील पदें इत्यादींचा स्वतंत्र संग्रह करून तोहि प्रसिद्धिण्या-सारखा असला तरी तूर्त हा अल्पारंभ केला आहे.

मी स्वतः विनंति केल्यावरून किंवा प्रत्यक्ष भेट घेतल्यामुळें व स्वयंस्फूर्तीनें ज्यांनीं या संग्रहाच्या कामांत मला अमोल साहाय्य केलें त्यांत वाईचे श्री. रा. दुराफे, चेंबूरचे श्री. ग. ना. चौबळ, नांदेडचे श्री. मुळावे-कर, कृष्णाकित्तूरचे सप्तसागरकर, मालवणचे श्री. महांबरे यांचा प्रामुख्यानें अंतर्भाव होतो. त्याचप्रमाणें सोलापूरचे श्री. वाणेकर, नाशिकचे पंडित

मामलेदार, आडेगांवचे श्री. ग. शं. जोशी व सूचना करणारे कवि कुंज-विहारी यांचीहि अमोल मदत झाली.

हा संग्रह जमा होत असतां एक गोष्ट ठळकपणानें दिसून आली कीं, निःस्वार्थवृत्तीनें लोकमान्य टिळकांवर प्रेम करणारी एक पिढी होती. त्या पिढींतील अद्यापि हयात असलेल्या चार-पांच वृद्ध गृहस्थांचीं पत्रें वाचलीं की ऊर भरून येतो. लोकमान्यांवर गेल्या पिढीचें किती अलोट प्रेम होतें याचें निदर्शक म्हणून मी एक सारवाक्य खालीं देतों

" लोकमान्याविषयींच्या कवितांचा संग्रह आपण करीत आहां, हें खरोखरच मोठें पुण्यकृत्य आहे. हा संग्रह केव्हां प्रसिद्ध होईल, याकडे आमचे डोळे लागलेले आहेत. हा टिळकविषयक काव्यसंग्रह प्रकाशित झालेला आम्हांस पहावयास मिळाल्यानंतर आम्हांस मरण यावें, अशी ईश्वराजवळ आमची प्रार्थना आहे. "

इतकी सोत्कंठ मार्गप्रतीक्षा करणारे टिळकभक्त अद्यापि जिवंत आहेत ! !

कित्येक कवींच्या कवितांचा या संग्रहांत मी समावेश करूं शकलों नाहीं, याबद्दल ते मला क्षमा करतीलच. दैवयोगानें एखादा बृहत्खंड प्रसिद्ध झाला, तर त्यांत त्या कवितांचा समावेश होईल.

केसरीच्या विश्वस्तांनीं मला हें काम करण्याची संधि देऊन माझ्या हातून माझे पूज्य पुढारी लोकमान्य टिळक यांची सेवा घडविली याबद्दल कृतज्ञता व्यक्त करायला माझ्याजवळ शब्द नाहींत.

केसरी कार्यालय, पुणें
५ जुलै १९४७

काशीनाथ रघुनाथ वैशंपायन, काव्यतीर्थ,
संकलक व संपादक, येवलें

# अनुक्रमणिका

## ( संस्कृत विभाग )


१ पंडितस्य तिलकमहाशयस्य कारावासः – राशिवडेकरशास्त्री ३
२ लोकमान्यबालगंगाधरतिलकषष्ट्यब्दसभाजनम्–पं. रंगाचार्य रड्डी ४
३ राष्ट्रगुरुतिलकप्रशस्तिपंचकम् – लोकनायक अणे ५
४ श्रीटिळकगीता – काव्यतीर्थ वैशंपायन ६
५ लोकमान्यो जयत्विह – सेनापती बापट ७
६ तिलकपंचकम् – आत्मारामशास्त्री ओडलमने ७
७ लोकमान्यतिलकप्रशस्तिः – बाबासाहेब कुलकर्णी ८
८ टिळको जनसेवकः – काव्यतीर्थ का. र. वैशंपायन १०
९ लो. टिळकाय मानपत्रम् – वैदिक धर्माभिमानिनः १२
१० श्रीतिलकवंदनम् – बागेवाडीकरशास्त्री १२
११ स जीयाच्चिरम् – रणजितराय आयुर्वेदालंकार १३
१२ टिळको मार्गदर्शकः – काव्यतीर्थ वैशंपायन १४
१३ तिलकाभिवंदनम् – भ. म. कुलकर्णी १५
१४ वीक्षे कदा नु तिलकं मम लोकमान्यम् – बागेवाडीकरशास्त्री १६
१५ लोकमान्यस्य पुण्यस्मरणम् – वि. र. रिसबूड १७
१६ टिळको युगदीपकः – काव्यतीर्थ वैशंपायन १८
१७ तं लोकमान्यं तिलकं नमामि – सुवर्णशर्मा १९
१८ श्रद्धांजलिः – श्री. अर्जुनवाडकर २०
१९ तिलकस्मृतिः – दामोदरशास्त्री जोशी २१
२० स्मृतिर्हि लोकाभ्युदयाय तादृशाम् – कृ. श्री. खांडेकर २१
२१ श्रीमत्तिलकचरितालोचनम् – कृ. श्री. खांडेकर २३
२२ द्रष्टा श्रीटिळको मुनिः – काव्यतीर्थ वैशंपायन २६
२३ स्वराज्यात्मतर्पणम् – आत्मारामशास्त्री ओडलमने २७

२४ वंदनांजलिः – के. ना. गोडबोले २८
२५ टिळको धर्मरक्षकः – काव्यतीर्थ का. र. वैशंपायन २९
२६ श्रीमत्तिलकप्रशंसा – पुरुषोत्तमशास्त्री गर्गे ३०
२७ श्रीलोकमान्यमहिमा – पं. बाळशास्त्री ३१
२८ अथ कर्मयोगी श्रीबालगणेशाष्टकम् – पं. बाळशास्त्री ३२
२९ हा हन्त बालविरहः कथमेष सह्यः – पुरुषोत्तमशास्त्री गर्गे ३३
३० तिलकं मनसा स्मरामि – वि. र. रिसबूड ३४
३१ कर्मयोगामृतम् – गो. का. सहस्रबुद्धे ३५
३२ तिलकनिधनम् – पांडुरंगतनयः ३६
३३ रहस्यगौरवः – वि. ह. निजसुरे ३७
३४ टिळकस्मरणम् – गीर्वाणभूषण अभ्यंकर ३७
३५ लोकमान्यालंकाराः – करमळकरशास्त्री ३८
३६ लोकमान्यविरहाष्टकम् – पं. करमळकरशास्त्री ४१
३७ नृवीरस्तिलकः – पांडुरंग गोविंदशास्त्री पारखी ४३
३८ टिळकसूत्राणि – अनुवादकः टिळक-काव्य-संकलकः ४४

## ( मराठी विभाग )

१ लोकमान्यांची भूपाळी – गोविंद ४७
२ अनभिषिक्त भूपति – गोविंद ५२
३ श्रीटिळकस्तव – स्वा. वीर सावरकर ५३
४ लोकमान्य –सेनापति बापट ५४
५ राष्ट्रशोकक्षोभ – द. भि. रणदिवे ५६
६ हिंदभूमीचें सौभाग्य – आनंदराव कृष्णाजी टेकाडे ६०
७ लोकमान्य टिळक – पां. गो. पारखी ६०
८ देशभक्ताचे उसासे ! – देशभक्त ६२

९ लोकमान्य-संदेश — नी. वा. भिडे ६३
१० वसंत गेला ! — गोविंद ६४
११ हें नवें कारंजें — वसंतमित्र ६६
१२ लो. टिळकवियोगदुःख — ना. मा. कुंभोजकर ६७
१३ टिळकवियोगोद्गार — कृ. रा. संत ६८
१४ पुण्यपुरींत पुण्यपुरुषाचें स्वागत — ग. गो. जोशी ७०
१५ टिळकमुक्तता — अरुण ७१
१६ लोकमान्यांचा चौसष्टावा वाढदिवस — चंद्रचूड ७२
१७ महाराष्ट्र-भूचा शोक — कृष्णाग्रज ७२
१८ कै. लोकमान्य टिळकांच्या दहाव्या दिवशीं — स्वातंत्र्यकवि गोविंद ७६
१९ लोकमान्यांचें सुरलोकीं प्रयाण — ना. अ. कौलगेकर ७७
२० आर्यभूविलाप — धर्माधिकारी ७९
२१ लोकमान्यविरहगीत — नी. भा. गांधी ८०
२२ टिळकप्रयाणदिनस्मृति — वा. वा. गद्रे ८१
२३ टिळकनिधनविलाप — सौ. हिराबाई गायकवाड ८२
२४ दख्खनचा दिनमणि गेला लोकांतरीं ! — ग. त्र्यं. माडखोलकर ८३
२५ श्रीटिळकनिधनसंशयमाला — दि. ना. अनगळ ८५
२६ लोकमान्यविरहोद्गार — वासुदेवशास्त्री ८६
२७ अश्रुसिंचन — ज. र. आजगांवकर ८७
२८ हिरा हरपला — ग. शं. जोशी ८८
२९ तिलकविरह — म. भि. कुलकर्णी ८९
३० ' कृतज्ञतेचे अश्रु ' — दे. ल. महाजन ९०
३१ लोकमान्यांच्या परलोकवासाबद्दल गोमातेचा विलाप — दास माधव ९१
३२ लोकमान्य टिळक — के. वि. फणसे ९२
३३ अश्रुविमोचन — शामराव जोशी ९४
३४ दुःखक्षोभाचे सुस्कारे — अनंततनय ९६

२४ वंदनांजलिः – के. ना. गोडबोले २८
२५ टिळको धर्मरक्षकः – काव्यतीर्थ का. र. वैशंपायन २९
२६ श्रीमत्तिलकप्रशंसा – पुरुषोत्तमशास्त्री गर्गे ३०
२७ श्रीलोकमान्यमहिमा – पं. बाळशास्त्री ३१
२८ अथ कर्मयोगी श्रीबालगणेशाष्टकम् – पं. बाळशास्त्री ३२
२९ हा हन्त बालविरहः कथमेष सह्यः – पुरुषोत्तमशास्त्री गर्गे ३३
३० तिलकं मनसा स्मरामि – वि. र. रिसबूड ३४
३१ कर्मयोगामृतम् – गो. का. सहस्रबुद्धे ३५
३२ तिलकनिधनम् – पांडुरंगतनयः ३६
३३ रहस्यगौरवः – वि. ह. निजसुरे ३७
३४ टिळकस्मरणम् – गीर्वाणभूषण अभ्यंकर ३७
३५ लोकमान्यालंकाराः – करमळकरशास्त्री ३८
३६ लोकमान्यविरहाष्टकम् – पं. करमळकरशास्त्री ४१
३७ नृवीरस्तिलकः – पांडुरंग गोविंदशास्त्री पारखी ४३
३८ टिळकसूत्राणि – अनुवादकः टिळक-काव्य-संकलकः ४४

## ( मराठी विभाग )

१ लोकमान्यांची भूपाळी – गोविंद ४७
२ अनभिषिक्त भूपति – गोविंद ५२
३ श्रीटिळकस्तव – स्वा. वीर सावरकर ५३
४ लोकमान्य –सेनापति बापट ५४
५ राष्ट्रशोकक्षोभ – द. भि. रणदिवे ५६
६ हिंदभूमीचें सौभाग्य – आनंदराव कृष्णाजी टेकाडे ६०
७ लोकमान्य टिळक – पां. गो. पारखी ६०
८ देशभक्ताचे उसासे ! – देशभक्त ६२

९ लोकमान्य-संदेश — नी. वा. भिडे ६३
१० वसंत गेला ! — गोविंद ६४
११ हें नवें कारंजें — वसंतमित्र ६६
१२ लो. टिळकवियोगदुःख — ना. मा. कुंभोजकर ६७
१३ टिळकवियोगोद्गार — कृ. रा. संत ६८
१४ पुण्यपुरींत पुण्यपुरुषाचें स्वागत — ग. गो. जोशी ७०
१५ टिळकमुक्तता — अरुण ७१
१६ लोकमान्यांचा चौसष्टावा वाढदिवस — चंद्रचूड ७२
१७ महाराष्ट्र-भूचा शोक — कृष्णाग्रज ७२
१८ कै. लोकमान्य टिळकांच्या दहाव्या दिवशीं — स्वातंत्र्यकवि गोविंद ७६
१९ लोकमान्यांचें सुरलोकीं प्रयाण — ना. अ. कौलगेकर ७७
२० आर्यभूविलाप — धर्माधिकारी ७९
२१ लोकमान्यविरहगीत — नी. भा. गांधी ८०
२२ टिळकप्रयाणदिनस्मृति — वा. वा. गद्रे ८१
२३ टिळकनिधनविलाप — सौ. हिराबाई गायकवाड ८२
२४ दख्खनचा दिनमणि गेला लोकांतरीं ! — ग. त्र्यं. माडखोलकर ८३
२५ श्रीटिळकनिधनसंशयमाला — दि. ना. अनगळ ८५
२६ लोकमान्यविरहोद्गार — वासुदेवशास्त्री ८६
२७ अश्रुसिंचन — ज. र. आजगावकर ८७
२८ हिरा हरपला — ग. शं. जोशी ८८
२९ तिलकविरह — म. भि. कुलकर्णी ८९
३० ‘ कृतज्ञतेचे अश्रु ’ — दे. ल. महाजन ९०
३१ लोकमान्यांच्या परलोकवासाबद्दल गोमातेचा विलाप — दास माधव ९१
३२ लोकमान्य टिळक — के. वि. फणसे ९२
३३ अश्रुविमोचन — शामराव जोशी ९४
३४ दुःखक्षोभाचे सुस्कारे — अनंततनय ९६

३५ लोकमान्य टिळकांचा स्वर्गवास — पु. बा. जोशी ९७
३६ श्रीटिळकनिधन — गो. पां. देवधर ९९
३७ लोकमान्यांचें स्वर्गारोहण — सौ. शारदाबाई परांजपे १०३
३८ लोकमान्यांचें यशोगायन — कै. दु. आ. तिवारी १०५
३९ स्वातंत्र्यसूर्य — विं. बा. खेडकर १०६
४० लोकमान्य तिलक वार्षिक पुण्यस्मृति — काव्यभूषण खेडकर १०७
४१ नका शोधुं अन्या भजा लोकमान्या — कृ. ना. आठल्ये १०८
४२ श्रीतिलक महिम्न — कृष्णमूर्ति ११०
४३ कीर्तिरूपें विराजे — कै. लक्ष्मणशास्त्री चंद्रात्रेय १११
४४ तिलकस्तव — रा. ब. गोडबोले १११
४५ बंदिशाळेंतील तिलकस्मृतिदिन — 'यज्ञोपवीत' ११२
४६ तिलकगान — ज्ञानरत्न भांबूरकर ११३
४७ नमस्कार त्या ' बाल गंगाधराला ' — गो. ह. हसूरकर ११४
४८ श्रीलोकमान्यस्मृति — पलुस्करशास्त्री ११५
४९ 'तिलकवंदन' — सी. न. साने ११६
५० नमस्कार त्या लोकमान्याग्रणीला — श्रीकृष्ण ११७
५१ लोकमान्यांचा स्वगौरव — दु. आ. तिवारी ११८
५२ धन्य लोकमान्य पुण्यश्लोक हिन्दकेसरी — शं. रा. देशपांडे ११९
५३ लोकमान्यांचा गुणगौरव — शं. श्री. धनेश्वर १२०
५४ तिलकगौरव — वि. वि. इनामदार १२१
५५ बाल-रत्न ! — यादवसुत १२३
५६ लोकमान्यांच्या पुण्यस्मृतीस — शांतासुत १२४
५७ लोकमान्य — दु. आ. तिवारी १२४
५८ नेता टिळक — गो. वि. भागवत १२६
५९ स्वराज्यमंत्रा विसरुं नका — बा. ग. लेले १२७
६० लोकमान्यजयंती — ग. गो. जोशी १२८

६१ नवजीवनाचा प्रेरक – भृंग १२८
६२ कर्मयोगी – रघुकुमार १२९
६३ स्वातंत्र्याचा तिलक – प्रो. बेहेरे १३०
६४ झेंडा तुवां रोंविला – मनमोहन १३१
६५ खरें लोकमान्यत्व – वि. म. माटेगांवकर १३१
६६ तीन तपांपूर्वींचे तीन वक्ते – ह. भ. प. पांगारकर १३२
६७ टिळकगुणरहस्य – सदाशिवानुज १३४
६८ पुण्यस्मृतिजागृति – विवेक १३५
६९ लोकमान्यांचें पुण्यस्मरण – मा. ना. कात्रे १३६
७० तिलकप्रशंसा – मुकुंदराय १३६
७१ श्रीमत्तिलक-स्मृति ! – रा. द. पंत पराडकर १३७
७२ देई अतां तव स्फूर्तीसी – ‘चंद्र’ १३८
७३ वंदनांजलि – के. ना. गोडबोले १३९
७४ लोकमान्य म्हणणें मग तेव्हां – अ. वि. पाटणकर १४०
७५ लोकमान्यवंदन – ल. ग. वझे १४०
७६ भारतभूषण कर्मयोगी लोकमान्य – रा. गं. भागवत १४१
७७ श्रीलोकमान्य – ‘मरंद’ १४२
७८ लोकमान्य टिळकांची थोरवी – दा. वि. जोशी १४४
७९ वंदन – ग. गो. सोमण १४५
८० तिलक-स्मृति – सौ. सरस्वतीबाई अफझुलपूरकर १४५
८१ केसरी – ‘अरुण’ १४६
८२ तव स्मरण – कै. लेलेशास्त्री १४६
८३ कृतज्ञतेचे अश्रु – ना. ब. कुलकर्णी १४७
८४ तिलकाभिवंदन – रामचंद्र कारंडे १४
८५ तिलकप्रतिमाभिनंदन – कै. लक्ष्मणशास्त्री लेले १४
८६ लोकमान्यांस – भा. रा. तांबे १

३५ लोकमान्य टिळकांचा स्वर्गवास – पु. ब्रा. जोशी ९७
३६ श्रीटिळकनिधन – गो. पां. देवधर ९९
३७ लोकमान्यांचें स्वर्गारोहण – सौ. शारदाबाई परांजपे १०३
३८ लोकमान्यांचें यशोगायन – कै. दु. आ. तिवारी १०५
३९ स्वातंत्र्यसूर्य – वि. ब्रा. खेडकर १०६
४० लोकमान्य तिलक वार्षिक पुण्यस्मृति – काव्यभूषण खेडकर १०७
४१ नका शोधुं अन्या भजा लोकमान्या – कृ. ना. आठल्ये १०८
४२ श्रीतिलक महिम्न – कृष्णमूर्ति ११०
४३ कीर्तिरूपें विराजे – कै. लक्ष्मणशास्त्री चंद्रात्रेय १११
४४ तिलकस्तव – रा. ब. गोडबोले १११
४५ बंदिशाळेंतील तिलकस्मृतिदिन – 'यज्ञोपवीत' ११२
४६ तिलकगान – ज्ञानरत्न भांबूरकर ११३
४७ नमस्कार त्या 'बाल गंगाधराला' – गो. ह. हसूरकर ११४
४८ श्रीलोकमान्यस्मृति – पलुस्करशास्त्री ११५
४९ 'तिलकवंदन' – सी. न. साने ११६
५० नमस्कार त्या लोकमान्याग्रणीला – श्रीकृष्ण ११७
५१ लोकमान्यांचा स्वर्गौरव – दु. आ. तिवारी ११८
५२ धन्य लोकमान्य पुण्यश्लोक हिन्दकेसरी – शं. रा. देशपांडे ११९
५३ लोकमान्यांचा गुणगौरव – शं. श्री. धनेश्वर १२०
५४ तिलकगौरव – वि. वि. इनामदार १२१
५५ बाल-रत्न ! – यादवसुत १२३
५६ लोकमान्यांच्या पुण्यस्मृतीस – शांतासुत १२४
५७ लोकमान्य – दु. आ. तिवारी १२४
५८ नेता टिळक – गो. वि. भागवत १२६
५९ स्वराज्यमंत्रा विसरुं नका – बा. ग. लेले १२७
६० लोकमान्यजयंती – ग. गो. जोशी १२८

६१ नवजीवनाचा प्रेरक – भृंग १२८
६२ कर्मयोगी – रघुकुमार १२९
६३ स्वातंत्र्याचा तिलक – प्रो. बेहेरे १३०
६४ झेंडा तुवां रोंविला – मनमोहन १३१
६५ खरें लोकमान्यत्व – वि. म. माटेगांवकर १३१
६६ तीन तपांपूर्वींचे तीन वक्ते – ह. भ. प. पांगारकर १३२
६७ टिळकगुणरहस्य – सदाशिवानुज १३४
६८ पुण्यस्मृतिजागृति – विवेक १३५
६९ लोकमान्यांचें पुण्यस्मरण – मा. ना. कात्रे १३६
७० तिलकप्रशंसा – मुकुंदराय १३६
७१ श्रीमत्तिलक-स्मृति ! – रा. द. पंत पराडकर १३७
७२ देई अतां तव स्फूर्तीसी – ‘चंद्र’ १३८
७३ वंदनांजलि – के. ना. गोडबोले १३९
७४ लोकमान्य म्हणणें मग तेव्हां – अ. वि. पाटणकर १४०
७५ लोकमान्यवंदन – ल. ग. वझे १४०
७६ भारतभूषण कर्मयोगी लोकमान्य – रा. गं. भागवत १४१
७७ श्रीलोकमान्य – ‘मरंद’ १४२
७८ लोकमान्य टिळकांची थोरवी – दा. वि. जोशी १४४
७९ वंदन – ग. गो. सोमण १४५
८० तिलक-स्मृति – सौ. सरस्वतीबाई अफझुलपूरकर १४५
८१ केसरी – ‘अरुण’ १४६
८२ तव स्मरण – कै. लेलेशास्त्री १४६
८३ कृतज्ञतेचे अश्रु – ना. ब. कुलकर्णी १४७
८४ तिलकाभिवंदन – रामचंद्र कारंडे १४७
८५ तिलकप्रतिमाभिनंदन – कै. लक्ष्मणशास्त्री लेले १४७
८६ लोकमान्यांस – भा. रा. तांबे १४८

८७ पुण्यस्मृति – 'साधुदास' १५०

८८ लोकोत्तर लोकमान्य – अज्ञातवासी १५०

८९ स्वराज्यध्येयाचा नंदादीप – वि. प. भागवत १५१

९० टिळकपुण्यतिथि – काव्यतीर्थ वैशंपायन १५३

९१ तिलक-वंदना – दा. ल. अडोणी १५४

९२ सानंद पुण्यस्मरण – 'अशोक' १५५

९३ श्रीलोकमान्यांस – वा. शि. आपटे १५५

९४ टिळकपुण्यस्मरण – वैद्यकुमार रायकर १५६

९५ पुनः माउली गे तुझ्या बाहुपाशीं ! – ज. गं. करंदीकर १५७

९६ लोकमान्य टिळक – ज. गं. करंदीकर १५८

९७ " समीप आहे स्वातंत्र्याचा अरुणोदय आतां " – द. कृ. पेठे १५९

९८ लोकमान्यप्रशस्ती – गो. गं. पोतदार १६०

९९ मायदेश – गो. गं. पोतदार १६१

१०० पुण्यस्मरण – श्री. गं. भट १६२

१०१ पंचांगवाद व टिळक – रा. गं. भागवत १६२

१०२ स्मृतिसुमनें – माधव नावडीकर १६३

१०३ ' गाउं आरती ' – शं. ना. नवें १६४

१०४ लोकमान्यांच्या दहाव्या दिवशीं – 'वसंतमित्र' १६५

१०५ हा लोकमान्यराया ! – कै. देवासकर १६७

१०६ श्रीतिलकस्तवन – मंजुमाधव १६८

१०७ हिंदभूमीचा सुपुत्र – श्रीपाद १६९

१०८ श्रीटिळकवंदन – सेवानंद १६९

१०९ वीरकेसरी – किरण १७०

११० विभूतिपूजन – सौ. उषा सुलाखे १७१

१११ लोकमान्यांचें स्मारक – विद्याधरानुज १७२

११२ स्फूर्ति मिळवूं नित नमुनी – सौ. उषा सुलाखे १७३

११३ तेजस्वी उद्‌गार — धेनुदास डोळे १७४
११४ प्रभुप्रार्थना — पु. पां. गोखले १७४
११५ लोकमान्यांचें पवित्र स्मरण — रा. वि. कुलकर्णी १७५
११६ नाहीं कुठें ' बाल गंगाधर ' ! — श्री. अंदूरकर १७७
११७ श्रीलोकमान्यस्मृति — केशवतनय १७८
११८ लोकमान्यजयंती — गं. मा. देशपांडे १७९
११९ तिलकस्मरण — वा. रा. फणसळकर १८०
१२० तिलकगुणवर्णन — वि. रं. गुपचुप १८२
१२१ तिलकचरित्ररहस्य — वा. त्र्यं. आपटे १८३
१२२ बाळ-लेणें — धेनुदास डोळे १८४
१२३ नमन मम लोकमान्य टिळकांला — विनायक १८५
१२४ धन्य धन्य टिळका ! — गणेश १८६
१२५ लोकमान्य पुण्यस्मरण — सौ. गंगूताई वैद्य १८७
१२६ लोकमान्यांस प्रणाम — सिंधु शिरवाडकर १८८
१२७ काय म्हणतात — दिनकरसुत १८९
१२८ तिलकस्तवन — दत्तात्रेय कालगांवकर १९०
१२९ हिंददेवीचा विलाप — कै. रा. वे. रंगारी १९०
१३० तिलकस्मृति — कृ. के. रहाळकर १९३
१३१ टिळक — नी. भा. गांधी १९४
१३२ स्मारकासन्निध — शं. ना. बर्वे १९४
१३३ टिळकांची पहिली भीषण शिक्षा — शाहीर भिडे १९५
१३४ लोकमान्य टिळक — सन्मित्रसमाज मेळा १९६
१३५ टिळकपणा म्हणजे ? — राम १९७
१३६ श्रीतिलकाय नमः — शाहीर अ. ना. प. १९८
१३७ जय लोकमान्य — श्रीमंगलमूर्ति २००
१३८ तिलकस्मृति — श्री. बलवत्सुत २०

१३९ अवतरो पुनः – सौ. विजया जोशी २०३
१४० स्वागत पद्य २०४
१४१ स्वागत २०४
१४२ स्वागत – आ. क. ऋषि २०५
१४३ लोकमान्या भजा – श्रीहरियंत्र २०५
१४४ केसरी पत्राचे जनक नरकेसरी – गणेशातनय २०६
१४५ लोकमान्यांचा दिव्य संदेश – कृष्णमूर्ति २०७
१४६ मान्यवर गुरु लोकमान्य टिळक-पुण्यस्मरण – रा. वा. दाते २०८
१४७ टिळक-कवच – रा. वा. दाते २०९
१४८ लोकमान्यांच्या पुतळ्यावरील पद – क. पु. डोंगरे २१०
१४९ टिळकांची आरती २११
१५० टिळकांची आरती – काव्यतीर्थ का. र. वैशंपायन २१२

१३९ अवतरो पुनः – सौ. विजया जोशी २०३

१४० स्वागत पद्य २०४

१४१ स्वागत २०४

१४२ स्वागत – आ. क. ऋषि २०५

१४३ लोकमान्या भजा – श्रीहरियंत्र २०५

१४४ केसरी पत्राचे जनक नरकेसरी – गणेशतनय २०६

१४५ लोकमान्यांचा दिव्य संदेश – कृष्णमूर्ति २०७

१४६ मान्यवर गुरु लोकमान्य टिळक-पुण्यस्मरण – रा. वा. दाते २०८

१४७ टिळक-कवच – रा. वा. दाते २०९

१४८ लोकमान्यांच्या पुतळ्यावरील पद – क. पु. डोंगरे २१०

१४९ टिळकांची आरती २११

१५० टिळकांची आरती – काव्यतीर्थ का. र. वैशंपायन २१२




" गुणैर्विरुरुचे बालः दीप्तः सूर्य इवांशुभिः "

[ श्री. महाबळ, नाशिक यांच्या कृपेनें

॥ श्रीतिलकाय नमः ॥

# काव्यमय टिळक

## संस्कृतविभागः

## संकलकस्य निवेदनम्

काव्यसंग्रहमुद्दिश्य । यन्निवेद्यं निवेदये ।
विभागेऽस्मिन्विलसति । महती सुरभारती ॥ १ ॥

तिलकान्वयसंभूतो । बालो नाम जनैः श्रुतः ।
कवीनां काव्यविषयो । लोकमान्यः प्रतिष्ठितः ॥ २ ॥

सप्तत्रिंशत्सुकाव्यानि । माल्यवद्गुंफितानि हि ।
कवयो नांधभक्तास्ते । हृदयंग्राहिणो जनाः ॥ ३ ॥

'द्रष्टृत्वमवतारित्वम् । निर्भयत्वं तथैव च ।
अहो विशुद्धशीलत्वम्' । कविभिर्वर्णितं मुदा ॥ ४ ॥

रङ्गीकुलावतंसा ये । रंगाचार्या महात्मनः ।
विद्यावाचस्पतिपदे । अप्पाचार्या विराजिताः ॥ ५ ॥

सेनानी बापटः श्रीमान् । अणे श्रीलोकनायकः ।
सुवर्णशर्मा अथणी – । बाळशास्त्री महामनाः ॥ ६ ॥

श्रेष्ठो रणजितो रायः । बागेवाडीकरस्तथा ।
करमळ्करशास्त्री तु । 'अलंकारे' प्रभाववान् ॥ ७ ॥

विद्वांसः कवयः सर्वे । रमंते गुणवर्णने ।
जनतात्मा प्रियो यस्य । न कथं वर्ण्य एव सः ॥ ८ ॥

वुष्यते वचनं लोके । ना विष्णुः पृथिवीपतिः ।
न हि लोकाग्रणीर्लोके । अवताराहते भवेत् ॥ ९ ॥

न हि संमानमर्हन्ति । संग्रहैकपरा जनाः ।
संग्रहो यदि दानाय । श्लाघनीयो हि मेघवत् ॥ १० ॥

काव्यानां संग्रहः प्रेम्णा । तिलकस्यैव यैः कृतः ।
केसरीपत्रविश्वस्ताः । स्तुतिपात्रा नु सर्वदा ॥ ११ ॥

मृता भाषा संस्कृता हि । विरोधिवचनं सदा ।
अमृतां तामहं मन्ये । 'भाषासंजीवनी' हि सा ॥ १२ ॥

विविधाः सद्गुणा अत्र । वर्णितास्तिलकस्य च ।
वाचकस्तु गुणग्राही । भवेदभ्यर्थना मम ॥ १३ ॥

तिलकस्य महासेवा । विश्वस्तैः कारिता मया ।
कृतेयं वाङ्मयी पूजा । धन्या मे सफला जनिः ॥ १४ ॥

– श्रीमत्तिलकचरणरजः काव्यतीर्थोपाध्यलंकृतः काशीनाथशर्मा

# पंडितस्य तिलकमहाशयस्य कारावासः

( वियोगिनी )

कति वा न भवंति भूतले । ननु कुक्षिंभरयः श्ववृत्तयः ।
निजमानसमंदिरेऽर्चितः । सुजनैर्यः प्रणयात्स जन्मवान् ॥ १ ॥
अयि धन्य यतः परित्यजन् । निजमर्थं जनमंगलाशया ।
यतसे बत सेवकोपमः । तिलकस्त्वं तिलकोऽसि मत्क्षितेः ॥ २ ॥
विभवः क्व मनःप्रमोदकः । क्व च कारागृहवास ईदृशः ।
न तथापि मनागपीहते । हृदयं रोहति धीर दीनताम् ॥ ३ ॥
जनमंगलबद्धकंकणा । करयोर्नृत्यति लेखनी ययोः ।
अयि तत्र कथं नु कर्कशं । भवतु प्रस्तरखंडभाजनम् ॥ ४ ॥
जरठामिव मातरं सुतः । सविशेषं ननु यामुपाचरः ।
विरहं तव दुःसहं कथं । वद सा पुण्यपुरी सहिष्यते ॥ ५ ॥
ननु दूषयितुं भवेदलं । विपदेषा यश आयतं तव ।
किमु लग्नतमापि दूषयेत् । जलनीली कमलस्य गौरवम् ॥ ६ ॥
निगडालयमागते त्वयि । प्रमुदं दुर्जनसंग आप्तवान् ।
अपरां दिशमागते रवाविव खद्योतचयः स्वभाग्यतः ॥ ७ ॥
क्षिपतश्चरणं तव क्षितौ । क्वणितं बंधनशृंखलोद्भवम् ।
प्रमदेन खलस्य नृत्यतो । बत तालध्वनितां गमिष्यति ॥ ८ ॥
विषमामनुभावयन्दशां । अधुना त्वां मतिमन्नकारणम् ।
क्रकचं च बुधांतरेऽर्पयन् । किमु लब्धं कुटिलः फले विधिः ॥ ९ ॥
त्वदुपात्तजनुः स्वगर्जितैः । प्रतिपक्षं विकलीचकार यः ।
स विना भवताद्य दीनतां । गतवान्म्लायति हंत केसरी ॥ १० ॥

— विद्यावाचस्पति अप्पाशास्त्री राशिवडेकर

'टिळकगुणकलाप' १९२०

## लोकमान्यबालगंगाधरतिलकषष्ट्याब्दसभाजनम्

( उपजाति )

अहर्निशं भारतभूजनानां
कथं समृद्धिर्भवितेति चिंतनात् ।
येन स्वमायुर्विपुलं व्ययीकृतं
श्रीशो मुदा तं कुरुताच्चिरायुषम् ॥ १ ॥

पौरस्त्यपाश्चात्यनिबंधरत्ना-
न्यालोक्य तत्त्वानि नवानि धीमान् ।
सदा पुरः सन्निदधाति यः सतां
श्रीशो मुदा तं कुरुताच्चिरायुषम् ॥ २ ॥

मतिर्विचित्रा कृतयो विचित्रा
धृतिर्विचित्रा भुवनेषु यस्य ।
विचित्रता याति विचित्रतां यतः
श्रीशो मुदा तं कुरुताच्चिरायुषम् ॥ ३ ॥

राष्ट्रस्य नेता विदुषां च यः सदा
पाताथ भर्ता सुहृदां विशेषतः ।
राष्ट्रस्य चायुः खलु यस्य जीवनं
श्रीशो मुदा तं कुरुताच्चिरायुषम् ॥ ४ ॥

गंगाधराल्लब्धजनिर्महात्मनो
बालाभिधो यस्तिलकान्वयाग्रणीः ।
स्मृत्वैवमंतर्विबुधा नमन्ति यं
श्रीशो मुदा तं कुरुताच्चिरायुषम् ॥ ५ ॥

— पंडित रंगाचार्य रड्डी

'रड्डी सन्मान अंक' १९४२

# राष्ट्रगुरुतिलकप्रशस्तिपंचकम्

( शार्दूलविक्रीडित )

गत्वा यः श्रुतिशब्दशास्त्रजलधेरंतं तलं प्राप्य च
प्रोद्धृत्याऽखिलवाग्ललामविलसत्सिद्धांतमुक्तास्ततः ।
सद्ग्रंथत्रितये ररक्ष जगतां बोधाय भूत्यै तथा
बालं राष्ट्रगुरुं नमामि तिलकं गंगाधरस्यात्मजम् ॥ १ ॥

संसाराटविदुःखदावदहनग्रस्ता जनाः प्राकृता
दिङ्मूढा व्यचरन् विषण्णहृदया दीना अकिंचित्कराः ।
तानाश्वास्य य आदिशत्कृतिपथं गीतारहस्योदितं
बालं राष्ट्रगुरुं नमामि तिलकं तं लोकमान्यं मुहुः ॥ २ ॥

ग्रस्तां भारतदिग्गजो जलचरैर्दंष्ट्राकरालैश्चिरं
सर्वं सामसुभाषितं गजकृतं जातं तले ताडनम् ।
नक्रं हंतुमुपस्थितोऽहमिति यः प्रोवाच दीनं गजं
बालं राष्ट्रगुरुं नमामि तिलकं सत्यप्रतिज्ञाऽग्रणीम् ॥ ३ ॥

क्षुन्मत्तोऽखिलराजभृत्यनिवहः प्रायो विदेशागतो
वित्तं कर्षति दुष्करैस्तरुरसं दुष्कीटको यादृशम् ।
कारागारनिवासकष्टमसहत्तद्ध्वंसने यो मुहु-
र्बालं राष्ट्रगुरुं नमामि टिळकं मृत्यध्वरे दीक्षितम् ॥ ४ ॥

राष्ट्रव्याधिहरं भिषग्वरमणिं विद्यावतां शेखरं
ज्येष्ठं नीतिविदां विरक्तचरितश्रेष्ठं समष्टिप्रियम् ।
वेदाभ्यासरतं परार्थनिपुणं प्रज्ञास्थितं पंडितं
बालं राष्ट्रगुरुं नमामि टिळकं तं कर्ममीमांसकम् ॥ ५ ॥

स्वातंत्र्याभिमुखो बभूव तरुणस्त्वद्‌वाक्सुधासेवनात्
नष्टा चैव जरा प्रवृद्धवयसां चैतन्यमाप्तं नवम् ।
पंचश्लोकजलांजलिस्तव पदे श्रद्धार्पितोऽयं मया
अद्य त्वामुपतिष्ठतु प्रभुपदे यस्मिन्विलीनोऽभवः ॥ ६ ॥

— लोकनायक माधव श्रीहरि अणे

'सह्याद्रि' १९३५.

---

## श्रीटिळकगीता

( न्यायासनं प्रति श्रीमत्तिलकभाषणम् )

न्यायासनेन निर्णीतं
सत्यं वा वितथं भवेत् ।
अनागाः परिपूर्णोऽहं
इति मे निश्चिता मतिः ॥ १ ॥

इहामुत्र नियंता हि
त्रिजगच्चालकप्रभुः ।
ऐहिको न्याय एवैष
वरस्तस्यैव निर्णयः ॥ २ ॥

राष्ट्रसेवां पुरस्कृत्य
यन्मयांगीकृतं व्रतम् ।
स्वातंत्र्यान्मेऽधिकं क्लेशै-
र्वृद्धिं यातु विधेर्विधिः ॥ ३ ॥

— काव्यतीर्थ का. र. वैशंपायन, येवलें

'केसरी' १९३८

# लोकमान्यो जयत्विह

( यदांग्लदेशं प्रति प्रस्थितास्तत्रभवंतः श्रीमत्तिलकपादाः – कवेराशंसा । )

लोकः स्वीयः स्वदेशोऽयं स्वराज्यं संसदा युतम् ।
कर्मभिः कर्मवीराणामुन्नितैः कलयेदिति ॥ १ ॥

मानेन महताश्चिंता; परं " मे राष्ट्रमुत्तमम् ।
न्यस्तभ्रांतमतैः प्राप्तकालसर्वकलायुतैः ॥ २ ॥

यतस्वार्थोर्मिभिः सम्यग्देशसेवापरायणैः ।
शत्रुं देशस्य बुद्ध्वा तं निग्रहीतुं समुत्सुकैः ॥ ३ ॥

स्वीयां संस्कृतिमापन्नां संशोध्य परिशोध्य च ।
होतृबुद्ध्या विशुद्धां तां सर्वायार्पितुमुद्यतैः ॥ ४ ॥

ओजस्विभिर्जनैः पूर्णं भवत्विति सुदुश्चरम् ।
तपश्चरति धर्मात्मा " लोकमान्यो जयत्विह ॥ ५ ॥

( द्वितीयश्लोकार्धात् पंचमश्लोकार्धाधिकं कलापकं वर्तते । )

– सेनापति पां. म. बापट

' सेनापति बापट समग्र ग्रंथ '

---

# तिलकपंचकम्

( वसंततिलका )

भो आर्यदेश गतमद्य न किं त्वदीयं
चैतन्यमेव बलवत्तिलकस्वरूपम् ।
जानामि नाहमधुना चलनं कथं ते
स्यान्नाम तिष्ठति विना सलिलं न मीनः ॥ १ ॥

त्वं संचिकित्स्य हितभेषजयोजनेऽद्य
युक्तिप्रमाणवचनैः समयोचितैश्च ।
पथ्योपदेशकरणे वद कः समर्थ-
स्त्रेताग्निमुक्तमखमंदिरवद्विभासि ॥ २ ॥

सौख्यं विहाय निजराष्ट्रकृते शरीरं
हुत्वा स्वकीयमभिताडितभीरुभावः ।
देशात्मवादमचलं य उदाजहार
मन्ये स चंदनतुलामधिरोहतीति ॥ ३ ॥

यो लोकसौख्यकरणं मनुते नितांतं
पुत्रोत्सवं सकलसाधुगुणो महात्मा ।
तस्मादपेतचरितस्य तवार्यदेश
दौर्भाग्यजातमुदितं शरणं व्रजेशम् ॥ ४ ॥

बालाख्यतिलकस्येश रक्षणेनैव लीलया ।
सद्यो देशांतरस्थस्य दयामुज्ज्वलितां कुरु ॥ ५ ॥

आत्मारामशास्त्री ओडलमने, म्हैसूर

'केसरी' ४।८।१९०८

---

## लोकमान्यतिलकप्रशस्तिः

( उपजातिं )

वेदार्थविच्छास्त्ररहस्यवेत्ता । बालोऽपि भूत्वा भुवि भाति वृद्धः ।
विद्यैव पूज्येति मृषा न वाणी । निदर्शनं बाल भवान् सुविद्यः ॥ १ ॥

पूज्या गुणा वै न वयो न लिंगं । इति प्रसिद्धो भवभूतिराह ।
तच्चापि सार्थं त्वयि बालनाम्नि । यतोऽसि तैस्त्वं भुवि लोकपूज्यः ॥ २ ॥

गुणैश्च तैस्तैः प्रतिभाविशेषैः । मत्वा त्वया चोज्ज्वलकांतिमत्या ।
विभासि विद्वज्जनसंसदि त्वं । गुरुः कविर्वा बुधवृंदमध्ये ॥ ३ ॥

कृता त्वया जीवितसार्थतेति । सार्थोपनामासि कुशाग्रबुद्धे ।
समानधर्मा विरलस्तवेति । वचो जनानां रसनाग्रवर्ति ॥ ४ ॥

न केवलं नाम निजं कुलं हि । नीतं त्वया वाचकवाच्यभावम् ।
अतोऽस्ति मन्ये न हि ते समानो । धन्यो जनोऽन्यो जगतीतलेऽस्मिन् ॥५॥

( वसंततिलका ):

मानापमानसमतासुखदुःखसाम्यं
इष्टोपपत्तिरथवा विपरीतता च ।
कारागृहाधिवसतिर्निजवेश्मशय्या
सर्वं समानमिति येन भृशं व्यदर्शि ॥ ६ ॥

येन त्वया निरवधिः सुतदारनाश-
शोकः स्फुटं स्थिरधिया सुखमित्यमानि ।
लोष्टाश्मकांचनसमानदृशश्च बाल
तस्याक्षनिग्रहबलं तव कः स्तुवीत ॥ ७ ॥

गीतारहस्यसुविवेचननामधेयो
योऽयं त्वया व्यरचि लेख इहातिरम्यः ।
प्राचीनवाङ्मयसमुद्रविलोडनोत्थं
रत्नं नु सूरिवरकंठविभूषणं नु ॥ ८ ॥

कृष्णोपदेशगतहृद्यगवेषणार्थं
लेखस्त्वया व्यरचि मान्य इह प्रसिद्धः ।
भूमौ न केवलमसौ बुधमान्य एव
नाकेऽपि बाल स भवेत्तव लेखमान्यः ॥ ९ ॥

— कविकौस्तुभ त्र्यंबक रामचंद्र ऊर्फ बाबासाहेब कुलकर्णी, नाशिक

* बाबासाहेब कुलकर्णी काव्यग्रंथ

# टिळको जनसेवकः

( द्रुतविलंबित )

टिळकनामससुच्चरणं मुदे
भवति भारतदेशनिवासिनाम् ।
हृदि दधौ सततं जनमंगलं
अनलसो नलसोमसमद्युतिः ॥ १ ॥

सुजननी सुतजन्मसमुत्सुका
तपति भास्वति तीव्रतरं तपः ।
दिनमणिष्टिळको जगति स्वयं
समुदितो मुदितो हि पराक्रमः ॥ २ ॥

सुफलताध्ययने मनने तथा
विमलता हि सदाचरणे स्थिता ।
अतिदरिद्रजनेषु वदान्यता
सुजनता जनतांतरतोषणे ॥ ३ ॥

न सुखमाद्रियते रिपुणार्पितं
जनकृते बहुदुःखमहो वृतम् ।
अविचलो बत बंदिगृहेऽपि यः
स्थिरमते ! रमते त्वयि भारतः ॥ ४ ॥

अपि च कीर्तिपरा न सरस्वती
हसति कामपरा न गृहस्थता ।
न हि कदा रमते जनसंस्तवे
धनपरा न पराक्रमशीलता ॥ ५ ॥

न स बभूव कदा नृपसेवकः
सुजनपूजन एव मनो दधे ।
प्रतिकृतो रिपुणापि सुनिर्भयः
अभयता भयताण्डवतापिनी ॥ ६ ॥

खलजनैः स्वजनैरपमानितो
गदबलेन सदा बहुपीडितः ।
तदपि धैर्यगुणेऽविचलः स्थितः
प्रतिभयोऽतिभयंकरतेजसाम् ॥ ७ ॥

प्रतिदिनेऽभिनवा टिळकस्मृतिः
उपरतस्य महानवधिर्यदि ।
चरितमेव सदैव महात्मनां
जनमनो नमनोन्मुखतां नयेत् ॥ ८ ॥

न मतिरस्य कदा कमलोदये
वसति साहसिके हि हरिप्रिया ।
पठनपाठनमादरितं यतो
जनसुखं न सुखं नु कथं भवेत् ॥ ९ ॥

रोगै रूढिच्छलेनापि । राज्ञा वा पीडिता जनाः ।
तेषां सेवा कृता नित्यं । टिळको जनसेवकः ॥ १० ॥

— काव्यतीर्थ का. र. वैशंपायन, येवले

'केसरी' ऑगस्ट १९४६

# लो. टिळकाय मानपत्रम्

( एकषष्टितमे जन्मदिवसे )

( शार्दूलविक्रीडित )

सर्वत्र क्रमते निसर्गनिपुणा धीर्यस्य सर्वंकषा
शीलं चापि मनस्विनामिह सतामादर्शभावं गतम् ।
धैर्ये लोभविनिर्जये नयपथे शास्त्रार्थतत्त्वागमे
सोऽयं भारतभूललाटतिलकः काष्ठां परां गाहते ॥ १ ॥

( मालिनी )

यदिह दुरवबोधं चेष्टितं सर्वलोकै-
र्गतिगहनसुनीतिच्छन्नतत्त्वं नृपाणाम् ।
उदधिमिव मथित्वा बुद्धिमंथेन तद्यो
हरिरमृतमिव द्राक् तत्त्वमाविश्चकार ॥ २ ॥

( अनुष्टुभ् )

बंधनालयजन्मापि भगवान् मुक्तिदो यथा ।
कर्मयोगोऽपि भविता तवेति मतमीशितुः ॥ ३ ॥

— शिवरामशास्त्री गोरे आदि वैदिकधर्माभिमानी मंडळी

'केसरी' २५।७।१९१६

---

# श्रीतिलकवंदनम्

( वियोगिनी )

यतते विगणय्य संकटान् । स्वहितं भ्रातृजनस्य मंगलम् ॥
विदधातुमना विहाय यः । तिलकं तं प्रणमामि मत्क्षितेः ॥ १ ॥

भरतोद्धरणाय केवलं । निजमायुः क्षपितं किलामुना ।
जनसिद्धमिति स्वराज्यकं । तिलकं तं प्रणमामि मत्क्षितेः ॥ २ ॥

निगडं प्रथमं तदा नृणां । महदंगीकृतवान् शुभाशया ।
ननु धैर्यधरः मुदुर्धरं । तिलकं तं प्रणमामि मत्क्षितेः ॥ ३ ॥

अनपेक्ष्य फलं हि कर्मणः । कुरु कार्यं सततं हरेर्वचः ।
उपदिश्य तथा य आचरत् । तिलकं तं प्रणमामि मत्क्षितेः ॥ ४ ॥

अयि दूरमवाप्य बंधनं । स्थविरत्वेऽपि न मुक्तवान्धृतिम् ।
जनमंगलसक्तमानसः । तिलकं तं प्रणमामि मत्क्षितेः ॥ ५ ॥

— वासुदेवशास्त्री बागेवाडीकर, सोलापूर

'केसरी' ४।८।१९२५.

---

## स जीयाच्चिरम्

( पृथ्वी )

इयं भगवदर्चना कृशजनो यदभ्यर्थितो
भवक्षतिरियं यदार्तवचनक्षतिः साधिता।
हरेरवदधद्वचो य इति नीतवानालय
स्वमायुरपरोपकारनिरतः स जीयाच्चिरम् ॥ १ ॥

स बुद्धिविभवस्तिरस्कृतसमस्तविद्वद्वरः
स च प्रतिभटप्रधर्षणकरो विलासो गिराम् ।
अनादृतसुखेन येन सुसुखं समुत्सर्जितो
ह्यबोधजनताऽवबोधनविधौ स जीयाच्चिरम् ॥ २ ॥

स्तुवत्सु दृढमांग्लराज्यमिह केषुचिन्नेतृषु
परेषु पुनरादिमौपयिकमात्रसंतोषिषु ।

स्वराज्यमथ जन्मसिद्धमधिकारमाघोषयन्
जयाय जनमीरयन् नरवरः स जीयाच्चिरम् ॥ ३ ॥

अशंकसुपभुज्यतां भरतभूमिषेणामिषं
इति प्रथितमानसान् किल विमोहयन्शासकान् ।
सुषुप्तिवशवर्त्यचित्त इव यत्पताकातलं
अशिश्रियदशेष एव विषयः स जीयाच्चिरम् ॥ ४ ॥

वसंति विवसंति वाऽसव इमे जना मामनु
व्रजंति विरजंति वेप्सितमवाप्यते वा न वा ।
स्वदेशपरिमोक्षणार्थमिति येन नालोचितं
स्थितः शिरसि कर्मिणां कृतधियां स जीयाच्चिरम् ॥ ५ ॥

सनाथयितुर्मायिवांस्त्रिदिवमात्मकर्मोचितं
स यद्यपि तथापि किं न सुगुणैः स्वकै राजते ।
अथापि परतंत्रताक्षयकथाऽस्मदीया यथा
प्रयाति प्रथितिं तथा नियमतः स जीयाच्चिरम् ॥ ६ ॥

— रणजितराय, आयुर्वेदालंकार, गुरुकुल, सूपा

'केसरी' ऑगस्ट १९२९

---

# टिळको मार्गदर्शकः

टिळकस्मरणादेव । गलंति त्रीणि तत्क्षणात् ।
रिपुदर्पः कवेर्गर्वः । मानः शीलाभिमानिनाम् ॥ १ ॥

मृत्युः स्वाभाविको लोके । सर्वदा देहधारिणाम् ।
न पुनर्गुणसंघातः । तेषां कालवशो भवेत् ॥ २ ॥

विलीनो लोकमान्योऽभूत् । गतः कालस्तपोऽधिकः ।
यशः शतगुणं चास्य । संवृद्धं मरणादनु ॥ ३ ॥

दैवीसंपदि जातानां । अभयं प्रथमो गुणः ।
निर्भयत्वं निसर्गाद्धि । लोकमान्यस्य विश्रुतम् ॥ ४ ॥

कारावासे तपोरूपाः । षट्समा अतिवाहिताः ।
सम्यगालोडिता तत्र । कार्याकार्यव्यवस्थितिः ॥ ५ ॥

प्रजाकार्यधुरीणोऽयं । स्वभावेनैव केवलम् ।
करवालविहीनोऽपि । विकरालपराक्रमः ॥ ६ ॥

आत्मज्ञानसमुल्लासः । कार्ये कार्ये प्रदर्शितः ।
अतः सर्वेषु कार्येषु । तेन तेजः प्रपूरितम् ॥ ७ ॥

कार्याकार्यविमोहेऽद्य । टिळको मार्गदर्शकः ।
सदा जयतु लोकेऽस्मिन् । मूर्ध्नि पुण्यवतां स्थितः ॥ ८ ॥

— काव्यतीर्थ का. र. वैशंपायन, येवलें

'केसरी' १९२७

---

# तिलकाभिवंदनम्

( वसंततिलका )

लोकाग्रणीर्निखिलबुद्धिमतां वरिष्ठो
योगीश्वरः स्वजनकार्यसदानुरक्तः ।
यः स्वौजसा हि समलंकृतवान् स्वदेशं
तं लोकमान्यतिलकं शरणं प्रपद्ये ॥ १ ॥

निःश्रेयसाभ्युदयसत्पथदर्शयंती
गीतेति या सुकथिता मुनिभिः सुबुद्धैः ।

तस्यां स्तुतः परमपावनकर्मयोगो
युष्माद्भिरेव हि कृतः सुलभो रहस्ये ॥ २ ॥

येनर्षिसन्निभधिया सुसमीक्ष्य वेदान्
निर्णीत आर्यनिलयश्च हि वेदकालः ।
संशोधनं स्तुतमिदं सुतरां प्रतीच्यै-
स्त्वद्धीर्मता भरतवर्षललामभूता ॥ ३ ॥

— भगवंत महादेव कुलकर्णी, कराड

'केसरी' २।८।१९३०

---

## वीक्षे कदा नु तिलकं मम लोकमान्यम्

( वसंततिलका )

अस्मिन्नरा न कति वा जगति श्ववृत्त्या
जायंत आत्मजठरंभरयो नितांतम् ।
आजन्मनः सततमात्महितं विहाय
यः साधयेज्जनहितं तिलकस्त्रिलोक्यः ॥ १ ॥

एतादृशं सकललोकललामभूतं
प्रस्थापितं हृदि जनैरिव यं परेशम् ।
गंगाधरस्य तनयं वरदं वरेण्यं
वीक्षे कदा नु तिलकं मम लोकमान्यम् ॥ २ ॥

स्वातंत्र्यमस्ति मम जन्मत एव सिद्धं
प्राप्तव्यमेव खलु नो विरमामि यत्नात् ।
एवं निधाय हृदि यो यतते स्म नित्यं
तं लोकमान्यतिलकं क्व विलोकयेऽहम् ॥ ३ ॥

बुद्धेः प्रकर्षममरा ननु ते विलोक्य
संमानयोग्यमतिथिं सममानयन्त ।
तत्र स्थितः सदसि चोदय राष्ट्रकार्ये
एतान् जनांस्तिलक बुद्धिमतां वरेण्य ॥ ४ ॥

— वासुदेवशास्त्री बागेवाडीकर, सोलापूर

'केसरी' २।८।१९२७

---

# लोकमान्यस्य पुण्यस्मरणम्

( पृथ्वी )

यदांग्लजनसंस्कृतिप्रसरणाद्वयं मोहिताः
प्रदीपमवलोकनाच्छलभजातयः कीदृशाः ।
तदोदयगिरौ त्विषां पतिरिवात्र रत्नागिरौ
तमोऽपहननाय नस्त्वदुदयोऽप्यभूत्तद्वरात् ॥ १ ॥

प्ररूढजनसंस्कृतेः सदभिमान आत्यंतिकः
स्वराष्ट्रपरतंत्रतानिरसनाद्यहेतौ त्वयि ।
समावसदिदं त्वया सह यदोच्चविद्यालये
विवादमकरोत्सुधारकपिता तदा दृश्यते ॥ २ ॥

कुशाग्रमतिना त्वया विरचितं प्रवाच्यत्रयं
जनोपकरणाय यद्विबुधमान्यमात्यंतिकम् ।
कथं नु विविधप्रवाच्यरचनाक्षमाया धियः
प्रवृत्तिमपसारणात्वमभवः स्वराष्ट्रोन्मुखः ॥ ३ ॥

— विश्वनाथ रघुनाथ रिसबूड, महाड

'केसरी' ४।८।३१

# टिळको युगदीपकः

( वियोगिनी )

सकलभारतदेशनिवासिनः
परवशाः परराज्यपराहताः ।
भगवतोदितमार्तविमुक्तये
स तिलकष्टिळकः प्रथितो जने ॥ १ ॥

अरिजनोद्धरणे विहता रणे
विकलबुद्धिहताः सकला जनाः ।
प्रगतिवर्त्म निदर्शयितुं तदा
समुदितो मुदितो जनमानसे ॥ २ ॥

अदयचित्तसपत्ननिपीडिता
उदयहेतुविशंकितसज्जनाः ।
न निरगादुदितः प्रतिकारवाक्
अभयदो भयदो नयविद्विषाम् ॥ ३ ॥

जनपदे प्रसृतांग्लसरस्वती
धनमतीव पठंतमहो ददौ ।
यदि ननर्त मुखेऽसुरभारती
अविकृतो विकृते टिळको धने ॥ ४ ॥

अभिनवाभिगता नृपपालनी
जनगणा नवपार्थिवपूजकाः ।
" न हि जगाद सुखं परशासनम् "
अनवमो नवमोहहरः स्थिरः ॥ ५ ॥

कति जनाः प्रथिता अधिकारिणः
कति महापदवीधनधारिणः ।
धुरि सतो मतिधैर्यवतां सता-
मधनता धनता टिळकस्य नु ॥ ६ ॥

विधुरवी हि विभूषयतो नभः
सकललोकचराचरजीवनम् ।
अपि तयोर्ग्रहणं टिळकोऽरिणा
निगडितो गडितोत्रद आपदि ॥ ७ ॥

प्रतिहतोऽपि भयंकरसंकटै-
र्न हि चचाल लवं स धृतव्रतात् ।
स्वजनमंगल एव जहावसून्
नृविबुधो विबुधष्टिळको जयेत् ॥ ८ ॥

स्रष्टा स्वराज्यमंत्रस्य । द्रष्टा देशहितस्य च ।
सैष गांगाधरिर्बालः । टिळको युगदीपकः ॥ ९ ॥

— काव्यतीर्थ का. र. वैशंपायन, येवलें

'केसरी' १९४१

---

# तं लोकमान्यं तिलकं नमामि

( उपजाति )

ऐतिह्यके रत्नपुरे सुपुण्ये । स्वराज्यसिद्ध्यै विधृतावतारम् ।
ललामभूतं खलु राष्ट्रदेव्याः । तं लोकमान्यं तिलकं नमामि ॥ १ ॥

स्वदेशसेवाख्यमहद्व्रतं यो । बाल्यात्प्रभृत्यात्मधिया दधार ।
कारानिवासं त्वसकृत्स सेहे । तं लोकमान्यं तिलकं नमामि ॥ २ ॥

जनं स्वकीयं परसेवनोन्मुखं । निःस्वाभिमानं बहु बोधयित्वा ।
यो नष्टमोहं सुतरां चकार । तं लोकमान्यं तिलकं नमामि ॥ ३ ॥

धैर्येण शौर्येण सुविद्यया च । स्वराष्ट्रदेव्यास्तिलकोऽभवद्यः ।
उप्तं च येनेह स्वराज्यबीजं । तं लोकमान्यं तिलकं नमामि ॥ ४ ॥

सुगीतया जिष्णुमजो यथाजौ । जनं रहस्यं नयमादिदेश ।
यः कर्मयोगीति जनैरभाषि । तं लोकमान्यं तिलकं नमामि ॥ ५ ॥

— सुवर्णशर्मा, अक्कलकोट

'केसरी' २२।७।२४

---

## श्रद्धांजलिः

( अनुष्टुभ् )

लोकावतंसीभूतेषु तेष्वभिप्रणता वयं
यैर्मतं शुष्कपर्णाय सर्वस्वं ध्येयपूर्तये ॥ १ ॥

स्वातंत्र्यद्रुममूलेषु यैर्निषिक्तं स्वशोणितं
वीतभोगाभिषंगेषु तेष्वाभिप्रणता वयम् ॥ २ ॥

प्रह्वीभूता वयं तेषु स्वातंत्र्येहा जनेषु यैः
पटुप्रसरतां नीत्वा राष्ट्रतेजः प्रवर्धितम् ॥ ३ ॥

स कार्यसिद्धिमात्रार्थं प्रदत्तनिजजीवितः
स्वासुनिष्क्रमणं यावत्तनुमक्लेशयन्निजाम् ॥ ४ ॥

स्वायत्तत्वं वर्तते मे सत्ता जन्मसहोद्भवा
सा चावश्यं मयाप्तव्या मंत्रस्तज्जीवितस्य हि ॥ ५ ॥

स वेलावप्रवलयां प्रालेयाद्रिकृतावधिं
भारतीं संप्रबोध्याथ मृत्युधाम समाश्रयत् ॥ ६ ॥

— कृ. श्री. अर्जुनवाडकर, पुणें.

'केसरी' ऑगस्ट, १९४५

---

# तिलकस्मृतिः

( वसंततिलका )

गीतारहस्यकथनेन च कर्मयोगं
रूढं कृतं प्रविसृतं शठशाठ्यतत्त्वम् ।
स्वातंत्र्यमंत्रदमुनिर्जनसेवनार्थं
यत्नं सदैव कृतवान् विविधैरुपायैः ॥ १ ॥

( शार्दूलविक्रीडित )

योऽभूत्भारतभूमिभक्तनिकरे सर्वोत्तमः कीर्तिमान्
निद्रानाशनकेसरी अतिमहत्पत्रं च संयोजितम् ।
प्राप्तं यं सुपदं जनेषु मधुरं श्रीलोकमान्याभिधं
तं वंदे तिलकं हि विंशतितमे श्राद्धे दिनेऽहं चिरम् ॥ २ ॥

— दामोदरशास्त्री जोशी, वेळणेश्वर

'बलवंत' रत्नागिरी, ३१।७।४०

---

# स्मृतिर्हि लोकाभ्युदयाय तादृशाम्

( वंशस्थ )

मुमोच राष्ट्रं यवनाक्रमात् शिव-
स्तदर्जितां वाजिग्वर्धयत् श्रियम् ।

ररक्ष नानाभिध 'भानु'रांग्लतो
भवो हि लोकाभ्युदयाय तादृशाम् ॥ १ ॥

स्वराज्यमाप्तं शिवबाजिभानुभी
रथांगनेमिक्रमतो लयं गतम् ।
पदं कृतं हा ! दृढमांग्लसत्तया
विमोहयन्त्या सकृदीक्षणे जनान् ॥ २ ॥

प्रजास्तया कत्यपि वंचिताः समा
मरौ कुरंगा मृगतृष्णया यथा ।
बुधप्रवीरस्तु बभूव भाग्यतः
शुचौ महाराष्ट्रभुवि भ्रमांतकः ॥ ३ ॥

स बालनामा तिलकान्वयोद्भवो
यथार्थतोऽभूत्तिलको धिया नृणाम् ।
प्रदीर्घमासेतुत आहिमाचलात्
कृतामुना जागृतिरत्र भारते ॥ ४ ॥

अतस्तमाहुर्जनकं जनक्रुध-
श्चिरोलतुल्याः परिपंथिनः खलाः ।
विहाय विद्याव्यसनं स्वभावजं
बभूव यो मातृविमोक्षतत्परः ॥ ५ ॥

स्वराज्यमेतज्जनिसिद्धमीप्सितं
वयं च तन्निश्चितमश्नुवीमहि ।
इति प्रतिज्ञाय विसोढवान् स्वयं
चिरं स कारावसतिं सुदुःसहाम् ॥ ६ ॥

यथा पतन्संतमसेऽपि हीरकः
प्रभां वमत्येव तथैव तत्र सः ।

लिलेख गीतोपनिषद्विवेचनं
रहस्यसुज्ञप्रतिबोधहेतुना ॥ ७ ॥

अवाप्य शश्वद्भुवि लोकमान्यतां
दिवंगतः प्रागपि जीवतीव सः ।
यशःशरीरेण पदे पदे स्मृतः
स्मृतिर्हि लोकाभ्युदयाय तादृशाम् ॥ ८ ॥

— कृ. श्री. खांडेकर, बी. ए., बी. टी., अमरावती

'केसरी' १९४५

---

## श्रीमत्तिलकचरितालोचनम्

( वंशस्थ )

समाप्य विद्याध्ययनं यथाक्रमं
स्वमातृमोक्षव्रतपूर्तिकांक्षया ।
नवांग्लशालामथ पुण्यपत्तने
प्रविश्य मोदेन सुशिक्षकोऽभूत् ॥ १ ॥

( सपद्यसौ स्थापितवान् स्वयं तदा )

प्रबोधयन्नित्यमसौ दिने दिने
नवोदितान् पुण्यपुरीनिवासिनः ।
ससर्ज साप्ताहिकवृत्तपत्रके
प्रबोधनायाखिलराष्ट्रवासिनाम् ॥ २ ॥

अवर्षणात्प्रादुरभूद् भयंकरं
प्रजासु दुर्भिक्षमथापि केसरी ।
दिदेश कर्तव्यमथोऽधिकारिणां
परं तु तत्तैर्विपरीतमीक्षितम् ॥ ३ ॥

शिवोत्सवप्रेरकभाषणव्रजे
तथैव तै राजविरोध ईक्षितः ।
जनेष्वसंतोषमिमं विसर्पितं
असह्यमालर्कविषं च मेनिरे ॥ ४ ॥

सपद्यसंतोषविषप्रसारिणं
निचिक्षिपुर्बंदिगृहे प्रशासकाः ।
ततो विमुक्तः स तु वर्षमात्रके
बभौ सुवर्णं हुतभुग् द्रुतं यथा ॥ ५ ॥

मुजफ्फराख्ये नगरेऽग्निगोलकै-
रसूघ्नमत्याचरितं तु वंगजैः ।
यदेतदुद्दिश्य लिलेख केसरी
तदेव दंडार्हममंस्त राजकः ॥ ६ ॥

समीक्ष्य राजध्रुगिति प्रशासकैः
स वर्षषट्कं तिलको विवासितः ।
निशम्य न्यायासनतस्तदुक्तकं
सुधीरमूर्जस्वलमुत्तरं ददौ ॥ ७ ॥

“ यथाऽहमित्थं बहुशोऽस्मि दंडित-
स्ततोऽपि शक्तिः प्रबलास्ति काचन ।
मयैव दिव्यांतगतेन जातु सा
ममेष्टध्येयं परिपूर्तमिच्छति ” ॥ ८ ॥

ततो विनिर्वासित आर्तभारतात्
स मंदले नाम्नि पुरेऽवगुंठितः ।
निनाय वर्षाणि षडुद्यमे रतो
रहस्यमंबंधिनि शांततामये ॥ ९ ॥

यथा सुवर्णं निकषेण घर्षितं
तथा निवृत्तः स विवासनाद् बभौ ।
विवेश लख्नौपुरमीलितां सभा-
मशेषपक्षैर्बहुशः सभाजितः ॥ १० ॥

अनेन लख्नौसमयोऽत्र साधितः
प्रयत्नतो यावनहिंदुपक्षयोः ।
मुमूर्षुरित्थं सुरताधिवेशनात्
सभा पुनः प्राप सजीवतामिमाम् ॥ ११ ॥

स्वराज्यसंबंधिसुधारणाप्तये
जगाम चांग्लान् प्रति शिष्टमंडले ।
चिरोलसंबंध्यपि कार्यमातनो-
दभूच्च कार्यद्वयभारजर्जरः ॥ १२ ॥

निवृत्य देशात् स सभाधिवेशने
उपस्थितोऽभूत्सकृदेव भारते ।
ततो ज्वराक्रांतमभूत्कलेवरं
गतस्तु मुंबां स परप्रयोजनात् ॥ १३ ॥

ज्वरप्रमाणं ववृधे स्पष्टहो
अवाप निर्वाणमसौ प्रदीपकः ।
स्वराज्यमार्गस्थितदीपसंनिभं
चरित्रमेतन्नयनीह नः पुरः ॥ १४ ॥

— कृ. श्री. खांडेकर, बी. ए., बी. टी., अमरावती

'सह्याद्रि' १९४६

# द्रष्टा श्रीटिळको मुनिः

ननाम पार्वती सूर्यं । नंदनं दीप्ततेजसम् ।
कर्णाधिकं सुतं तस्यै । कर्मसाक्षी ददौ तदा ॥ १ ॥

अवर्धत महातेजाः । चंडांशुर्यौवने बभौ ।
प्रधनं शत्रुभिः सार्धं । कारा जन्यस्थली मता ॥ २ ॥

भावपूर्णोऽपि टिळकः । सन्मान्यः शेमुषीमताम् ।
आस्थानसद्मिन जेतासौ । विरोधे महति स्थिते ॥ ३ ॥

स्वदेशद्रोहिणः सर्वे । ते राजपुरुषास्तथा ।
भषंते टिळकं नित्यं । हन्त ते विश्वकद्रवः ॥ ४ ॥

कारागृहेऽपि टिळकः । प्राणैषीत् ग्रंथमुत्तमम् ।
चंदनं पावके दग्धं । समुद्गिरति सौरभम् ॥ ५ ॥

गणरात्रेऽभवत्तस्य । देशमांगल्यचिंतनम् ।
आहोपुरुषिका तस्य । स्वदेशस्यैव गौरवः ॥ ६ ॥

स्वराज्यं भारतीयेभ्यः । आंग्ला वितरितुं स्थिताः ।
ऊहदक्षो हि टिळकः । जघान रिपुमर्मणि ॥ ७ ॥

अद्य वाब्दशतांते वा । मृत्युर्वै प्राणिनां ध्रुवः ।
चेतसीदं वचो ध्यात्वा । सेहे दुःखानि संततम् ॥ ८ ॥

तस्कराणां विरोधेऽपि । मस्करी व्यवहारवित् ।
वर्तमाने स्थितस्यास्य । भाविभावसुचित्रणम् ॥ ९ ॥

यदि श्रीटिळकस्यासीद् । हृदयं नवनीतवत् ।
शत्रुच्छलाग्निसंतप्तं । उपलीभवति स्म तत् ॥ १० ॥

टिळकः सुरतग्रामे । ध्येयभूतः सदा भवेत् ।
प्रयागस्थं प्रवचनं । द्रष्टृत्वं तस्य दर्शयेत् ॥ ११ ॥

न निर्जनवने वासः । न वा कौपीनधारणम् ।
संसारी ह्यपि संन्यासी । द्रष्टा श्रीटिळको मुनिः ॥ १२ ॥

— काव्यतीर्थ का. र. वैशंपायन, येवलें

'केसरी' ऑगस्ट १९.३९.

---

# स्वराज्यात्मतर्पणम्

( शार्दूलविक्रीडित )

निर्यातस्य दिवं शरत्समभवद्यस्य स्वराज्यात्मनो
जातो भास्करसुप्रभात्मकतया यो देवमान्योऽधुना ।
नैष्कर्म्यं निरवर्तयद् भगवता प्रोक्तं य आसंस्थितेः
श्रीबालं तिलकं स्वराज्यहृदयं त्रिस्तर्पयाम्यद्य तम् ॥ १ ॥

स्वार्थत्यागमहाध्वरस्य भरतक्षोणिस्वराज्याचलत्-
सौख्यप्राप्तिफलस्य यूपमिह यः पूर्वं समारोपयत् ।
कारावासफलं तु यस्य जनतासत्ताप्रसारो हितः
श्रीबालं तिलकं स्वराज्यहृदयं त्रिस्तर्पयाम्यद्य तम् ॥ २ ॥

गीर्णो नैव कदापि येन गदितः शब्दोऽपि चैकाक्षरो
न्यस्तं नीतिपथे कदापि न पदं संचालितं स्थानतः ।
इत्थं धीरजनाग्रगण्यपदवीं यः पुण्यभाक् सेवते
श्रीबालं तिलकं स्वराज्यहृदयं त्रिस्तर्पयाम्यद्य तम् ॥ ३ ॥

चेतो यस्य कठोरमाहितमतेर्वज्रात् स्वराज्यार्जने
दृष्ट्वा भीपगादुर्गतिं च कुसुमात् मृद्वात्मपुंसां पराम् ।

इत्थं कंम्युदितेन दिव्यवचसा लोकोत्तरो योऽभवत्
श्रीबालं तिलकं स्वराज्यहृदयं त्रिस्तर्पयाम्यद्य तम् ॥ ४ ॥

यस्यात्मा निजभूस्वराज्यकुसुमे विद्धैकदृक् सर्वदा
तन्नाद्याप्युपलब्धमित्यलमसौ वैकुण्ठमालंबते ।
सत्ता लोकगता च यस्य महतः शांत्यर्थमावश्यकी
श्रीबालं तिलकं स्वराज्यहृदयं त्रिस्तर्पयाम्यद्य तम् ॥ ५ ॥

— विद्यावाचस्पति आत्मारामशास्त्री ओडलमने

'राष्ट्रधर्म' सप्टेंबर १९२१

---

## वंदनांजलिः

( शार्दूलविक्रीडित )

लोकानां हृदये वसन्नपि पुनः को भाषते त्वं मृतः
कर्तव्यं नियतं कुरुष्व कथयन् श्रीकृष्णगीतामृतम् ।
मार्गं च 'प्रतियोग' नाम सुकरं प्रत्यादिशन् बांधवा—
न्यस्त्वं तिष्ठसि देशबंधुहृदये सत्यं चिरंजीवसि ॥ १ ॥

बालो लोकहृदि स्थितो न च मृतो बालं स्मराम्यद्य तं
बालेन स्वतनुः क्षिता जनकृते बालाय तस्मै नमः ।
बालात् कर्मपथो जनैरवगतो बालस्य पुण्या स्मृति-
र्बाले ये त्वयि भक्तिभावनिरता हे बाल तानुद्धर ॥ २ ॥

— के. ना. गोडबोले, बी. ए., चिंचणी

# टिळको धर्मरक्षकः

( रथोद्धता–स्वागता )

धर्मचिंतनपरं हि जीवनं । आर्तरक्षणमथास्य सुव्रतम् ।
द्वंद्वकंपमवधीरयन्सदा । योगिनामिव तपः किल तेपे ॥ १ ॥

मोहितो न प्रमदेक्षणबाणै- । र्वीर एव परमार्थत एकः ।
शुद्धशीलनिकषे यदि घृष्टा । वर्धते विमलता तिलकस्य ॥ २ ॥

गीष्पतिर्नु भुवमागत एव । श्रीपतिर्नु किमु जागृत एव ।
ईदृशाः समुदयंति विचाराः । चिंतने तिलकसच्चरितस्य ॥ ३ ॥

एकतो रिपुजनैः प्रपीडितः । त्वन्यतः स्वजनतः प्रतारितः ।
विव्यथे न हि तथापि यन्मनः । कार्यसक्तमधिकं समुन्नतम् ॥ ४ ॥

भारतीयजनमंगलसिद्ध्यै । तेन तेन विधिना यतमानः ।
सर्वदा परिशिशील च धर्मं । कंपितो झटिति धर्मशरारुः ॥ ५ ॥

बंधनेऽपि बलवान्खलु योगी । तद्रहस्यममलं प्रणिनाय ।
सारभूतमखिलं मनुजस्य । जीवनं ननु जीवनमेव ॥ ६ ॥

' व्यक्तिधर्म उत भारतधर्मः ' । संशयो हृदि समुत्थित एषः ।
बाल आदिशति सर्वजनानां । सांप्रतं भजत भारतधर्मम् ॥ ७ ॥

जीवनं परवशं खलु पापं । युद्धमेव हि वरं परराज्ये ।
अर्जितुं स्वबलतो यतितव्यं । श्रीस्वराज्यमथ भारतसौख्यम ॥ ८ ॥

( अनुष्टुभ् )

स्वाराज्यं स्वाधिकारो मे । सहजं तल्लभेय हि ।
घोषितं तिलकेनैतद् । ग्रामे ग्रामे स्वयं पुरा ॥ ९ ॥

संस्कृतेर्वा स्वधर्मस्य । त्यागस्तस्य न संमतः ।
भारतैक्यं स्वधर्मोऽयं । तिलको धर्मरक्षकः ॥ १० ॥

— काव्यतीर्थ का. र. वैशंपायन, येवलें

'केसरी' जुलै १९४१

---

## श्रीमत्तिलकप्रशंसा

( शिखरिणी )

पुराऽभूद्वाल्मीकिः कविषु गणनीयादिविबुधः-
स्ततो व्यासो भासस्तदनु च कविः शूद्रकनृपः ।
ततः कालीदासः कविकुलगुरुस्त्वन्यकवयो
ऽधुना श्रीमान्विद्वद्वरतिलकराजो विजयते ॥ १ ॥

नृपश्रेष्ठक्रोधाद्वसतिरपि ते बंधनगृहे
ऽभवत्सा सत्कीर्त्यै तिलक जनतायाः सुखकरी ।
न चेदेवं गीतामृतममलमासाद्य च मुखात्
अनेष्यत्प्रेम्णा कः श्रुतिपथमिदं लोकसुखदम् ॥ २ ॥

स्वराज्यं लोकानामुपदिशसि दुःखान्यविरतं
स्वयं भुंक्षेऽथापि प्रकटयसि सौख्यं बहुविधम् ।
गुणानेतान्दृष्ट्वा भवति हृदयं निर्मलमहो
गुरुस्त्वत्तः कोऽन्यस्तिलक जनतायाः शुभकरः ॥ ३ ॥

शुभां बुद्धिं दत्ते तिलक तव गीताऽक्षयसुखं
नियुंक्ते कार्यायालसमपकरोति प्रतिदिनम् ।
विचारान्प्राचीनानपि परिवरीवर्तयति च
न किं किं कुर्याद्वाधिकमिति मनो मे मुदमगात् ॥ ४ ॥

प्रभो गौरीभर्तर् विबुधवर विश्वेश्वर इमां
मदीयां त्वं याञ्चां धनदसख ऊरीकुरु पते ।
जनानंदं बालं द्विजतिलकगंगाधरसुतं
चिरायैनं संजीवय कुरु च कार्यक्षममलम् ॥ ५ ॥

— पुरुषोत्तमशास्त्री गर्गे, नाशिक

'संदेश' १९२०

---

# श्रीलोकमान्यमहिमा

( स्रग्धरा )

पष्ठ्यामाषाढकृष्णे गजनगनगभूसंमितेऽद्वे हि जातो
बालो गंगाधरस्यात्मज इव सुखदोऽभूद्धि गांगाधरिर्यः ।
गत्वा पुण्यां पुरीं यो गणप इव जनैः पूजितः सेवितो वै
कृत्वा गीतारहस्यं यतिरिव विबुधैर्वंदितोऽभून्महात्मा ॥ १ ॥

यः कारागारवासं सुखमिति मुनिवद्भुक्तवान्राष्ट्रकार्ये
यस्त्यक्त्वा स्वार्थबुद्धिं सततमनलसो देशकार्यं चकार ।
यः सर्वैः पूजितोऽलं जनक इव सुतैर्लोकमान्यश्च जातः
प्रागात्स्वर्गं स कृष्णप्रतिपदि हि शुचेर्द्व्यब्धिनागेंदुशाके ॥ २ ॥

— बाळशास्त्री, अथणी

# अथ कर्मयोगिश्रीबालगणेशाष्टकम्

( उपजाति )

विभाव्यते यो मनसापि लोकै-
ज्ञनिक्रियायोगविधौ समर्थः ।
एषोऽत्र चैवैक इति प्रमोदात्
नमामि तं कीर्तिधनं गणेशम् ॥ १ ॥

यं भूगताः कार्यफले स्मरंति
प्रेम्णा परं कर्मविधानदक्षम् ।
बुधा अपि क्षेमकरं महान्तं
नमामि तं कीर्तिधनं गणेशम् ॥ २ ॥

येनेदमत्यूर्जितमंत्यखंडं
समेत्य कीर्त्या शुभभारताख्यम् ।
श्वेतीकृतं मानवशर्महेतुं
नमामि तं कीर्तिधनं गणेशम् ॥ ३ ॥

यस्मै मनो वित्तवपूंषि भक्त्या
विरागिणेऽलं जनताः समर्प्य ।
वयं कृतार्था इति मन्वतेऽलं
नमामि तं कीर्तिधनं गणेशम् ॥ ४ ॥

यस्माद्बिभेति क्षितिदेवमुख्या
जातिक्रियायोगजनोर्नितांतम् ।
रता भवंति ध्रुवकर्मयोगे
नमामि तं कीर्तिधनं गणेशम् ॥ ५ ॥

यस्य प्रभावादखिलानि कर्मा-
ण्याऽऽशु प्रसिध्यंति मनोगतानि ।
इति प्रबुद्धा अपि संवदन्ति
नमामि तं कीर्तिधनं गणेशम् ॥ ६ ॥

यस्मिन्मनोज्ञे यशसा विनायके
निर्विघ्न ईशे प्रणिधाय चेतः ।
लभंत ऋद्धिं परमामभीष्टां
नमामि तं कीर्तिधनं गणेशम् ॥ ७ ॥

गांगाधरे बालगणेश लोक-
मान्य प्रसिद्धाऽजरकीर्तिकाय ।
रक्षस्व विघ्नांस्तु विनाश्य भूयो
भक्तान्सवर्गो विजयी भवाऽऽशु ॥ ८ ॥

—पं. बाळशास्त्री, अथणी

---

## हा हन्त बालविरहः कथमेष सह्यः

( वसंततिलका )

हे राष्ट्रदेवि ! विफलं तव भागधेयं
मन्येऽद्य भग्नमथवा ग्रसितं यमेन ।
अस्तंगतः सुखपथस्य तव प्रदीपो
हा हंत बालतिलको विधिना विलुप्तः ॥ १ ॥

बालः कदापि च विपन्नदशांगतोऽपि
सिंहो मृगैर्जित इति श्रुतमीक्षितं न ।
किं वच्मि दैवमिह नः कवलीकृतोऽद्य
हा हन्त बालहरिरंतकजंबुकेन ॥ २ ॥

येन स्वराज्यतरुबीजमतंद्रमुप्तं
येनालवालमुपदेशमयं निखातम् ।
तस्याग्रिमे सुखसमागमकाल एव
हा हंत बालतिलकः क्व स माल्यकारः ॥ ३ ॥

यस्याग्रतः किमपि भाषितुमक्षमा ये
'नो नो' किमस्य पुरतो वयमित्यवोचन् ।
तस्मिंश्च भूमितिलकें त्वयि खं प्रयाते
हा हंत ते परमितः कथमालपंति ॥ ४ ॥

सह्योऽपि भ्रातृविरहो जनकस्य वापि
नेदृग्भिनात्ति हृदयं जननीवियोगः ।
पत्न्या अपीति न दुनोति भृशं परं तु
हा हंत बालविरहः कथमेष सह्यः ॥ ५ ॥

— पुरुषोत्तमशास्त्री गर्गे, नाशिक

'कीर्तन' १९२०

---

# तिलकं मनसा स्मरामि

( वसंततिलका )

येन स्वबुद्धिबलतोऽखिलपंडितानां
लब्धार्हणामिह यशो भरतस्य भूमेः ।
अत्युज्ज्वलं कृतमहो विविधैः प्रयत्नैः
तं लोकमान्यतिलकं मनसा स्मरामि ॥ १ ॥

विघ्नैः पुनः पुनरपि प्रतिहन्यमानो
योऽवर्तत प्रचुरनिर्भयवृत्तिनैव ।
आरब्धकर्मणि च योऽविरतोद्यमोऽभूत्
तं लोकमान्यतिलकं मनसा स्मरामि ॥ २ ॥

आसीत् सदा खलु निजार्थपराङ्मुखो यः
संपादितं तदपि यस्य परार्थहेतोः ।
यः सानुजं दयित-केसरिणं पुपोष
तं लोकमान्यतिलकं मनसा स्मरामि ॥ ३ ॥

गीतापयो भगवतार्पितमर्जुनं यत्
हैय्यंगवीनमिव तस्य महार्हसारम् ।
गीतारहस्यचषकान्नु येन दत्तं
तं लोकमान्यतिलकं मनसा स्मरामि ॥ ४ ॥

सामर्थ्यमस्ति जनजागृतिकारि यत्ने
तत्रेश्वरस्य वसतिस्तु भवेदवश्या ।
तस्मात्प्रवर्तितगणेशमहोत्सवोऽसौ
तं लोकमान्यतिलकं मनसा स्मरामि ॥ ५ ॥

गंगोदकेन सदृशं विमलं चरित्रं
संलक्ष्यते स्म सकलैर्विविधात्ययेषु ।
यस्यैव देवमिव यं मनुजा भजन्ते
तं लोकमान्यतिलकं मनसा स्मरामि ॥ ६ ॥

— विश्वनाथ रघुनाथ रिसबूड, महाड

'केसरी' १९३२

---

## कर्मयोगामृतम्

तिलकं तिलकाचार्यं । बालं गांगाधरिं गुरुम् ।
रहस्यस्य प्रणेतारं । प्रणमामि पुनः पुनः ॥ १ ॥

अनुयोगेश्वरं कृष्णं । स्मृतिशेषमुपागतम् ।
धूमावृतं यथा वन्हिं । धमन्या बोधयेद् बुधः ॥ २ ॥

तथा तु बोधयामास । कर्मयोगं महामतिः ।
प्राबोधयत् जगत्कृत्स्नं । ज्ञानदीपेन भास्वता ॥ ३ ॥

कृतं ग्रंथार्णवस्यास्य । मंथनं पूर्वसूरिभिः ।
भक्तिज्ञानादिरत्नानि । ते च प्रापुर्मनीषिणः ॥ ४ ॥

अमृतं कर्मयोगाख्यं । प्राप्तवानयमेव हि ।
पाययामास यद् दीनान् । तृषार्तान्नः कृपाकरः ॥ ५ ॥

— गो. का. सहस्रबुद्धे, बागलकोट

---

# तिलकनिधनम् ।

( अनुष्टुभ् )

यश्चोपनाम्ना टिळको भूदेव्यास्तिलकायितः ।
गंगाधरात्मजो बालः पुण्यपत्तनसंस्थितः ॥ १ ॥

विद्याकलासु कुशलः सच्छीलो लोकविश्रुतः ।
अशेषभारतेयानां सेनानीव परिवृढः ॥ २ ॥

धैर्यशाली सत्यनिष्ठो लोककल्याणतत्परः ।
लोककल्याणकारित्वाल्लोकस्यात्माऽभवन्मुनिः ॥ ३ ॥

यद्धि लोकहितं नूनं स्वहितं तदमन्यत ।
अतो देशसमुन्नत्यै संततं यत्नमाचरत् ॥ ४ ॥

दुःखान्यविगणय्यैव स्वार्थं संत्यज्य निःस्पृहः ।
अज्ञानिनो जनान् सर्वान् कर्तव्यविमुखान्सदा ॥ ५ ॥

केसर्याख्याद्वृत्तपत्रात्कर्तव्यार्थमबोधयत् ।
ततः प्रापन्मतिमतां वरोऽसौ लोकमान्यताम् ॥ ६ ॥

एवंविधं महात्मानमपरं सुरमंत्रिणम् ।
निरीक्ष्य सुरराजोऽपि निर्णेतुं धर्मशासनम् ॥ ७ ॥

सुधर्मिण्यनयत्किं नु धर्माधिकरणे शुभे ।
तथाप्यनिष्टमापन्नमत्र तत्क्रमजं फलम् ॥ ८ ॥

निरीक्षितुं लभ्यमानं बत हा ! स न विद्यते ।
निर्णेतृकोऽयं संवृत्तो देशो हि तमसावृतः ॥ ९ ॥

– ओडलमने इत्युपाह्वः श्रीपांडुरंगशास्त्रितनयः

'आचार्य पाक्षिक' १९४२

---

## रहस्यगौरवः

(आर्या)

श्रीमद्भगवद्गीताव्याख्यातिलको व्यधायि तिलकेन ।
निष्कामकर्मयोगात्सौभाग्यं यो व्यनक्ति जनतायाः ॥ १ ॥

– वि. ह. निजसुरे, भूतिधर-संस्कृताध्यापक, धुळें

---

## टिळकस्मरणम् ।

(उपजाति)

यः पारतंत्र्यप्रतिमोचनाय
स्वमातृभूमेरमितान्प्रयत्नान् ।
कुर्वन्न निद्रामपि लब्धवान् यः
तं लोकमान्यं तिलकं स्मरामि ॥ १ ॥

यस्तु स्वदेशोद्धरणार्थमेव
स्वदेशसेवानिरतो बभूव ।
कारागृहे यस्य चिरं निवासः
तं लोकमान्यं तिलकं स्मरामि ॥ २ ॥

खपक्षनंदेंदुमिते सनाब्दे
यो मोहमय्यां च विमोह्य लोकान् ।
दिवंगतोऽभूच्च दिगंतकीर्तिः
तं लोकमान्यं तिलकं स्मरामि ॥ ३ ॥

— गीर्वाणभूषण त्र्यं. ब. अभ्यंकर

'केसरी' ३।८।२४

---

# लोकमान्यालंकाराः ।

[ अलंकारस्वरूपाणि श्रीमत्तिलकचरितमुद्दिश्य विरचितानि कत्युदाहरणानि – तत्रभवद्भिः श्रीमत्करमळकरशास्त्रिभिः 'इंदूरनिवासिभिः' विरचितात् श्रीलोकमान्यालंकारग्रंथात् – उद्धृतानि ]

## अनन्वयालंकारः

( मालिनी )

अनुपमसुखहेतुं निःस्पृहैणैकगम्यं
यदधिजगति कर्तुं धीमतामप्यशक्यम् ।
तनुधनहृदयैस्तद् राष्ट्रकार्यं सुकुर्वन्
भुवनतिलक ! नूनं त्वत्समोऽभूस्त्वमेव ॥ १ ॥

## प्रतीपम्–अलंकारः

( शार्दूलविक्रीडित )

गर्वं मा वह लोकसेवनकला ज्ञाता मयैवेति भो-
स्त्वत्तुल्या जनसेवकास्तु बहवः श्रीमोहनाद्या इह ।

वर्तें सत्यवचा इतीह विपुलं गांधे ! न दर्पं धर
त्वत्तुल्यस्तिलकोऽपि सत्यवचनश्चासीत्तदानीमपि ॥ २ ॥

## व्यतिरेकालंकारः

( शार्दूलविक्रीडित )

गोविप्रेशशिवप्रियः सुजनतावासः सदा चोन्नतः
क्रामत्केसरिणा स्वकीयपरयोर्निर्भीतिभीतिप्रदः ।
शक्यो नाक्रमितुं विना परिचितानेवं समस्त्वं च सः
किं तु त्वं खलु चेतनः स तु सदा श्रीसिंहदुर्गो जडः ॥ ३ ॥

## सहोक्तिः अलंकारः

( स्रग्धरा )

बाल त्वं नैव दृश्यः सह दिनमणिना चास्तमद्य प्रयातः
इत्येतद्राजबिंबं सह निजप्रभया वर्धते प्राक् सकोपम् ।
किंचोन्मत्तास्तदीया सहकुमुदवनैर्मोदमायांत्यपूर्वं
निर्भीकाः कोशराशिं सह निजमधुपैर्भुंजते ते यथेच्छम् ॥ ४ ॥

## विरोधाभासालंकारः

( शार्दूलविक्रीडित )

एकस्मिन्विषये स्थितोऽपि बहुधा देशेष्वनेकेष्वटन्
स्थानं ते नृपबंधनेऽपि सततं चोक्तः स्वतंत्रो जनैः ।
स्वार्थे निःस्पृहमानसोऽपि सततं स्वाराज्यवांछाकुलः
स्वर्गस्थोऽपि च मर्त्यलोकमनिशं ब्रूषे यशोवर्त्मना ॥ ५ ॥

## विषमालंकारः

( शार्दूलविक्रीडित )

मश्या **कृष्णमुखी द्विजिह्ववदना** श्यामापि ते लेखनी
सूते **लेखसुधां तथा** सितयशस्तुष्येन्मनो येन नः ।

हास्यं कारयितुं जनेषु भवतो लोकाग्रगस्योद्यतै-
राङ्ग्लैः प्रत्युत कारितं त्रिभुवने स्वस्यैव हास्यं चिरम् ॥ ६ ॥

## समालंकारः

(अनुष्टुभ्)

पुण्ये कर्माणि ते बुद्धिरुचिता पुण्यवासिनः ।
भारतं भारतं कर्तुं योग्यस्त्वं भारतोद्भवः ॥ ७ ॥

## सारालंकारः

( शार्दूलविक्रीडित )

आप्तप्रेम वरं ततो वरतरं सन्मित्रवर्गे स्थितं
पुत्रे स्वे विहितं ततो वरतमं श्रेष्ठं स्वधर्मे ततः ।
तस्मादप्यधिकं हितैषिपितरि श्रीबाल ! ते संस्तुतं
सर्वस्मादधिकं त्वयात्मजननीश्रीमातृभूमौ कृतम् ॥ ८ ॥

## समुच्चयालंकारः

( शार्दूलविक्रीडित )

आबाल्याद् मरणावधि स्वहृदये धृत्वा चिरं स्थापितं
लोकैः स्वेन च कारितं कृतमिदं सद्देशसेवाव्रतम् ।
पश्यंति प्रथरंति दिक्षु सततं शंसंति गायंति ये
दृश्यंते विरला भुवि प्रतिगृहं ते भाग्यवंतो जनाः ॥ ९ ॥

विप्रत्वं सुकुलं जनिः श्रमभरं संसव्यसंजीवनं
विद्वत्वं समयोचितं नयपरं संभाषणं लेखनम् ।
देशस्योद्धरणे सदा प्रयतनं नानाविधं कल्पनं
निर्भीकत्वमुदारता च भुवने लोकादरं त्वाऽनयद् ॥ १० ॥

### तद्गुणालंकारः ।

( शार्दूलविक्रीडित )

शुक्लत्वं जरसा कृतं समधरन् केशाः सुकृष्णा अपि
बालत्वं तत एव तेषु सुजनैः संस्थापितं सर्वदा ।
कीर्त्या शारदचंद्रिकासुसदृशी मूर्तिस्त्वदीया शुभा
नानावर्णजनैः सुवर्णितमिदं हृद्यं स्वरूपं दधौ ॥ ११ ॥

### स्वभावोक्ति-अलंकारः

( शार्दूलविक्रीडित )

उष्णीशं निजमूर्ध्नि रक्तमनिशं रम्योपवस्त्रं गले
वामे दक्षिणके करे सुदधतीं सत्पुस्तकं यष्टिकाम् ।
अङ्घ्र्योर्दक्षिणसंज्ञके सुललितं चोपानहौ कुर्वतीं
मूर्तिं पूगिफलस्य चर्वणकरीं के विस्मरेयुस्तव ॥ १२ ॥

### हेतु-अलंकारः

( अनुष्टुभ् )

परतापं स्वयं सोढ्वा स्वाश्रितस्य सुखाय च ।
हिंदभूमौ रूढपादो बालोऽक्षय्यवटोऽस्ति नः ॥ १३ ॥

– पं. गजानन रामचंद्र करमळकरशास्त्री

---

## लोकमान्यविरहाष्टकम् ।

( मंदाक्रांता )

लोभो नासीदणुरपि कदा ते तु कस्यापि लोके
तेनाऽभूस्त्वं सकलगुणतो वंदनीयो गुणाढ्यः
कर्तव्यं स्वं जगति सततं लोकसेवामजानाः
किं ते नाभूद्रुचिरिह यतः स्वर्गतो लोकमान्य ॥ १ ॥

मान्यः सर्वैः सततमभवस्त्वं गुणैर्भारतीयै-
स्त्वत्सेवार्थं सकलजनता तत्परा नित्यमासीत् ।
न्यक्कारं त्वं सततमकरोः पारतंत्र्येच्छुजंतो-
स्त्यक्त्वा नस्त्वं गमनमकरोर्हा कथं लोकमान्य ॥ २ ॥

बाल्या स्तुत्या जनहितकरी ते तु नित्यं मनीषा
स्वार्थः श्रेष्ठो मनसि तु कदा ते न जातः परार्थात् ।
लब्धव्यं स्वं जगति परमं निश्चितं ते स्वराज्यं
न प्राप्तं ते तदिति किमु हा स्वर्गतो लोकमान्य ॥ ३ ॥

गंगेवास्ते सकलजगतस्ते तु मूर्तिः पवित्रा
कार्यं स्वीयं मनसि निहितं न त्वया प्रोज्झितं ।
गायंति त्वां प्रचुरमनघैस्ते गुणज्ञा गुणौघैः
स्वर्गं गंतुं तव मतिरितोऽभूत्कथं लोकमान्य ॥ ४ ॥

धन्यं मन्ये नरमणिमहं त्वां हि लोकैकपूज्यं
शोकं नित्यं विदधाति यतस्त्वत्कृते सर्वलोकाः ।
रक्तश्चासीस्तनुधनमनोभिः सदा राष्ट्रकार्ये
कैलासस्ते रुचिकर इतो हा कथं लोकमान्य ॥ ५ ॥

तिग्माश्चासन्जगति मनुजा ये त्वदीये सुमार्गे
तांस्त्वं हत्वा सुलभमकरोर्बुद्धिशस्त्रेण मार्गम् ।
लक्ष्म्या तुल्यं चपलमभवत्ते तु शीलं न जातु
उद्धर्तुं नो विपदि पतितान्नासि हा लोकमान्य ॥ ६ ॥

कः क्षुद्रोऽपि प्रथितयशसं राष्ट्रकार्ये धुरीणं
नाजानात्त्वां नरवरगुरुं भारते वर्तमानः ।
प्रीत्या नित्यं सदसि परमं राष्ट्रतत्त्वोपदेशं
कुर्वाणोऽस्तं गत इति मनो दूयते लोकमान्य ॥ ७ ॥

यत्नं नित्यं बहु विदधता नेह केनापि लब्धा
सा तेऽपूर्वा सुकृतपदवी लोकमान्येत्यभिख्या ।
तां ते मूर्ति हतविधिरयं हा कथं संजहार
शून्यं सर्वं जगदिदमभूत्त्वां विना लोकमान्य ॥ ८ ॥

— पं. गजानन रामचंद्र करमळकरशास्त्री

'कीर्तनमासिक' शके १८८२.

---

## नृवीरस्तिलकः

( मालिनी )

बालो भूत्वा ध्रुव इव यशोदेहमासाद्य लोके
जातोऽसि त्वं तिलक सकलोत्तंसभूतो यथार्थः ।
द्रव्योन्मत्ताः कति न मनुजा विद्यया चाधिकारै-
र्धिक्तान्स्वार्थतृषितमनसः सर्वदा भीतिबद्धान् ॥ १ ॥

( उपजाति )

धैर्यं यदि स्यात्पुरुषे विपत्तौ कीर्तिं प्रसूते प्रचुरां प्रकामम् ।
दृष्टांतमत्रार्यमहीसुपुत्रं उदाहरामस्तिलकं प्रसिद्धम् ॥ २ ॥

( मंदाक्रांता )

श्रीमान्सार्थस्तिलकभुवनेऽस्मिंस्त्वमेकोऽसि सत्यं
त्वय्येवास्ति प्रचुरसुयशोवित्तराशिर्जगत्याम् ।
मान्यो लोके भवति पुरुषस्त्वादृशो मानवित्तो
धीरश्चापन्निकषदृषदि प्रायशो यः प्रघृष्टः ॥ ३ ॥

( शिखरिणी )

प्रतिच्छायास्त्वेवं जगति पुरुषः कोऽर्चित इह
प्रगीतो वाप्येवं विविधरचनाभिर्बहुजनैः ।

प्रदीपैर्वाद्यैर्वा प्रथितसुयशाः कः खलु कृती
कृतप्रेमोत्साहोत्सव इव नृवीराद्धि तिलकात् ॥ ४ ॥

— पांडुरंग गोविंदशास्त्री पारखी

---

# टिळकसूत्राणि

[ 'टिळकसूत्रें' इत्येतन्नामकं पुस्तकं मराठीभाषायां तपोद्वयमितेभ्यो वर्षेभ्यः प्राक् स्वयं संकलकेनैव लिखितमासीत्। ततः संस्कृतभाषायामनुवादितानि इमानि टिळकसूत्राणि ]

यावद्धर्मावलंबी स्यात्तावद्देवो नरेश्वरः।

* * *

न दंभरूपा भक्तिस्तु मनःसंस्कारशिक्षिका।

* * *

भावना बलवती भवेद्यदि। सा ददाति समुपासनाफलम् ॥

* * *

कथाश्रवणमात्रेण। न मोक्षः सुलभः कदा।
ईशचिंतापरेणैव। भाव्यं चित्तेन सर्वदा ॥

* * *

स्वादो नान्नगतो किंतु श्रम एव प्रतिष्ठितः।

* * *

प्रयत्नफलदो देवः न पदार्थं समानयेत्।

* * *

यदि हिंदुत्वहीना स्यान्निष्फला जनतोन्नतिः।

* * *

आराधना बहुविधा प्रगतिः सा निगद्यते।

* * *

राजसत्ता ह्यगतिका तत्त्वज्ञानविनाशने ।

* * *

यदीश्वरपदं दातुं समर्थो धर्मभास्करः ।
का कथा प्रापणे तस्य राजसिंहासनस्य नु ॥

* * *

अभेदः सर्वदा ज्ञेयो राजकारणधर्मयोः ।

* * *

विघ्न एव समुत्कर्षसोपान इति मे मतिः ।

* * *

शृंगापत्तौ गृहीतो हि दाता दानं करिष्यति ।

* * *

विरागी यदि वैश्यः स्यात् हतः सैव चिरंतनः ।

* * *

विद्वद्हीनं यदा राष्ट्रं । मृतं तत्परिकीर्त्यते ॥

* * *

देवो यत्नस्वरूपो हि । वाङ्मात्रेण न लभ्यते ॥

* * *

न हि विच्छेदने धर्मः । ऐक्ये धर्मः प्रतिष्ठितः ॥

* * *

ईष्टे राजा शरीरस्य स्वतंत्रं सर्वदा मनः ।


* * *

मन्यंते ते धर्मनष्टाः । देशं देवं पृथक् पृथक् ।

* * *

अहो ईशस्यावतारा वारंवारं भवंति नो ।
विशेषेष्वेव कालेषु स्थानेषु विहिताः सदा ॥

— अनुवादकः टिळककाव्यसंकलकः



“ प्रभु या एका खांद्यावर उभि महाराष्ट्रद्वारका ” – कवि गोविंद

[ श्री. महाबळ, नाशिक यांच्या कृपेनें

॥ श्रीतिलकाय नमः ॥

# काव्यमय टिळक

## मराठी विभाग

★

### लोकमान्य टिळकांची भूपाळी

( साठाव्या वाढदिवसानिमित्त )

जय जय टिळका अपरसमर्था धीरा धीभास्करा ।
शुभकरा । धीरा धीभास्करा ।
मायभूमि ही करित आज तव जन्मोत्सव साजरा ॥ ध्रु० ॥

जो जो बाळा जो जो टिळका जो जो गुणसुंदरा ।
उदारा । जो जो गुणसुंदरा ।
तुझा पाळणा आज डोलवी जनप्रीति प्रियकरा ॥ १ ॥

आर्यजनमनें सुगंधसुमनें भूमाते, घे करीं ।
सत्वरी । भूमाते घे करीं ।
टिळकसुतावर उधळ कुतुहलीं वात्सल्याच्या सरी ॥ २ ॥

उधळुं कीर्ति ती उधळूं भूति ती उधळुं भक्ति-नति खरी।
स्तुतीसह। उधळुं भक्ति-नति खरी।
स्वकीय क्षमता संतत उधळूं टिळकहृद्गतावरी ॥ ३ ॥

ज्ञानरवीचा उषःकाल तो बालतिलक जाहला।
तेधवा। बालतिलक जाहला।
मूढावस्था फोडुनि आता विजयनभीं ठाकला ॥ ४ ॥

हृदयोहृदयीं प्रकाश पडला स्वत्वाचा धृतिहर।
हितकर। स्वत्वाचा धृतिहर।
जागृतिलोचन आले प्रगतिस उदयोन्मुख सुंदर ॥ ५ ॥

आर्यजनमनें सहस्रकिरणें सहस्रकर तो हंसे।
टिळक हा। सहस्रकर तो हंसे।
प्रताप त्याचा आशागगनीं निश्चित भरला असे ॥ ६ ॥

सुदैववनिंच्या भविष्यतरुवर बसुनि आत्मशक्तिची।
प्रचितिची। बसुनि आत्मशक्तिची।
विवेक कोकिळ गाउं लागला भूपाळी मुक्तिची ॥ ७ ॥

शुभयत्नांचा निसर्ग हळुहळु फुलत चालला नवा।
एधवां। फुलत चालला नवा।
त्वत्तेजानें टिळकभास्करा जयदेवा धीधवा ॥ ८ ॥

उद्धरणाचीं, उल्हासाचीं, स्तोत्रें मुखिं नाचतीं
मनाच्या। स्तोत्रें मुखिं नाचतीं।
विश्वासाचीं साश यशाचीं वाद्यंत्रें वाजतीं ॥ ९ ॥

संशयअभ्रें गर्दी करितीं मनावरी वरिवरी।
जरि तरी। मनावरी वरिवरी।
उपदेशाचा पवन तुझा तो सारी परि तीं दुरी ॥ १० ॥

(चाल) धृतिहर दुःखावली । जशीं तीं ।
ग्रहणें तुज लागलीं । तशीं तीं ।
निर्भय तूं सोशिलीं । अशीं तीं ।

व्यसनच्छळानें अधिक झळाळे त्वत्प्रतिभा भास्वरा
भूवरा । त्वत्प्रतिभा भास्वरा ।
आत्मश्रीचा अभयहस्त तो त्वच्छिरिं देशांवरा ॥ ११ ॥

— २ —

टिळक नव्हे हें श्रीगीतेचें हृदय प्रकट जाहलें ।
ज्ञानमय । हृदय प्रकट जाहलें ।
कर्मयोग तो शिकवायाला आर्यजनीं धांवलें ॥ १ ॥

कार्यकुशलता नीतिचतुरता श्रीहरिची जन्मते ।
टिळकमिष । श्रीहरिची जन्मते ।
विघ्नांशीं झुंजते मांडिते डावावरि डाव ते ॥ २ ॥

परिस्थितीनें प्रभुदयेनें सुगुणगुणीं गुंफिला ।
चांगला । सुगुणगुणीं गुंफिला ।
निजोन्नतीचा भद्रहार हा भूकंठीं घातला ॥ ३ ॥

जनभाग्यांतुनि हिमालयांतुनि गंगौघचि हा पुढें ।
धांवला । गंगौघचि हा पुढें ।
राष्ट्रिय दुर्गुण धूत चालला मोक्षसागराकडे ॥ ४ ॥

मनोबलफणाशेष टिळक हा करीतसे प्रार्थना ।
प्रभूला । करीतसे प्रार्थना ।
"अधर्मदहनना चला उठा हो विक्रमनारायणा" ॥ ५ ॥

परमेशाचा जाहिरनामा टिळकरूप लागला ।
वाचला । टिळकरूप लागला ।
" प्रभुवर भूवर येईल आतां दिनांच्या पालना " ॥ ६ ॥

देशभक्तिचें कल्पद्रुमवन विस्तारी केसरी ।
जनहृदीं । विस्तारी केसरी ।
आशा वाटे फुलेल खुलेल वसंत तो लवकरीं ॥ ७ ॥

सुबोधवीणा करीं झणाणा नाच स्वावलंबना ।
मयूरा । नाच स्वावलंबना ।
टिळकांची वाग्भगवति गाते राष्ट्रगीतगायना ॥ ८ ॥

नव्हे टिळक हा स्वार्थत्यागचि महाभाग भासतो ।
साच तो । महाभाग भासतो ।
उपकृतिधृतिसह उदारता ती जनांवरी उधळितो ॥ ९ ॥

नव्हे टिळक ही आत्मश्रद्धा शिवरायाची असे ।
खरोखर । शिवरायाची असे ।
निश्चयनिग्रह भगवाझेंडा करांत झेलीतसे ॥ १० ॥

रामदासकृत रघुरायाची उपासना ही म्हणूं ।
खरोखर । उपासना ही म्हणूं ।
धीरश्रीनें वीरश्रीनें भयास भिववी जणूं ॥ ११ ॥

विद्वत्तेच्या अंकावरती देशभक्ति खेळते ।
टिळक ही । देशशक्ति खेळते ।
बंधुप्रीती गीतें गाते समता ती डोलते ॥ १२ ॥

पूत ध्येय तें पूत कार्य तें त्वदाचार पूत तो ।
मूर्त तो । त्वदाचार पूत तो ।
स्वदेशमंगल मंगल हेतू हृदयिं तुझ्या नाचतो ॥ १३ ॥

## काव्यमय टिळक

६७६२ ५१
६९७

किती धन्यता किती मान्यता किती पूज्यता परा ।
नरवरा । किती पूज्यता परा ।
स्वयं कीर्ति ती चामर ढाळी तुजवरं ज्ञानेश्वरा ॥ १४ ॥

तव अनुशासन जनसंजीवन सिंहासन तुज नसे ।
फक्त तें । सिंहासन तुज नसे ।
सार्वभौम भूपाळ परी तूं जनादराचा असे ॥ १५ ॥

तुझी योग्यता भारी भारी जनता ऐसें वदे ।
विचारी । जनता ऐसें वदे
असंख्य तरवारींचे मुजरे झडावेच तुजपुढें ॥ १६ ॥

मुक्या मनानें किति उधळावे शब्दांचे बुडबुडे ।
तुझ्यावर । शब्दांचे बुडबुडे ।
तुझे पवाडे गातिल पुढती तोफांचे चौघडे ॥ १७ ॥

कुशल असो हा विजयि असो हा टिळक जगन्नायका
आयका । टिळक जगन्नायका ।
प्रभु या एका खांद्यावर उभि महाराष्ट्र द्वारका ॥ १८ ॥

(चाल) ऐक्याचा हेरंब । टिळक हा ।
मुमुक्षुचा अवलंब । टिळक हा ।
विजयाचा प्रारंभ । टिळक हा ।

ऊठ पूज्यते अश्रुजलतते । अभिवादन देवते ।
मन्मते । अभिवादन देवते ।
पुण्यपुराला टिळक पदाला समर्पि मद्भाल तें ॥ १९ ॥

— स्वातंत्र्यभाट कवि गोविंद, नाशिक

‘ स्वातंत्र्यकवि गोविंद यांची कविता ’
प्रकाशक : कृ. ब. मह्बळ, नाशीक.

# अनभिषिक्त भूपति

( भूपाळी )

अनंत तुज प्रणिपात दयाळा सुजन सुमंगलकरा । दयाळा ।
स्वातंत्र्याच्या संता टिळका सुमनांजलि ही वरा ॥ १ ॥

पश्चिमदिक् सिंधूनें गिळितां स्वसाम्राज्यदिनमणी । दयाळा ।
पारतंत्र्यतमिं राष्ट्र सांपडे स्वजनव्यसनकाननीं ॥ २ ॥

त्यास तारण्या कांहीं तारे देशभक्त चमकले । दयाळा ।
विष्णुमंगलासम परि ते झणिं अस्तंगत जाहले ॥ ३ ॥

मांगल्याचा मार्ग शोधितां तदा लोक श्रमले । दयाळा ।
सर्वस्वातें तस्कर लुटितां स्वातंत्र्या मुकले ॥ ४ ॥

अशांत राष्ट्रीय सुगुणचंद्रिका प्रकाशित निर्मला । दयाळा ।
बुधेंद्रभद्रा ! टिळका ! चंद्रा तुझा उदय जाहला ॥ ५ ॥

तुझा उदय जाहला कशाचा भाग्योदय ठाकला । दयाळा ।
निजोन्नतीच्या स्वातंत्र्याच्या मार्गी जन लागला ॥ ६ ॥

बोधामृत वर्षतो निरंतर तुझा किरण केसरी । दयाळा ।
म्हणुनिच हें मृतराष्ट्र सुराष्ट्रिय चैतन्यातें वरी॥ ७ ॥

देशभक्तिचा सुंदर तरु तूं आर्यराष्ट्रिं लाविला । दयाळा ।
श्रीनरहरिच्या कृपें धरिल तो स्वातंत्र्याच्या फला ॥ ८ ॥

राष्ट्रजागृती संघशक्तिस्तव गणाधीश प्रार्थिला । दयाळा ।
स्वातंत्र्याचा देव शिवप्रभु महोत्सवें नटविला ॥ ९ ॥

स्वलोकमान्या तुझे वदान्या किती स्मरूं उपकार । दयाळा ।
देशमंगलासाठिं भोगिलें त्वां बा कारागार ॥ १० ॥

सुदीन आम्हीं कृतज्ञ आम्हीं तुझ्या शीर्षभागिं ते । दयाळा ।
प्रेमाश्रूंची धारा धरितों ' अनभिषिक्त भूपते ' ॥ ११ ॥

( चाल ) होवो जगीं तव जयजयकार
तसाच उत्सव प्रेमपुरःसर
राष्ट्रविभूते तुला दयाकर
करो चिरायु तो परमेश्वर

तुझ्या प्रयत्नें तुझ्या देखतां वसुंधरा सुंदरा । दयाळा ।
लेवो श्रीमत्स्वातंत्र्याचा भुवनरुचिर विजवरा ॥ १२ ॥

— स्वातंत्र्यभाट कवि गोविंद, नाशिक

' स्वातंत्र्यकवि गोविंद यांची कविता '
प्रकाशक : कृ. ब. महाबळ, नाशिक.

---

# श्रीटिळकस्तव

( ही कविता वीर सावरकर यांनीं वयाच्या १७ व्या वर्षी रचिली आहे. )

लाजविलेंस निजयशें धवलें त्वां सत्य हिमनगा तिलका ।
संतत जनपदसेवार्पित तूं तुज कवि न गान गातिल कां ? ॥ १ ॥

अनलसजनकार्यातें आर्यातें रक्षि शंभु टिळकातें ।
शुक्लेंदुयशें लज्जित तेथें होतील ना कुटिल कां तें ॥ २ ॥

स्वार्थास्तव ना केलें दुष्कृतिमंडन कदापि तिलकानें ।
यत्कीर्तिश्रवणामृत दुर्लभ सज्जन सदा पितिल कानें ॥ ३ ॥

जनसेवेस्तव झटतां झट कारीं नेति बाळ टिळकाला ।
दुःसह छल सोसावा लागे या आर्यभालतिलकाला ॥ ४ ॥

परि धीर धरी केसरि सरि पार्था ना शरासनाचि टाकी ।
कीं केसरी सरीं जें पात्रत्व न तें "सरास नचि" टाकी ॥ ५ ॥

दृढ स्नेह असे जो जो राष्ट्रहितोद्युक्त त्यांशिं तिलकांचा ।
राष्ट्रविघातक अरिच्या होती केसरिपुढें शिथिल कांचा ॥ ६ ॥

प्रेमा ठेविति साधू इहलोकीं देवता नभीं तिलकीं ।
यमदूत स्पर्शाया राष्ट्रहितेच्छू सतां न भीतिल कीं ! ॥ ७ ॥

देवा तुझ्या हवालीं केला हा कीर्ति-नीतिचा ठेवा ।
ऱ्हा वाली स्तेनभयापासुनि या रक्षुनी सुखें ठेवा ॥ ८ ॥

गातों आर्यातें श्रीमयुरेशस्फूर्तिनें विनायक तो ।
नायक तो जगताचा तिलकस्तवनास मुदित आयकतो ॥ ९ ॥

— स्वातंत्र्यवीर बॅ. वि. दा. सावरकर

के. भि. ढवळे प्रकाशित 'सावरकरांची कविता' या पुस्तकांतून.

---

# लोकमान्य

( वृत्त – स्वागता )

स्वागतानति भवच्चरणांसी । लोकमान्य जनताशरणांसी
आंग्लदेशिं करुनी श्रम आलां । सांगण्या हितवच स्वजनाला ॥ १ ॥

लोकमान्य जनतात्म हरींची । हार्दिकी विविध भक्ति परींची ।
आचरूनि जन जागविला हा । सत्कलाविषय सत्काविला हा ॥ २ ॥

सत्कवित्व बहु जन्म झटूनी । मेळवीन हरिपायिं हटूनी ।
काव्यमंगल भवद्गुणगानें । मी रचीन तदनंतर सानें ॥ ३ ॥

मी प्रयत्नपुरुषार्थभुकेला । यत्नवादि गुरुचा लघु चेला ।
सत्कवित्व हरिपायिं हट्टनी । मेळवीन बहुजन्म झट्टनी ॥ ४ ॥

मेळवीन तदनंतर सानें । काव्यमंगल भवद्गुणगानें ।
मी रचीन तुमचें यश तेव्हां । लाभणार मज सद्यश ठेवा ॥ ५ ॥

लोकमान्य हरिची मज सांगी । आज भेट गुरुसी करिं 'वांगी' ।
जी जयाजवळि चीज जिवाची । तीच भेट गुरुला गुरुसाची ॥ ६ ॥

* * *

लोकमान्य ! जन चंचल भारी । स्थैर्यधैर्य-गुणहीन उभारी ।
सर्व हीं विफल हें शिकवाया । आग्रहें झिजविली निजकाया ॥ ७ ॥

लोकमान्य भगवंत वचाचें । सारतत्त्व नवनीतचि साचें ।
कर्मयोग अनुशासक गीता । सांगुनी उठविलें भवभीता ॥ ८ ॥

घोर हा भव अकर्मपरांना । गोड हा कुशल कर्मपरांना ।
योगयुक्तियुत कर्म करावें । याच मार्गी जन सर्व तरावें ॥ ९ ॥

लोकमान्य-उपदेश जनां हा । लोकमान्य-उपदेश मना हा
जें जना निजमनासहि तेंच । सांगणें वर-गुरूपण हेंच ॥ १० ॥

लोकमान्य तुमच्या करणीनें । स्थैर्य धैर्य सुभगा सरणीनें
लोकमानस विनम्र जहालें । लोकमान्य पद अर्पित केलें ॥ ११ ॥

लोकमान्य पदवी स्थिर झाली । लोकनायक अनागत कालीं
आठवूनि तुमच्या चरितातें । साधितील निज लोकहितातें ॥ १२ ॥

लोक थोर बहु उत्सुक झाले । अल्पतुष्ट मन हें मम धालें
वंदुनी चरण यास्तव जातों । श्रीहरिसि बघण्यास वहातों ॥ १३ ॥

* * *

मी लबाड तुजसी हरि ठावें । मी लबाड म्हणुनी न रुसावें
तूं गुरू हरि तुझा लवु चेला । मी तुझ्या समाचि खाऊ-भुकेला ॥ १४ ॥

गोड घोट धरि आत्मझर्राचा । तृप्त हा पिउनि झाडु हरीचा
तृप्त हा म्हणुनि गोष्टि हरीतें । सांगतो नर दिसेल करी तें ॥ १५ ॥

दे मला कविकला कुसरीची । श्रीहरी जरि तुझ्या लहरीची
सांवली मजवरी फिरण्यासी । वाव मागत असें तुजपासी ॥ १६ ॥

आज सत्कविकला कुसरीची । होउनि तव कृपालहरीची
लाभली जरि मला हरिराया । लोकमान्य गुणगान कराया ॥ १७ ॥

लोकमान्यभक्ती जरी तुम्हां चित्तीं ।
तरी स्वार्थाप्रति टाका टाका ।
टाका झाडोनियां दैन्याचा हा मळ ।
सत्त्व तें सोज्वळ तळपूं द्या ।
तळपूं द्या सत्त्वशुद्ध सत्याग्रह ।
येणेंचि संग्रह वैभवाचा ।
वैभवाचा वांटा नाहीं करंट्यासी ।
सांगा हें चित्तासी पुन्हां पुन्हां ( करंटा )

— सेनापति पां. म. बापट

---

## राष्ट्रशोकक्षोभ

[ २२।७।१९०८ ला सहा वर्षें कारागृहवासाची जी कठोर शिक्षा टिळकांना झाली त्यावेळीं कवीने काढलेले हे उद्गार होत. ]

( पृथ्वी )

अहो दशदिशा अशा वरिति कां उदासीनता
अशी जनमुखावरी दिसुनि येइ कां खिन्नता

त्यजोनि निजवृत्ति कां त्रसाति वैश्यहि स्तब्ध हे
भयाण तरि कां अशीं दिसतिं सर्व शालागृहें ॥ १ ॥

अहो सुजन लाविती पदर कां असे लोचना
कशासि तरि गाळिती अविरताश्रु पौरांगना
विचाररत हे किती दिसति हे किती घाबरे
हताश दिसती किती तरुण कावरे बावरे ॥ २ ॥

वदा अशुभ काय तें रडुं नका वदा हो वदा
विदारि सकलांतरा कवण ती अशी आपदा
अभद्र वदतां कशीतरि अशी गिरा दुःसहा
पडे टिळक बंधनीं अहह काय वर्षें सहा ॥ ३ ॥

मनस्तिमिर संहरीं प्रबळ मोहनिद्रा हरी
सहर्ष नवजीवनोद्यम निमग्न सर्वां करी
समान रिपुबांधवा कळवि सत्य वस्तुस्थिती
तया ग्रहण लागलें अहह लोकमान्याप्रती ॥ ४ ॥

प्रतिध्वनि घुमे जिचा अजुनि सर्व विश्वांतरीं
विपक्षकरिना करी गलित-गर्व जी सत्वरीं
पयोदसम गर्जना विफल हो कशी ती तरीं
अखेर नरकेसरी गवसला कसा पंजरीं ॥ ५ ॥

स्वदेशहितसाधनीं नरवरा दिवायामिनी
महाबुधजनाग्रणी विमलवृत्त चूडामणी
शरीर झिजवोनियां करिशि भारतीयां ऋणी
परोपकृतिलाभ हा तुज मिळे अहा बंधनीं ॥ ६ ॥

किती कठिण आपदा तव शिरावरी कोसळे
जळें तुजमुळें पहा भरतखंड शोकानलें

अजाण जनही रडे रडति बायका लेंकरें
सख्या किति कथूं तुला उपलसंघहि पाझरे ॥ ७ ॥

किती स्वहित साधिती मरति भूवरी जन्मति
जिवंत किती कीटकांसम नसे तयाला मिती
परी परहितार्थ जो निजसुखास हो पारखा
जगीं विरल रे सख्या ! विरल तो तुझ्यासारखा ॥ ८ ॥

" उतार वय जाहलें बहु जया गदें पीडिलें
अशा समयिं लाडक्या तुज कुणी सुता नाडिलें
कुणी हृदयिं मारिलें मम शतावधी कोरडे
कुणी अहह फाडिलें हृदय ओढिलें आंत हें ॥ ९ ॥

वदोनि किती हें असें जननि आर्यभू ओरडे
किती तडफडे गळा करुनि मोकळा ही रडे
नको रडुं गडे धरीं हृदयिं शांतता बापुडें
निवारिल तुझ्या सुतावरिल ईश तो सांकडें ॥ १० ॥

" वडो मम विपत्तिनें चिरमदीय देशोन्नति
असेंच गमतें खरें जणुं जगन्निवासाप्रती "
निघे अशि अखेर जी तव गिरा मनोभेदिनी
अजोनिजल आणि ती मम पुनः पुन्हां लोचनीं ॥ ११ ॥

स्फुरेल कवि भारती गुण तुझे सदा गावया
बघेल तुज साधुही सुचिर लोभ जिंकावया
दिसेल इतिहासही तुजविणें उणा सर्वदा
चरित्रपरिशीलनें तव नुरेल देशापदा ॥ १२ ॥

( शिखरीणी )

जगाचा या न्यायी बुध वदति तो ईश्वर धनी
तरी कां हो त्याची विपरीत अशी हाय करणी
जनांच्या कल्याणीं सतत धरि जो वाक्तनुमन
विपत्ती त्याची तो प्रभुवर करी केंवि सहन ॥ १३ ॥

" करी जें जें कृत्य प्रभु करित तें मानवहिता
तयाच्या लीलेचा लवभरि न ये तर्क करिता
नरा दुःखांतीं हो त्वरित सुखसंप्राप्ति समजा
असें मोठे मोठे वदति बुध अज्ञान मनुजा " ॥ १४ ॥

मृषा त्यांची वाणी जरि नच असेल प्रभुवरा
तरी देवा दावा अनुभव आम्हां त्यांतील खरा
दरिद्री आम्हांला धृति बलमती रीति न जरा
तया त्राता आतां तुजविण समर्था न दुसरा ॥ १५ ॥

तुझा राहो बाहू वरद तिलकाच्या शिरिं सदा
तया लक्ष्मीं रक्षीं हरुनि अशिव क्लेश सुहृदा
पुन्हा त्यांतें येथें कुशलपणिं आणी द्रुतगती
जगन्नाथा ! माथा नमवुनि करी हीच विनती ॥ १६ ॥

— दत्तात्रय भिमाजी रणदिवे, कोल्हापूर

( निवडक कविता घेतल्या आहेत. )

'काव्यरत्नावली' १९०८

# हिंदभूमीचें सौभाग्य !

( चाल – सबसे राम० )

सौभाग्य हिंदभूमीचें राखा राखा आर्यांनों ॥ ध्रु० ॥

ढळढळ अश्रू गाळित होती महाराष्ट्रभू ज्या काळीं ।
शिवरायातें देह अर्पुनी तिला हंसविलें तैं गालीं ॥ १ ॥

संताजीच्या समशेरीनें विमल तिचें यश गौरविलें ।
त्या बाजीनें परमभक्तिनें दिगंतरीं तिज चमकविलें ॥ २ ॥

चतुरबुद्धिनें अरिला दिपवुनि करि संतोषित तिज नाना ।
परशुरामें बाहुबलानें स्पर्शु न देई तिज कोणा ॥ ३ ॥

तव्हांपासुनि दुर्दैवें परि तद्यशगाजी कुणि न दिसे ।
व्याकुलहृदयें तृषितलोचनें भिरभिर वेडी पाहतसे ॥ ४ ॥

मंगलकुंकुम तिचें यशान्वित कालकरें पुसुनी राही ।
तिलक 'बाल' हा उरे कपाळीं आणा हृदयीं तरि कांहीं ॥ ५ ॥

– आनंदराव कृष्णाजी टेकाडे

'बालशिक्षणमाला' ( टिळक अंक )

---

# लोकमान्य टिळक

**संपत्तौ च विपत्तौ च महतामेकरूपता ।**

( वसंततिलका )

तो केसरी गंवसला अजि सांपळ्यांत
आबालवृद्ध अवघे करिती अकांत

" राजाविरुद्ध न असें " कथितांहि हेतू
दोषी तरी ठरतसें बघ चित्र हें तूं ॥ १ ॥

हे आर्य हो! नवस सर्व फुकाचि गेले
शैवाभिषेक उपवास फळा न आले
आधारभूत वचनें वकिलादि सल्ला
त्या कुंडल्या विफल तेंवि भविष्यमाला ॥ २ ॥

( शार्दूलविक्रीडित )

भाषापद्धति जोरदारचि तूझी लेखीं वचीं ही तशी
देशाचें करण्या सदैव हित तूं आसक्त वा राहशी
सत्ताधीश नरा हितोक्ति वदुनी सुस्पष्ट तूं बोधिलें
त्याचें हें तिलका! तुला फळ असें भोगावया लागलें ॥ ३ ॥

" सर्वां न्याय समान लेखनिं वचीं स्वातंत्र्य तुम्हां असें
टीका ही करण्या नियंत्रण कुणा राज्यांत कोठें नसें "
ऐशा या मधुराक्षरा भुलुनियां वागूं नका हो तसें
आहे पौष्पपरी न हा मृदु असे हो हार जाणा असे ॥ ४ ॥

( मंदाक्रांता )

आर्यांनो हा ! तिलक अमुचा मायभूचा दिसेना
कोठें नेला न कळुनि मना गोड कांहीं गमेना
कोठें जावें किमपि न कळे त्यास कोठें पहावें
कैसें ऐसें सुकृतिफळ त्या सज्जना प्राप्त व्हावें ॥ ५ ॥

( शार्दूलविक्रीडित )

नेला बाळ तुझा धरूनि जननी गे आर्यभू लाडका
शोकातें करिशी किती पुसाशि कीं नेलें तया व्यर्थ कां

होशी तूं अबला म्हणूनि अवघीं वाळें तुझीं तेंवि तीं
सोशी दुःसह यातना तुज अतां नाहींच अन्या गती ॥ ६ ॥

( वसंततिलक )

तो वाट पाहत असे तिलका मराठा
तो केसरी पुसतसे प्रिय तूज मोठा
त्यांना तुझें कुशल काय सख्या वदावें
ते सत्य दीन दिसतात कसें करावें ॥ ७ ॥

– पांडुरंग गोविंदशास्त्री पारखी

'केसरी' २८।७।१९०८ ( निवडक कविता. )

---

## देशभक्ताचे उसासे !

( लोकमान्यांची शिक्षा ऐकून )

( अभंग )

झालें सतीचेंच वाण । देशभक्तीचें कारण ।
होय सुळावरिल पोळी । कां हो विषाचीच गोळी ।
जेणें सर्वस्वा मुकावें । तेणें देशभक्त व्हावें ।
तुका म्हणे जीवें । आधीं मरोनि रहावें ॥ १ ॥

टिळक नव्हे दृश्यमूर्ति । स्वार्थत्यागाची ती शक्ति ।
मूर्ती होवो हद्दपार । शक्ति व्यापो अभ्यंतर ।
अभ्यंतर शुद्ध होय । तरी टिळका उणें काय ।
काय करोनियां "हाय" देशकार्य वाया जाय ।
देव घालितो संकटीं । हित व्हावया शेवटीं ।
तुका म्हणे होई चूर । किंवा निसूर मजूर ॥ २ ॥

'केसरी' १८।८।१९०८

– देशभक्त

# लोकमान्य-संदेश

( चाल – नागीण चपल खल जिव्हा. )

मी साहिन हाल सुखानें ।
धैर्यानें शांतमनें ।
हो प्रगती या आशेनें ॥ ध्रु. ॥

पुण्यमहोत्सव हा पूर्वींचा ।
वाढविला मी लोकीं साचा ।
होवो दर्शक हा पुढिलांचा ।
करितील अशा नियमानें ॥ १ ॥

स्थापियली शिवराजजयंती ।
परी समाधी झालि न पुरती ।
कार्ये जीं म्यां धरिलीं हातीं ।
त्या पुढती तुम्ही नेटानें ॥ २ ॥

बहिष्कारयुत स्वराज्यसेवा ।
करा, तयास्तव मृत्युहि सेवा ।
निरोप माझा आहे सर्वां ।
वागाल अशा मार्गानें ॥ ३ ॥

षट्वर्षाधिक षण्मासांनीं ।
आलों दैवें जरि परतोनी ।
कार्य यशस्वी झालें बघुनि ।
भेटेन तुम्हां प्रेमानें ॥ ४ ॥

निरोप माझा आहे सकलां ।
वृद्ध असा मी समजा मुकला ।

गाडा वेगें पुढती ढकला ।
रुतलेला परवशतेनें ॥ ५ ॥

– नीलकंठ वामन भिडे, बी. ए., एल्‌एल्. बी.

' लोकमान्यांचा निरोप ' या पुस्तकांतून.

---

# वसंत गेला !

( लोकमान्यांना १९०८ सालीं शिक्षा झाली त्यावेळीं स्फुरलेली कविता. )

अमुचा वसंत कोणी नेला ।
त्या वांचुनि जन हृत्कमलांचा बाग म्लान झाला ॥ ध्रु. ॥

भू रडे स्मरे टिळकाला ।
प्रेमाच्या पाळण्यांत तीनें वाढविलें हो त्याला ॥ १ ॥

जो परमप्रिय देवाला ।
नीतिजाति शुभ सुमनहार तो अग्नीवरती धरिला ॥ २ ॥

तो दयामृताचा पेला ।
जिवंत आम्हां करण्यासाठीं प्रसाद प्रभुनें दिधला ॥ ३ ॥

भूचैतन्याचा शेला ।
अंधारीं पळविला भूमिचा देह दिगंबर केला ॥ ४ ॥

स्मरतां मनीं टिळकरायाला ।
भगवद्गीते तुझ्या कंठिं कां माते गहिवर भरला ॥ ५ ॥

जो करी बोध गानाला ।
देशभक्तीच्या आम्रवनांतिल कोकिळ व्याधें धरिला ॥ ६ ॥

या पुण्योत्सव कालाला
टिळकतुकोबा देशभक्तिच्या कां न कीर्तना आला ॥ ७ ॥

वाल्मीकि म्हणू टिळकाला
स्वतंत्रतेचें रामायण जो नित्य कथी विश्वाला ॥ ८ ॥

आम्हां मोक्षाला नेण्याला
ज्ञानेश्वरि केसरीपत्रिका ज्ञानेश्वर तो बनला ॥ ९ ॥

तह देशाचा करण्याला ।
नरवरगाजी टिळकशिवाजी दिल्लीला कां गेला ॥ १० ॥

कथि न्यायदेवते मजला
टिळकविठोबा केव्हां येईल पुण्यपूर पंढरिला ॥ ११ ॥

हे सख्या टिळकस्नेहाळा
आम्हांसाठीं बंदिवास-वनवास तुला कां आला ॥ १२ ॥

देवा पंख देइ आम्हांला
म्हणजे उडून जाऊं वंदूं सज्जनचरणांला ॥ १३ ॥

गातां टिळकांच्या स्तोत्राला
कविता देवी नाहिं अजुनि कां हेतूपुर्ण तव झाला ॥ १४ ॥

गंधर्वांनो गा गानाला
बंदिगृहांतिल अमुच्या जनका टिळका रमवायाला ॥ १५ ॥

वर्षुनि तदिय शीर्षि सुमनांला
सुरांगनांनो सुरप्रियांनो प्रसन्न करा त्याला ॥ १६ ॥

मम विनति सकल देवाला।
कारागृहिं व्हा रक्षक श्रीमत्पुण्यश्लोक टिळकाला ॥ १७ ॥

— स्वातंत्र्यभाट कवि, गोविंद नाशिक

‘ स्वातंत्र्यकवि गोविंद यांची कविता ’
प्रकाशक : कृ. ब. महाबळ, नाशिक.

---

## हें नवें कारंजें

( राग – सारंग, ताल–त्रिताल )

अद्‌भुतरम्य असें कारंजें
परमेश्वरहृद् जेणें रंजें ॥ ध्रु० ॥

बुद्धीची विस्तृत ही टाकी
तुडुंब अनुभव स्फूर्ति–विवेकीं।
ओज प्रतिभा गतिदा हो कीं
मृदुल स्वप्न उत्थापित हो कीं
लेखनि-नलिकेंतूनि उडे जें ॥ १ ॥

जनमनप्रस्तरिं थुइथुइ पडतें
मोदस्वरूपें पुनरपि शिरतें
कविहृदयीं कालें प्रकटे तें
पुनरपि नवरीतीनें उडतें
तेजोज्योती कार्य करी जें ॥ २ ॥

व्यासहृदय ऐसें कारंजें
गीतोपनिषद् प्रकट करी जें

कालें कालें गुप्तचि भासे
प्रकट पुन्हां श्रीटिळकहृदिं वसें
जनदैवत जेणें बहु रंजे ॥ ३ ॥

चाखा चाखा रहस्यमधु हें
मोक्षसुखार्थ तुम्हांला चाहे
तेजोबलरस येथें वाहे
वदे मनीं माझ्या जें उपजें ॥ ४ ॥

— वसंतामित्र, भुसावळ

'संदेश' १९१६

---

# लो. टिळकवियोगदुःख

( टिळक डोंगरीच्या तुरुंगांत गेले तत्कालीन १८९६-९७ )

( वसंततिलका )

ज्यानें स्वतां शिव खरोखर ओळखीला
ज्यानें जनांस सुगुणें शिव दावियेला
हा हा तया घडत दुःखद बंदिवास
दुर्दैव खास विपरीत दशा अम्हांस ॥ १ ॥

( मालिनी )

प्रथम शिवजयंती राय-दुर्गांत झाली
परिसुनि यश तेव्हां मावळे पंक्ति आली
म्हणति सुखद दावा तो पुण्याचा स्वराजा
' टिळक पगडिचा तो ' लोक सांगे पहा जा ॥ २ ॥

न धरुनि धनलोभा देह जाळी परार्थ
जनहित करणें हा वाटतो ज्यासि स्वार्थ

खटपट सरकारीं तो करी दाद लावी
म्हणुनि 'टिळकराणा' कां न ही युक्ति यावी ॥ ३ ॥

( वसंततिलका )

आंग्लाधिकारि पुसती कितिएक मंत्र
त्यांतें कथूनि समयोचित रक्षि तंत्र
सत्तावनांत फिरती बहुमत्त जे त्या
येण्यास शुद्धि अळवी तर्यि न्यायकर्त्या ॥ ४ ॥

( रथोद्धता )

धन्य भाग्य चव डोंगरी तुझें
धन्य बंदिजन तेथ वसे जे
कीं सुपुण्य पददर्शना मिळे
हें यदर्थ मन व्याकुळ झालें ॥ ५ ॥

'जगद्धितेच्छु' — नारायण माधव कुंभोजकर, धुळें

( कांहीं निवडक कविता दिल्या आहेत. )

---

## टिळकवियोगोद्गार

(आर्यागीति)

पुण्यपुरीरत्न कुठें राष्ट्राचा रामदास तो कोठें
तो आधुनीक शिवाजी अचल महाराष्ट्रवीर तो कोठें ॥ १ ॥

जनक बहिष्काराचा स्वराज्यमार्गप्रकाश तो कोठें
राष्ट्रीय शिक्षणाचा पोषक तो देशभक्त हा कोठें ॥ २ ॥

स्वातंत्र्यभक्त कोठें निरुपम तो मातृभक्त हा कोठें ।
स्वार्थच्छेदक नरहरि असत्यनाशक सुवीर तो कोठें ॥ ३ ॥

अन्यायाचा वैरी जुलमा जो कांपवीत तो कोठें
अवतारी पुरुष कुठें राष्ट्राचें भाग्य तें असें कोठें ॥ ४ ॥

ध्येय स्वदेशभक्ता गेय अम्हां शत्रुचें भयहि कोठें।
दीनांचा वाली तो श्रेष्ठ महात्मा अहो असे कोठें ॥ ५ ॥

भारतमातेपासुनि आवडता बाळ दूर तो नेला।
मिथ्याग्रहेंचि त्यांच्या गोवत्सांचा वियोग हा केला ॥ ६ ॥

देशाची त्वां सेवा केलीस तपें अडीच भक्तीनें
सद्धेतूनें दिधला सल्ला तुजलागिं आंग्लसत्तेनें ॥ ७ ॥

" उग्रतपश्चर्यार्थ द्वीपांतरि गमन त्वां करावें कीं
अर्धतपावधि तेथें तप आचरितां फलास अवलोकी ॥ ८ ॥

या देशाची उन्नति लवकर व्हावी अशाच हेतूनें
दिधली व्रतस्थ पुरुषा दीक्षा ही अहह आंग्लदेवीनें ॥ ९ ॥

या तव रुग्ण शरीरें कष्ट अमित सोशिले सतत म्हणुन।
जावें वाटेल तुला स्वर्गीं तरिही अहा असें करिन ॥ १० ॥

बंधुप्रेमबलानें सर्वहि तव कष्ट नष्ट होवोत।
शंभर वर्षें सौख्यें ठेवो तुज ईश भरतखंडांत ॥ ११ ॥

पुण्यात्मे पुण्यांशा देतिल आयुष्यवर्धनासाठीं
आम्हीहि तरुण सारे तव आयुष्यार्थ विनवुं जगजेठी ॥ १२ ॥

देशस्वातंत्र्याप्रति गेल्यावांचूनि हे महापुरुषा।
तव अवतार न संपो राष्ट्राची सर्व ही असे आशा ॥ १३ ॥

— कृ. रा. संत, बडोदें

( निवडक आर्या दिल्या आहेत. )

'देशसेवक' नागपूर १७।८।१९०८

# पुण्यपुरींत पुण्यपुरुषाचें स्वागत

( शा. वि. )

राष्ट्र-प्रेम-लता हृदीं रुजविली,
ती भारता भूषवी
वाढे मंगल पालवी प्रतिदिनीं,
राष्ट्रांतरा मोदवी,
पुष्पें एकमतें सुरम्य फुलतीं,
वासें जनीं कोंदलीं;
वाली माळ गळ्यांत पुण्यपुरुषा
वाहून पुष्पांजली ॥ १ ॥

त्यागाचा शिकली धडा भरत-भू,
चित्तांत कीं शांतता,
जीवाचें अभिषेक-पात्र धरिलें
प्राणाहुती अर्पिता,
होमाच्या समिधा धनादि सगळें
राष्ट्राग्निला वाहिलें,
स्पृश्यास्पृश्य-विचार सांगुनि तुवां
धर्मासि संजीविलें ॥ २ ॥

कालाचा करुनी विचार समयीं
राष्ट्रास द्यावी गती,
जातिद्वेषविकार नष्ट करुनी
ऐक्यास जे स्थापिती,
श्रीपंचायतनांत राष्ट्र पहिली
गा देवता भारती,

प्रेमाचा अभिषेक तीवरि धरी,
गाती यशा संप्रती ॥ ३ ॥

— ग. गो. जोशी, पुणें

---

## टिळकमुक्तता

(आर्यागीति)

सुटले टिळक अशी ही शुभवार्ता परिसली जधीं कानीं
परमानंद मनाला झाला जो वर्णवे न तो कवनीं ॥ १ ॥

नच भरंवसा घडीचा मर्त्यजनीं या नव्हेचि तें अनृत ।
षड्वर्षें कारागृहिं कंठुनि आलांत हो पुन्हां परत ॥ २ ॥

वनवासाहुनि आला वाटतसे आज काय दाशरथी
जिंकुनि पणासि अपुल्या पांडव वा हस्तिनापुरीं शिरती ॥ ३ ॥

जमला जमाव मोठा पुण्यग्रामीं समस्त नागरिक ।
विद्वज्जन मान्य तसे अन्यग्रामाहुनी गुणी कितिक ॥ ४ ॥

साताऱ्याहुनि दादा, उमरावतिहूनि येति खापरडे
भेटाया जगमान्या आलें समजुनि पुणें जसें परडें ॥ ५ ॥

पांगारकर प्रभृति प्रोफेसर दामले नि शिवराम ।
परिसुनि नामें ज्यांचीं घडिभरि वाटे मनास आराम ॥ ६ ॥

दे आयु विपुल टिळका प्रार्थितसें हें सदैव ईशातें
जनकार्यीं रत व्हाया मागावें अधिक काय या परतें ॥ ७ ॥

— 'अरुण', कराची

'मोहनमाळ' काव्यसंग्रह.

# लोकमान्यांचा चौसष्टावा वाढदिवस

(बाल अष्टक – राग भैरवी, ताल केरवा)

चिरायु लाभो बाल तिलका । सुप्त राष्ट्रिंच्या चित्तपालका ॥
राष्ट्रदेविच्या भालतिलका । एकावलिच्या विमल लोलका ॥ ध्रु० ॥
बल अढळ ध्रुव सुनिश्चयाचा । योगिराज कीं कर्तृत्वाचा ॥ १ ॥
दिव्य दिवाकर ज्ञानपथिंचा । धवल कीर्तिचा हिमगिरि साचा ॥ २ ॥
शांत सुधाकर शांतिरसाचा । मधुकंद मधुर कीं गुणवल्लीचा ॥ ३ ॥
सत्त्व धीर नव आर्यधर्मिचा । हंस हिंद मानसिं आशेचा ॥ ४ ॥
वीर धुरंधर संघशक्तिचा । राष्ट्रकार्य दिक्पाल जगाचा ॥ ५ ॥
कार्य प्रवर्तक भूति-उषेचा । अरुण हिंदवी राष्ट्रोदयींचा ॥ ६ ॥
प्राण जगाचा श्वास जिवाचा । आत्मा किंवा सर्वस्वाचा ॥ ७ ॥
बाल सुलक्षणि नऊ नवसाचा । लाल अमोलिक ठेव सुखाचा ॥ ८ ॥

– चंद्रचूड

'चित्रमयजगत्' जुलै १९१९

## महाराष्ट्र-भूचा शोक.

(जाति – उद्धवा शांतवन कर जा)

हें दुःख कसें मी साहूं – बाळातें कोठें पाहूं ? ॥ ध्रु० ॥

वाढदिवस हा नुकताच – साजरा गडे म्यां केला
विनविलें सकल देवांना – दीर्घायु करा बाळाला
लागो न दुःख तिळभरही – जीवाच्या ह्या कलिजाला

आठवडा होइ न पूर्ण
इतक्यांत हळुच येऊन
पळविलें वसनिं झांकून
अबला मी कैशी जाऊं — बाळातें कोठें पाहूं ? ॥ १ ॥

देवाच्या आशीर्वादें — आहेत पुत्र मजलागीं
परि लहान ते असल्यानें — शक्ति नसे त्यांचे अंगीं
वागावें कैसें यांचा — पोंच न या कोण प्रसंगीं
हा धीटचि सकलामाजीं
म्हणुनियाचि कंबर बांधी
मज जगीं घेउनी स्वांदीं
मिरविलें किर्ती त्या गाऊं — बाळातें कोठें पाहूं ? ॥ २ ॥

ताराया मज झटणारे — पांच पुत्र परि ते सान ।
मानिली न कोणे काळीं — परि त्यांनीं भूक तहान
लागावें सुख बंधूंना — धरुनी हा मनिं अभिमान
काढुनि नव उद्योगातें
शिकविती हळु चालायातें
स्वार्थ न कधिं शिवला ज्यातें
जीवाचे ते मम जीवूं — बाळातें कोठें पाहूं ? ॥ ३ ॥

हे माझे पंचप्राण — दावितील दिन सौख्याचे
पुरवितील आशा होती — माझे हे कोड मनींचे
भाळीं जें लिहिलें कांहीं — शक्य परी टाळायाचें
अमरांचे नाहीं हातीं
मग मी तरि मानवजाती
रोधाया काळा जगतीं
कोणातें सांगा वाहूं — बाळातें कोठें पाहूं ? ॥ ४ ॥

तेजस्वी बाळांना या – लागेल दृष्ट दुष्टांची:
म्हणुनीया पदराखालीं – झांकुनी बसे नित्याची
परि विष्णूवरि पहिल्यानें – पातली झडप काळाची
हरपला धुरंधर वीर
आशेचा प्रथमाधार
बैसला जिव्हारीं वार
सांगा तो कैसा दाऊं – बाळातें कोठें पाहूं ? ॥ ५ ॥

पुनरपि या निर्दय काळें – येऊनि तीन पुत्रांतें
हिसकावुनि करिंचें नेलें – केलें जरि बहु विनतीतें
बुडविलें निर्घृणें ऐसें – शोकार्णविं मज दीनेतें
मांग तो तयासी करुणा
उपजवी न माझी दैना
मजलागी कांहिं सुचेना
जीव हा बघतसे जाऊं – बाळातें कोठें पाहूं ? ॥ ६ ॥

एकदां वचन दिधलेंल – पुनरपि जो मागें घेतो
लांछन हें खास तयाला – श्वानापरि जगिं तो जगतो
सत्याच्या कासे धरितां – यशमेरू हातीं येतो
हें किर्ती सुलभ जगिं आहे
सावधान चित्तें पाहे
सांगे जो ध्यानिं धरा हें
कुठवर तें तुम्हां सांगूं – बाळातें कोठें पाहूं ? ॥ ७ ॥

आपुलें एकदां म्हटलें – मग त्याच्यासाठीं प्राण
द्यावया सिद्ध जो होतो – त्यास जगीं मिळतो मान
भक्तियुक्त अंतःकरणें – जन तत्पदिं होती लीन
वेदवाक्य त्याचे बोल

मानुनियां मानव सकल
ठेवितात हृदयीं खोल
धजला जो कृतिनें दावूं — बाळातें कोठें पाहूं ? ॥ ८ ॥

कार्यांत संकटें येतां — रतिभरना कधिं डगमगतां
धैर्यानें कार्य करावें — ठेवोनी निश्चल चित्ता
अजमविण्या धैर्या धाडी — विघ्नांतें जीवनकर्ता
गांगरतां चित्तीं लवही
पदरांत हीनता येई
कृत कीर्ती विलया जाई
शिकविलें कसें तें विसरूं — बाळातें कोठें पाहूं ? ॥ ९ ॥

राखी जो आधीं अपुल्या — निष्कलंक आचरणातें
अन्याय दुजाचा होतां — छेडी जो निर्भय त्यानें
धनिक दीन वा अधिकारी — लेखी जो एक मनीं तें
ठेवी न भीड कोणाची
सत्यातें भीती कैंची
वाढेल कीर्ति मग साची
धजला जो कृतिनें दावूं — बाळातें कोठें पाहूं ? ॥ १० ॥

अवतार कार्य संपूर्ती — होतांच शिवानें काळा
पाठविलें वाटे मजला — नेण्यातें प्रिय बाळाला
कष्टल । अमित तो म्हणुनी — द्यायाला विश्रांतीला
केला कां दृष्टी-आड
नव्हती कां दुसरी तोड
विहिर इथें तिकडे आड
जीवित मी कैसें कंठूं — बाळातें कोठें पाहूं ? ॥ ११ ॥

‘ कवि कृष्णाग्रजांची कविता ’ — कृष्णाग्रज

# कै. लोकमान्य टिळकांच्या १० व्या दिवसानिमित्त

( चाल – आमुचा वसंत कोणी नेला )

कोठें जाशी राष्ट्रप्राणा । राष्ट्रप्राणा धर्मत्राणा ।
परदास्याच्या मरणा ॥ ध्रु० ॥

कोठें जाशी भूसन्माना । भूसन्माना विबुधवंदना ।
विजयाच्या जयगाना ॥ १ ॥

कोठें जाशी जनकल्याणा । जनकल्याणा स्वराज्यअरुणा ।
स्वातंत्र्याच्या स्मरणा ॥ २ ॥

कोठें जाशी राष्ट्रोद्धरणा । राष्ट्रोद्धरणा जनाभिमाना ।
पराक्रमाच्या स्फुरणा ॥ ३ ॥

कोठें जाशी देशप्रेमा । देशप्रेमा प्रथितविक्रमा ।
स्वयंशुद्ध श्रीरामा ॥ ४ ॥

कोठें जाशी सुगुणश्रीमंता । हे श्रीमंता बुद्धिवसंता ।
सरस्वतीच्या संता ॥ ५ ॥

कोठें जाशी राष्ट्रानंदा । राष्ट्रानंदा हे धैर्येंद्रा ।
कार्यकुशल गोविंदा ॥ ६ ॥

गेला टिळक राष्ट्रपरमात्मा । तयाविणें तळमळे ।
हळहळे सारा हा जीवात्मा ॥ ७ ।

गेला शेष आमुचा गेला । तच्छीर्षींचा आर्यभूमिचा ।
भुगोल हा डळमळला ॥ ८ ॥

गेला राष्ट्रतात तो गेला । या राष्ट्राचा शोकाश्रूंचा ।
अंजलि अर्पण त्याला ॥ ९ ॥

गेला राष्ट्रजनक तो गेला । या राष्ट्राचीं गहिंवरण्याचीं ।
हृदयें अर्पण त्याला ॥ १० ॥

गेला राष्ट्रप्राण तो गेला । या राष्ट्राचीं नतशीर्षांचीं ।
नमनें अर्पण त्याला ॥ ११ ॥

भो भो भुवनमान्य श्रीटिळका । तव राष्ट्रा या स्वराज्य द्याया ।
पुनरपि ये या लोकां ॥ १२ ॥

— स्वातंत्र्यभाट कवि गोविंद, नाशिक

' स्वातंत्र्यकवि गोविंद यांची कविता '
प्रकाशक : कृ. ब. मह्दाबळ, नाशिक.

---

## लोकमान्यांचें सुरलोकीं प्रयाण

( चाल – आजि अक्रुर हा )

हा हाय कसा सूर्य आज मावळला । अंधार भूमिवर पडला ॥
हें मेरूचें शिखर आज कोसळलें । कीं वज्र धरेवर पडलें ॥
भूनौकेचें शीड कसें हो ढळलें । आकाश कसें कडकडलें ॥
सुरलोकींचा देव काय हो गेला । कां बाळ आमुचा निजला ॥

( चाल ) हा हिरा आमुचा देवा ।
चोरूनि तुवां कां न्याया ।
अन्यायि तुझा हा कावा ।

कां दावा हा साधलास यमधर्मा । नच बुडवी आमुच्या धर्मा ॥ १ ॥

यमराज तुला धर्मराज म्हणतात । हा अधर्म नाहीं होत ? ॥
तूं करुणेचा सागर देवा असती । कोरडा कसा पडलासी ॥

कीं वडवाग्नीमाजीं सांपडलासी । बाळ येत धांवुनि तुजसी ॥
( चाल ) संकटांत पडणाऱ्यांचें ।
सोडविणें ब्रीदचि याचें ।
न्यायीपण गाजे साचें ।
हा लाविल रे खेंचुनि दवो तुजला । अवतार जगीं घ्यायाला ॥ २ ॥

हा भारतिंचा प्राण आम्हां जनतेचा । हा बाळ हिंदमातेचा ॥
परराष्ट्राचा धाक दरारा देवा । हिंदभू अमोलिक ठेवा ॥
हा धैर्याचा मेरु अब्धि प्रेमाचा । वीर मूर्ति शोभे साचा ॥
( चाल ) भूमंडळ हें खडबडलें ।
झोपेंतुनि जागें केलें ।
मन अरिचें हें थरथरलें ।
हा अकरावा अवतार कलीयुगिंचा । संपला अकालीं साचा ॥ ३ ॥

श्रीतिलक ! तुम्ही नजर आम्हांवर फेंका । जनतेची विनती ऐका ॥
ती कोल्हेकुई होइल आतां फार । माजेल जगीं अंधार ॥
कुणि नाहिं कुणा पालक आतां देवा । मग न्याय कुणा मागावा ॥
( चाल ) देवासह आपण यावें ।
अवतारकृत्य जाणावें ।
आश्वासन आम्हां द्यावें ।
भूमातेला हिंददेविच्या बाळा । करि जागृत या जनतेला ॥ ४ ॥

— ना. अ. कौलगेकर, बी. ए., एल्एल्. बी., वकील, तासगांव
'टिळकगुणकलाप' १९२०.

# आर्यभूविलाप

( चाल – ये धांवत कृष्णाबाई )

जनमान्य परम गुणवंत । कुठें मम बाळ
दारववा नयनिं वेल्हाळ ॥ धृ० ॥

मम विकलजीवनाधार । अचल हृदयाचा ।
सौभाग्यतिलक जनतेचा ।
मम पाडस कालवृकानें । गिळियलें आतां ।
कुणिकडे पाहुं भगवंता ।
मजसाठिं अहर्निश बाळा । तुला झिजवोनी ।
गेलास कसा मज त्यजुनी ।
तूं त्याजितां दारुणसमयीं । कोणा बाहूं ।
कोणास शरण वद जाऊं ।

( चाल ) तुज वांचुनि दुबळी झालें
मम धैर्य लयाला गेलें
हृदयाचीं झालीं शकलें

राजसा कसा मी साहूं । विरह चिरकाल ।
कुठें मम बाळ । दाखवा० ॥ १ ॥

धैर्यादि गुणांचा सिंधु । बाळ भाग्याचा ।
हा सिंह महाराष्ट्राचा ।
हा लोकमान्य जनतात्मा । हिरावुनि नेतां ।
काशि आली दया न कृतांता ।
परदास्यवृत्तिचीं श्वानें । भुंकतीं भंवतीं ।
चळला न अणुहि स्थिरवृत्ती ।

परवशता शल्यचि वाटे । तुझ्या हृदयाला ।
झालासि कसा वश काला ।
अति दुःसह शोकरसाचा । पाजुनी घुटका ।
गेलासि लावुनि चटका ।

(चाल) आजन्म सुख न बाळाला
कष्टांत जन्म घालविला
अतिदुर्धर रोगें श्रमला

सोडिलें परि न ध्येयाला । अल्पहि काळ ।
कुठें मम बाळ । दाखवा० ॥ २ ॥

— का. रा. धर्माधिकारी, एल्. एम्. एस्., दर्यापूर

'विविधज्ञानविस्तार' १९२०

---

# लोकमान्यविरहगीत

(चाल – नमन नटवरा)

नमन नरवरा रहस्यकारा । लोकमान्य त्रैलोक्यसुंदरा ॥ ध्रु० ॥

स्वदेशसेवनिं देह झिजविला । स्वराज्य अपुला हक्क ठरविला ।
देशभक्तिचा केवळ पुतळा । वीरशिरोमणि युद्ध खेळला ।
राष्ट्रतिलक विलयाला गेला । देवमान्य तेजोमय तारा ॥ नम० ॥ १ ॥

सुनिश्चयाचा मेरु गमला । कर्मयोग निष्काम शिकविला ।
राष्ट्रशिक्षणीं सद्गुरु झाला । भीषण संकटिं भय ना ज्याला ।
विजयश्रीची कंठीं माला । वंदन त्या गंगाधरकुमरा ॥ नम० ॥ २ ॥

हिंदभूमिरवि अस्ता गेला । महाराष्ट्र केसरी निमाला ।
अनभिषिक्त भूपति अंतरला । जनपदाहितरत नेता गेला ।
कट्टा कर्मणिवीर उडाला । दाद लावण्या अमरपुरा ॥ नम० ॥ ३ ॥

पुण्यश्लोक जनकार्यीं शिणला । विश्रांती क्षण नाहीं ज्याला ।
समजुनि देवें ऐशा त्राळा । गुणनिधिला या सन्निध नेला ।
यशोदुंदुभी गर्जवि महिला । धन्यमायभू पुत्र खरा ॥ नम० ॥ ४ ॥

—नीळकंठ भाऊ गांधी, वागमांडलें ( रत्नागिरी )

'कात्रण'

---

# टिळकप्रयाणदिनस्मृति

पद अढळ लोकमान्यांतें । यमधर्में दिनिं या दिधलें ।
परि हिंदराष्ट्रकार्यार्थी । जन दिशादर्शना मुकले ॥ ध्रु. ॥

पवनरूप धरि राष्ट्रहितरती
हललिं जनमनें जशीं सुमनतति
परिमल पसरे अखिल भारतीं
गुणगंध लुब्ध जन झाले । जणुं मधुपसंघ ते रमले ॥ १ ॥

तिलकमूर्ति उच्चासनिं बसली
सर्वजनांहीं प्रेमें देखिली
जय जय ऐसें जनता वदली
चिद्‌ब्रह्ममय जन झाले । भगवत्-सुगीतीं रमले ॥ २ ॥

कष्ट-सौख्य समरूपच मानिती
विजय पराजय मनीं न गणती

हरिचरणीं निजकर्में अर्पिती
जनबंधमुक्त ते झाले । हें रहस्य कर्णी पडलें ॥ ३ ॥

— वासुदेव वामन गद्रे

'टिळकगुणकलाप' १९२०.

---

# टिळकनिधनविलाप

( शिखरिणी )

कसा झाला सर्वांवरि तरि असा निष्ठुर विधी
हरोनी नेई तो तिलक सुरलोकीं गुणनिधी
महाराष्ट्रोत्कर्षा उदित जणुं झाला दिनमणी
अहा अस्ता गेला खचित विधिची क्रूर करणी ॥ १ ॥

स्वसत्पक्षासाठी तनुमनधनातें न गणितां
परद्वीपीं केलें गमन म्हणुनी वानि जनता
पुन्हां येतां येथें विजय तरि हो यत्न अपुला
कशानें थांबेना स्मरुनि जन शोकांत पडला ॥ २ ॥

अकृत्या अन्याया अधिकृत जनांच्या निरखुनी
हितार्थी लोकांतें कळवि धरि शंका नच मनीं
जरी दुर्दैवानें अनभिमत कारागृह कृती
घडे सत्यासाठीं सहन करि ती धीरसुकृती ॥ ३ ॥

— सौ. हिराबाई रामचंद्र गायकवाड, ठाणें

'टिळकगुणकलाप' १९२०

# दख्खनचा दिनमणि गेला लोकांतरीं !

कसे कोपले प्रभु करुणावन महाराष्ट्र भूवरी ?
दख्खनचा दिनमणि मावळला — गेला लोकांतरीं !

आजच दैवा ! अकल्पित असें संकट आलें कसें ?
पानिपताचा रोमहर्षण प्रसंग तो स्मरतसे !

परवशतेच्या पाशीं पडतां निःसहाय भारत
आर्तत्राणास्तव हा गेला महाराष्ट्र धांवत;

निरोप देतांना गंहिवरली — हंसली पुण्यापुरी,
परि दैवानें लिहिलें भलतें भाकित भाळावरी !

शाण्णव कुळिंचे क्षत्रिय गेले धारातीर्थावरीं
दख्खनची नवलाख बांगडी फुटली त्या अवसरीं.

नशिबाचा त्या वेळीं झुकला झोला भलतीकडे !
तसेंच कां हें फिरुनि घालिसी प्रभुराया ! सांकडें ?

उरलें खापर, जळली भट्टी सोन्याची ! — तेधवा
दुःख विसरली महाराष्ट्रभू पाहुनि परि माधवा;

फसगत झाली तशीच, नेला बाळ आज ओढुनी
दिवस पुढें ही काढिल देवा ! कुणाकडे पाहुनी ?

परकीयांच्या राज्यश्रीचा धरुनि लोभ अंतरीं
स्वतंत्रता-सौभाग्य-संपदा अपहरिली संगरीं —

तळतळाट त्या हतराष्ट्रांचा बहुधा हा भोंवला
परवशतेचा तात गळ्याला कायमचा लागला;

स्वातंत्र्याचें वाण कुणाला दिधलें असतें जरी
दास्य आज हें टळतें संचित-पुण्यानें त्या तरी;

मुलुखगिरीचा मोह पडुनि परि वैभव गेलें लया
आणि भाकणें आलें नशिबीं ही धर्माची दया !

पुत्र अहा ! नादान निपजले नुरला वाली कुणी
स्वातंत्र्याची स्मृती बुजाली जनता चित्तांतुनी;

त्या निद्रेंतुनि जनतेला हा जादुगार जागवी,
गत विभवाचा अभिमान पुन्हां राष्ट्राचा चेतवी !

राष्ट्रचेतना स्फुरवी याची वीर्यवती वैखरी,
गिरिकुहरांना घुमवी गर्जुनि महाराष्ट्र केसरी !

राष्ट्रस्फूर्तीचे, आशेचे दिव्य बोल बोलला
कर्तव्याची हांक ऐकुनी सह्याचल हालला !

स्वातंत्र्याची प्रभा पसरुनी महाराष्ट्रभूवरी
दख्खनचा दिनमणि मावळला — गेला लोकांतरीं !

स्वातंत्र्याचें पुण्यपर्व हें जगतावर आलें
हें अनपेक्षित तोंचि सांकडें दुर्विधिनें घातलें !

स्वतंत्रतेच्या युगतेजाला देउनि ललकारणी
स्वातंत्र्याचा उद्‌गाता हा अखेर पडला रणीं !

डोळे भरुनी राष्ट्रदेवते ! घे याला पाहुनी
कल्पनाच यापुढें आणणें रूपाची या मनीं !

स्वातंत्र्याच्या शाहीरा ! तव बोल ऐकुनी पुन्हां
स्फुरणें न कधीं शक्य यापुढें महाराष्ट्र-भावना !

हा ! हा ! दैवा ! अवचित कैसें घडलें हें दारुण ?
क्षीरसागरीं आजचि बहुधा निजले नारायण —

म्हणुनिच नाहीं करुणारव हा पडला कानांवरी
प्रभुरायाविण कोण मृत्युचा पाश दुजा आंवरी !

तुज जनतेच्या जादुगारा ! सरणावर पाहुनी
हृदय फाटतें, भान आटतें अश्रुपूर दाटुनी.

संचित सारेंच महाराष्ट्रा ! काय तुझें आटलें ?
आणि आज हें स्वातंत्र्याचें सरण पुढें पेटलें !

धडधडतें हें सरण ! संपलें शब्दांची वैखरी !
दख्खनचा चंडोल उधळितो अश्रुफुलें तुजवरी !

— ग. त्र्यं. माडखोलकर

'नवयुग' जुलै १९२०

---

# श्रीटिळकनिधनसंशयमाला

( आर्यागीति )

धीमंता बलवंता जनमान्यवरा नरोत्तमा टिळका ।
गेलासि कुठें चिंता भारतभूची मनांत ना तिळ का ॥ १ ॥

कीं वाग्युद्ध कराया मथा गोपाळ कृष्ण नेमस्तीं ।
पाचारिलें पुन्हां तुज सुरतीं पुरती न का जिरलि मस्ती ॥ २ ॥

कीं तव विक्रमयशरव लंदनपुरिंतील परिसुनी श्रवणीं ।
चिपळुणकरादि बाहति म्हणुनी कां सोडिलीस अवनी ॥ ३ ॥

कीं भारतसंग्रामीं धनंजयालागिं बोधिली गीता ।
कळलें रहस्यचि तिचें कारागृहिं तुजसि कैद भोगवितां ॥ ४ ॥

कीं अर्जि केलि ज्यांनीं झाले ते मृतचि जालियनवालीं ।
जाशी सुरदरबारीं वकिल तुझ्याविण दुजा न कुणि वाली ॥ ५ ॥

स्वातंत्र्यवीर सावरकर बंदीमाजि भेटुं ना शकती ।
अतृप्त लालसा तव म्हणुनी कां वाटते तुला खंती ॥ ६ ॥

कीं असहकार पथ नव दाविति गांधी तुला न जो मान्य ।
तव कर्मयोग ग्रंथचि आधार अम्हां असे असामान्य ॥ ७ ॥

यापरि संशयसागरिं सुविचारी जन असंख्य ते भ्रमती ।
कुंठित होती अंतीं नारायणतनय काय मंदमती ॥ ८ ॥

— दिगंबर नारायण अनगळ, धुळें

'सह्याद्रि' ऑगष्ट १९४५

---

## लोकमान्यविरहोद्गार

( आर्यागीति )

गेला पुण्यपुरीचा तिलक नव्हे हाय अखिल वसुधेचा ।
सौभाग्यनिधी ज्याच्या चरिताहुनि मधुरिमाहि न सुधेचा ॥ १ ॥

पुण्यपुरस्थांहुनिही भाग्य गमे थोर "मुंबईस्थांचें" ।
पुण्यांतिमदर्शन ज्या प्राप्त महा पुरुषधुर्य तिलकांचें ॥ २ ॥

खेदार्द्राश्रुविलोचन युववृद्धकुमारकन्यका महिला ।
भस्मोध्दूलित टिळकां नमिती भालास लावुनी महिला ॥ ३ ॥

टिळकांचें लोकोत्तर चरित जसें स्तुत्य अनुपम स्मरण ।
मरणहि घडलें तेंवी लोकोत्तर अब्धितीरिं कृतमरण ॥ ४ ॥

नोहे सरदाराला मांडलिकाला न थोर राजाला ।
तो लाभला मृताही जनताकृत मान लोकमान्याला ॥ ५ ॥

अंत्यावस्था विरहाक्लिष्टांतरसांत्वनार्थ तिलकार्या।
गुंफुनि अर्पी प्रेमें पणशीकर भारतीय अखिलार्या॥ ६ ॥

— वासुदेवशास्त्री पणशीकर

'टिळकगुणकलाप' सप्टेंबर १९२०.

---

# अश्रुसिंचन

( मंदाक्रांता )

मृत्युच्छाया पडुनि दिसते भूमि ही आज दीना
शोकाक्रांता अखिल जनता स्त्री जशी कांतहीना
गेला अस्ता रविभुवन हें व्यापिलें अंधकारें
हा हा काला करणि असली काय केलीस बारे ॥ १ ॥

जातां माता शिशु टकमका पाहती एकमेकां
आई आई घडि घडि अशा मारिती दीर्घ हांका
तैशी आली टिळकगमनीं दुस्थिति आज आम्हां
देवें नेला जरि विमल तो स्वीय वैकुंठधामा ॥ २ ॥

देशासाठीं तनु झिजविली सोशिते कष्ट फार
देशासाठीं छळ न गणिला मानिला पुष्पभार
देशासाठीं श्रम न इतुके सोशिले वा कुणीही
देशासाठीं तिलकसखया काय केलेंस नाहीं ? ॥ ३ ॥

त्वत्स्फूर्तीचें स्मरण घडतां लोटती अश्रुबिंदु
आहे आतां खचित अमुचा आटला सौख्यसिंधु
देशप्रेमान्वित वदन तें यापुढें दृश्य नाहीं
नाहीं आला मनुज गत जो एकदां कालगेहीं ॥ ४ ॥

( वसंततिलका )

भीरूसही स्फुरणदायक जी सुवाणी
नाहींच ती पुनरपी पडणार कानीं
गांभीर्य धैर्य सगळें स्मृतिशेष झालें
वैधव्य आज शिवभूमिस खास आलें ॥ ५ ॥

अंधार घोर पडला जग ओस झालें
उत्साह पार खचला मन हें निमालें
कंपायमान कर कुंठित होय वाणी
ही लेखणीहि न चले मम दीनवाणी ॥ ६ ॥

— ज. र. आजगांवकर

'टिळकगुणकलाप' १९२७

---

# हिरा हरपला

[ कवीचें शिक्षण त्याच्याच शब्दांत सांगावयाचें म्हणजे " १॥। इयत्ता " खालील पद ' लोकगीत ' असून ग्रामीण भाषेंतलें आहे. ]

म्होटा घात देशाचा या झाला र लोकमान्य हिरा हरपला ॥ ध्रु० ॥

देश जागा सारा ज्यान क्याला । हक तुमचा तुम्हा समजाविला ।
सवराज्याचा हप्ता मेलविला । बोल समद्या लोका ज्याचा पटला ॥ १ ॥

देश हिताविण कदि कांहीं । ज्यानें उद्योग केला र नाहीं ॥
खरा पुतर भूमातेचा पाही । तिच्या हितासी सदा झटला ॥ २ ॥

कष्ट झालं फार शरिराला । परि नाहि र सत्त्वा ढळला ॥
लाग न्येटान म्होर कामाला । संगति नार कदि मुक्ति हटला ॥ ३ ॥

पैसा पासरि देशभगत । मंगति झाल म्होर किति होत ॥
परि नार क्येलि कोणि मात । कसोटिला येवढा एक टिकला ॥ ४ ॥

मांगं नार केंवि ऐसा झाला । म्होरं होविल कां ठावा कोणाला ॥
उछवाचा कर्ता ह्याग ग्याला । वगा आदार आमचा समदा तुटला ॥ ५ ॥

— गणेश शंकर जोशी, आडें.

---

# तिलकविरह

( मंदाक्रांता )

प्राणाहूनि प्रियतर असा जाहलेला जनाला
नेला कैसा न कळत हिरा तस्करा दुष्ट काळा
रात्रींचा जो समय तुजला वाटला योग्य न्याया
त्या भीतीनें सकलहि नभीं तारका त्या दडाल्या ॥ १ ॥

शोकक्षोभें हृदय उडतें आठवून प्रताप
ओंठीं कांहीं फुटत न जरी शब्दसांठा अमूप
नोहे अर्थ प्रकट न परी भाव ऐसा तयांचा
" गेला गेला " तनय गुणवान् लाडका हिंदभूचा ॥ २ ॥

उत्साहें जी स्फुरत असते लेखनी लेखनाला
ती शोकानें अविरल अशी गाळते आंसवाला
ऐसा कोणी भरतभुवनीं राष्ट्रशाहीर नाहीं
उद्वेगानें प्रबल नच या नाहला आंसवांहीं ॥ ३ ॥

— म. भि. कुलकर्णी, कुरुंदवाड

# ' कृतज्ञतेचे अश्रु '

अदय हृदय कालें रत्न चोरूनि नेलें ।
सकल तरुण लोकां आश्रयें हीन केलें ॥
जवळ समय हेतू पूर्ण व्हायास येतां ।
गमन करि महात्मा हिंद देशीय नेता ॥ १ ॥

हतबल निजदेशा व्हावया बंधमुक्त ।
अनुदिनिं झटला जो होउनी कर्मयुक्त ॥
हर हर आजि गेला तोच सोडून लोक ।
अतुल पसरलासे भारतीं थोर शोक ॥ २ ॥

तनमनधन त्यातें अर्पिलें ज्या जनानें ।
कठिण समय कैसा पाहिला आज त्यानें ॥
परिसुनि कटु वार्ता पावलें चित्त भंग ।
त्यजुनि सुख तयांना दुःख झालें अभंग ॥ ३ ॥

स्वरचित अनुसारे ठेविला दिव्य पाठ ।
गिरवुनी ठसवीता तोच राखील पाठ ॥
उमजुनि कृति आतां दुःख हें आवरावें ।
कठिण समय येतां तच्चरित्रा स्मरावें ॥ ४ ॥

जय सदय रमेशा पावना लोकनाथा ।
तव चरणसरोजीं ठेवितों नम्र माथा ॥
तव सकरुण दृष्टी देविदासीं बळावी ।
सुखकर टिळकांच्या शांति आत्म्यास द्यावी ॥ ५ ॥

— देवीदास लक्ष्मण महाजन, नांदेड

'लोकमित्र' ऑगस्ट १९२०

# लोकमान्यांच्या परलोकवासाबद्दल गोमातेचा विलाप

हत दैवारे बाळ कसा मम नेला ।
गोपाळें कोपाचि केला ॥ ध्रु० ॥

मज आस बहू वाटत होती चित्तीं ।
वारिल मम प्राणाऽपत्ति ॥
उदधी लंघुनिया नृपकुल जागे केलें ।
आश्वासनहीं मिळविलें ॥
युवराजकरें स्वराज्य ध्वज उभवावा ।
गोवध तैं बंद करावा ॥
शुभचिन्ह गमे आर्य-अविंधा एकी ।
मुसळाला अंकुर येतीं ॥

परि आशा नाहीं पुरली ।
पुण्याई वाटे सरली ।
भारतिची ग्रहगति फिरली ।
बाळानें निद्रा वरिली ।

जणुं राहूनें पूर्णेंदू मम गिळिला ।
भारतिचा रवि मावळला ॥ १ ॥

मम भक्तांनीं आळविलें बहु हरितें ।
विप्रांनीं स्तविलें पुरतें ॥
जप होम तसें आवर्तन रुद्राचें ।
परधर्मिय वंदन साचें ॥
व्यर्थचि गेलें कीं. भाकित त्या गणकांचें ।
बहु उपाय धन्वंतरिचे ॥

शुभ इच्छा ही जनतेची वाया गेली ।
संता विफला झाली ॥

किंवा त्या भाकित कळलें ।
अति अनिष्ट पुढचें दिसलें ।
प्रार्थाया प्रभुला वहिलें ।
बाळानें मार्गा धरिलें ।

मग जाच तरी सत्वर वैकुंठाला ।
जागें कर माधवजीला ॥ २ ॥

— दास माधव

'गोग्रास' १९२०.

---

# लोकमान्य टिळक

( मंदाक्रांता )

" प्रक्षोभाचा जनक " अमुच्या आर्यभूबालकांचा ।
सेनानी कीं चतुर बलवद्राजकीया रणाचा ॥
गेला गेला ! अहह ! रवि कीं लोपला क्रांतिकारी ।
झाला गंगाधरसुत गुहा सारखा दानवारी ! ॥ १ ॥

ज्याच्या जीवस्थितिवर असूं सर्व आम्ही जिवंत ।
प्रेतें आम्हीं अजि सकलहि जाहलों केवि हंत ! ॥
त्रिंशत्कोटी अनुचर तुझे त्वद्गुणें शूर लोकीं !
अग्रांकानें विरहित जगीं शून्यवत् जाहलों कीं ! ॥ २ ॥

( शिखरिणी )

तुझ्या नाशासाठीं कितीतरि शिखंडी उभविले ! ।
तुवां ते चातुर्यें श्रमुनि नयिं सार श्रमविले ॥

धनी मानी गर्वी बहु धवलवर्णी नमविले ! ।
स्वराज्याचे कार्यी पुनरपि स्वयोद्धे जमविले ! ॥ ३ ॥

( वसंततिलका )

संपेल जैं अवधि तो सहकारितेचा ।
होईल त्वद्विण विरोध यशस्वि कैसा ? ॥
त्या कौन्सिलांत तुजवीण कसें लढावें ? ।
पूर्ण स्वराज्य तुजवीण कसें मिळावें ? ॥ ४ ॥

( शार्दूलविक्रीडित )

होते निद्रित आंग्लशक्ति-चकितव्यामूढ कर्मच्युत ।
हिंदुस्थान नवीन तूं हलवुनी केलेंस तें जागृत ! ॥
तूं अस्मत् हृदयाधिराज, तनुचे ते आंग्ल राजे जरी ! ।
त्वत्प्रीतीस मिळे मती. परि परां माती मिळे गोजिरी ! ॥ ५ ॥

( पृथ्वी )

नृपाहि न मिळे असा तुजसि मान लाभे नरीं ! ।
तुझें नरशिरोमणे ! अमर नाम पृथ्वीवरी ! ॥
मुमुक्षु करिती तुझे चरितपाठ कीं ग्रंथही ।
जिथें अनय चालतो निशिदिनीं प्रतीकारही ! ॥ ६ ॥

बुधा ! भरतभूवरी आजि पुन्हा पुन्हा जन्म घे ।
अह्मांकडुनि आमुचीं मळव दास्यकारी अघें ॥
कु-शिक्षणिं कुजूनिया कु-नर भीरु झालों अती ।
स्वबुद्धि तनु ही परां विकुनि घेऊं दास्याप्रती ॥ ७ ॥

( वसंततिलका )

देहार्थ जे विसरती निजजन्मदेश ।
ऐसेचि येथ करिती वसती विशेष ॥

देहास जो न गणि तो निजदेशकार्यीं।
ऐसा तुझ्या सदृश तूंच सुवीर आर्यीं ॥ ८ ॥

कारा अतीव भयदा परतंत्रताही।
तीमाजि सर्व जनता अजि दुःख पाही ॥
ही मृण्मयी तिजपुढें बहु सौम्य कारा।
राहे तिथें म्हणुनि धी तव निर्विकारा ॥ ९ ॥

— केशव विष्णु फणसे, पुणें

'विविधज्ञानविस्तार' १९२०

---

## अश्रुविमोचन (पोवाडा)

(चाल — धन्य शिवाजी तो रणगाजी)

स्वातंत्र्याचा सौभाग्याचा दिनमणि मावळला।
हाय! हाय! मज सोडुनि माझा टिळकराज गेला ॥ ध्रु. ॥

हे भूमाते, मुंबादेवी हाय! काय केलें?।
देवपणाचें हेंच तत्त्व कां सांग! तुला रुचलें? ॥
विश्वासानें तव अंकावरि ठेउनि शिर निजला।
कराल कालें सांग! तयाचा कंठ कसा चिरिला? ॥
दानें, स्तवनें, अभिषेकानें देव तुष्ट होती।
श्रुतिस्मृतींचीं वचनें देवी! निष्फल झालीं तीं ॥

परि बोल व्यर्थ कां तुजला।
दोष हा सगळा ॥
आमुचा ठरला।
हें पाप हिंद राष्ट्राचें ॥

दुर्भाग्य देशभक्तांचें ।
हें दैन्य स्वातंत्र्याचें ॥

कितीक झटले परि न कुणाचें संचित येई फळा ।
हाय ! हाय ! मज सोडुनि माझा टिळकराज गेला ॥ १ ॥

राष्ट्रासाठीं जन्म पावला, राष्ट्रास्तव लढला ।
राष्ट्रापायीं क्लेश पावला, लोकमान्य झाला ॥
ऐसा अमुचा सेनानायक धीर वीर नेला ।
हे यमराजा ! सांग ! कोणता लाभ तुला झाला ? ॥
मजसम पडले कितीक जगतीं भारभूत भूला ।
त्यांतिल नेउनि एक पुरविला ? कां न हेतु अपुला ! ॥
परि टाकुनि कोहिनुराला ।
धरी खापरिला ॥
सुज्ञ तो कसला ? ।
परि घात आमुचा झाला ॥
प्रिय बंधु आम्हां अंतरला ।
गुरुराज आमुचा गेला ॥
पुण्यपुरीच्या कंठस्थलिचा लाल गळुनि पडला ।
हाय ! हाय ! मज सोडुनि माझा टिळकराज गेला ॥ ४ ।

गेला गेला ! 'हिंदभूमिचा परमभक्त' गेला ।
महाराष्ट्राला सौभाग्याचा तिलक अतां कुठला ॥
बाणा गेला ! निश्चय गेला ! धृतिनग ढांसळला ! ।
सुविद्यतेचा सागर आटला ! तत्त्वशोध मेला ॥
चातुर्याचा ठेवा गेला ! वीर्य नाश झाला ! ॥
'स्वार्थत्यागा' स्थान न आतां तुला रहायाला ॥

हा वियोग केवी साहूं ? ।
कुठें मी जाऊं ? । कुठें मी पाहूं ? ॥
मज जीव नकोसा झाला ।
कां मृत्यु नेइना ? मजला ॥
भेटेन टिळकरायाला ।
स्वदेश माझा स्वधर्म माझा म्हणत म्हणत गेला ।
हाय ! हाय ! मज सोडुनि माझा टिळकराज गेला ॥ ६ ॥

—नी. म. ऊर्फ शामराव जोशी, इचलकरंजी

---

## दुःखक्षोभाचे सुस्कारे !

( अभंग )

केलें तूंचि त्वा सजीव । मार्कंडेया चिरंजीव !
किती आले काकुळतीला । परी काय त्याचें तुला ?
दोष सर्वां देण्यापरी । कां न तुला दूषूं हरी ?
' सर्वहर मृत्यु माझी — । विभूती ' ही गीतेमाजीं !
चित्त कैसें व्हावें शांत । देव नाहीं देव्हाऱ्यांत !
इच्छा होती जगायाची । कलिकाळ बलवंताची !
इच्छा मृत्यु गांगेयांचें । भाग्य न कां होतें त्याचें ?
त्याची प्राप्ती झाल्याविणें । तृषा कैची शांत होणें ?
तरी काय खाणें तृण । तोंड कोमिलें करून ?
वृत्रनाश करावया । अस्थिवज्र बाळा द्याया !
नेलें काय स्वर्भूस्थला । परि बारसें जेवला !
पहा पैल तीरावर । स्वराज्याचा विश्वेश्वर ।
संकटें हीं कोडी कोडी । येतीं, येवोत बापुडीं ।

जरी तम दिसें पुढें । तरी तेज पलीकडे ।
झुंजेलागीं तोंड दिसें । आतां कोठें लागलेंसें ।
सुख सर्व आटोपलें । होतें जाणा तेंहि गेलें ।
अनंताच्या तनयमुखें । बालवाणी परिसा सुखें ;
जयनाद करा बोला । बाळ पुन्हां अवतरला !

— अनंततनय

'चित्रमयजगत्' १९२०

---

## लोकमान्य टिळकांचा स्वर्गवास

( मंदाक्रांता )

राष्ट्रप्रेमद्युति जनमनीं कोण देशाभिमानी
वीरश्रेष्ठ प्रकट करण्या लोकता ज्यास मानी
नाहीं अन्य प्रबल सुमती लोकमान्यां समान
मृत्यो ! न्याया म्हणुनिच तया धाडिलें कीं विमान॥ १ ॥

( वसंततिलका )

नेलें पुरा यमपुरीस तुवां अनेक
या भारतांतिल सुशील पवित्र लोक
त्यांतें गमे न तिकडे प्रियभारताला
जावें तिहीं निजमनांत विचार केला ॥ २ ॥

जातील कालनगरी त्यजुनी घराला
ते भारतीय जन भीति पडे यमाला
या कारणें जनमनें रिझवावयाला
हा योग्य मित्र असुचा गमला यमाला ॥ ३ ॥

( शार्दूलविक्रीडित )

दुःखानें बहु गांजली भरतभू दुर्भिक्ष्य फेरे करी
येती रोग असंख्य जीव मरती अन्नार्थ भिक्षेकरी
झालों भारतभूमिदुःखशमनीं प्रार्थाविया ईश्वरा
गेला वाटतसे स्वयें भरतभू सत्पुत्र लोकांतरा ॥ ४ ॥

( मालिनी )

टिळकविरहदुःखोद्वेग साहे न लोकां
म्हणुनि जन पहा हे मांडिती दीर्घ शोका
उठ उठ वनमाली बालगंगाधराला
पुनरपि निजमित्रां धाड भेटावयाला ॥ ५ ॥

विशद करि रहस्या कोण गीताभिमानी
स्वजनहितरहस्या कोण सांगेल कानीं
जनपदशुभकार्यें कोण आणील ध्यानीं
जनमन कवणातें भारतीं श्रेष्ठ मानी ॥ ६ ॥

प्रियजनविरहाचें दुःख कैसें न ठावें
तुजसि वद मुकुंदा ! गोपिकांनीं स्वभावें
जयिं तव विरहानें टाकिलें अन्नपाणी
द्रवसि मनिं तदा कां देव तूं पुण्यखाणी ॥ ७ ॥

निरखुनि अनुरागा गोपिकांच्या अभंगा
सदय हृदय तूझें पाझरे प्रेमगंगा
कथिसि मग मुकुंदा उद्धवा जाय वेगें
समजवि मम गोपी पोळल्या मद्वियोगें ॥ ८ ॥

= 1?? 7Z-?



( शार्दूलविक्रीडित )

गेलें वैभव शौर्य कीर्ति अमुची आली पराधीनता
अंगीं शक्ति नसे जनैक्य न दिसे सर्वत्र उद्विग्नता
हें पाहोनि जनीं मनीं तळमळे तो जाय देवाकडे
हा! हा! हन्त! असा दुजा प्रियसखा आम्हां कुठें सांपडे? ॥ ९ ॥

( मालिनी )

तिलकनिधनदुःखें दुःखिताहीं धरावी
तिलकसम सदिच्छा राष्ट्रकार्यीं वहावी
निजतनुधनविद्या अन्यथा जन्म वाया
तरुण जरठ सारे राष्ट्रकार्यें कराया ॥ १० ॥

अमित तिलक व्हावें दान हें हेंचि देवा
निशिदिनिं करण्याला भारतीं लोकसेवा
स्वजन सकल व्हावे पूर्ण देशाभिमानी
तिलकसम झिजावें देशकार्यीं जनांनीं ॥ ११ ॥

— पु. बा. जोशी

'विविधज्ञानविस्तार' १९२०.

---

## श्रीटिळकनिधन

( शार्दूलविक्रीडित )

झालें काय कसें अकाल्पित अहा! हें आज हो ना कळे
वृत्ति स्तंभित होउनी सकळही संवेदना मावळे
वज्राघात अतीप्रचंड शिरिं कीं सृष्टीचिया होउन
आली शेवटली तिला बधिरता ही वाटते दारुण ॥ १ ॥

विश्वाच्या कमला पदीं चिरडुनी कल्पांत हा मांडिला
काळानें गमलें अजी बघुनिया निद्रिस्त देवा तुला
घेरी येउनि भाग्यसूर्य अमुचा हा कोसळे खालती
व्हायाची ठरली भयाण घटना याहून ती कोणती ? ॥२॥

शोकव्याकुल होउनी ढसढसां तारांगणें स्फुंदलीं
चंद्राला कवटाळुनी दृढ हृदीं ती यामिनी स्फुंदली
व्योम स्फुंदतसें अजूनिहि पहा वारेहि हे स्फुंदती
स्फुंदे हा रवि झांकुनी निजमुखा कृष्णांबरानें किती ॥ ३ ॥

जेथें ढाळित आंसवें विलपुनी अध्यात्मविद्या स्वतां
व्हावें-विस्मित कासया-रडतसूं आम्हीं जरी हे अतां
पुण्यात्मा रुसुनी अम्हांवरी अहा ! गेला कसा आज तो
झालें विश्व रितें स्मशानसरिसा संसार हा भासतो ॥ ४ ॥

होता तो नरकेसरी जगिं नसे तत्केसरीला सरी
होते कांपत गर्जना परिसुनी त्या सर्व जैसे करी
वाणी धीर गभीर तीक्ष्ण सरल प्रोद्दीपक प्रेमळ
झाली शांत अतां तदीय उरली मागें स्मृती केवळ ॥ ५ ॥

होतों विश्वसुनीच यष्टिवर त्या सारे अम्ही आंधळे
केव्हांही न उपेक्षिलें लव जरी आलीं महावादळें
हा, हा ! श्रीहरि यष्टि ती हरपतां व्हावें कसें आमुचें
काळोखांत न कांहिंही गवसतें भांबावलों ना सुचें ॥ ६ ॥

( मंदाक्रांता )

होतें तूझें अचल सखया ! धैर्य मेरूप्रमाणें
आपत्कालीं तिलहि ढळणें भीतिनें तें न जाणें

पाहे डोईवरति तळपे तीक्ष्ण तो खड्ग-काळ
निद्रा घेई अभय तरिही धन्य तो आर्यबाळ ॥ ७ ॥

होतें शील ज्वलनसरिसें शुद्ध देदीप्यमान
पाहोनी ज्या दुरित अवघें खालतीं घालि मान
शत्रूही ज्या बघुनि भुलले डोलले आदरानें
गेले वाटे मज उजळण्या स्वर्ग ते स्वद्युतीनें ॥ ८ ॥

पूजीयेलें तुजसि गणुनी रामदासावतार
केला तूंची बहुविध जनीं राजनीतिप्रचार
लावीयेली प्रखर विमलज्योत देशांधकारीं
राष्ट्रैक्याची रुजविलि तुवां भावना चित्तहारी ॥ ९ ॥

६०६२
६०९२

प्रेमानें आमरण अपुल्या जीविता वाहियेलें
देशासाठीं प्रबळ रिपुशीं झुंजही थोर केले
स्वातंत्र्याचा ध्वज निशिदिनीं ठेविला नाचवीत
देशप्रीति स्फुरविलि जनीं रोमरोमीं नितांत ॥ १० ॥

उत्साहानें विगलित महाराष्ट्रभू नांगरोनी
तेजस्वी बीं निरुपम तयीं पेरुनी थोर यत्नीं
स्वापत्तीचें नव खत सुखें घालुनी आदरोनी
रेणूरेणूंतुनि उगविले वीर देशाभिमानी ॥ ११ ॥

स्वार्थत्याग प्रखर शुचिता दक्षता जागरूक
आर्यावर्ती चतुर निधडा राजनीतिज्ञ एक
देशप्रीती कळकळ जिवापाड कष्ट प्रयास
या सर्वांही शिवनृपतिची आठवे मूर्ति खास ॥ १२ ॥

हिंदुस्थानीं लखलखाले जी ज्योत दिव्य प्रचंड
सत्तोन्मत्तां दिवसनिशीं जो भासला काळदंड
मध्यान्हार्कासम तळपला विश्वबुद्धिप्रकर्षें
होता जो कीं विविध समरक्षेत्रिं चाळीस वर्षें ॥ १३ ॥

नाहीं ज्याची अणुहि चळली केधवां सूक्ष्मदृष्टी
झाली शक्ता लवहि न जया मोहण्या स्वप्नसृष्टि
तत्त्वा सोडी कधिं न चुकुनी लेश जो सत्त्वधीर
या राष्ट्राचा झटुनि निरखी सर्व संसारभार ॥ १४ ॥

( वसंततिलका )

धिक् धिक् जगा ! अजि कुठें तव पुण्य गेलें
काळें कसें प्रिय तुझ्या टिळकांस नेलें
रत्नाकरा ! रड अतां रडतेंच मीहि
या रोदनाविण अतां उरलें न कांहीं ॥ १५ ॥

( शार्दूलविक्रीडित )

झाली ज्योत विलुप्त काळवदनीं या काडवाती अतां
मागें राहुनि जाळिती निजतनु प्रक्षुब्ध सत्यव्रता
मावेना जगिं अंधकार म्हणुनी जेथें तिथें कोसळे
वाटे जाउनि तोल सृष्टि अवघी शून्यांतरीं ढांसळे ॥ १६ ॥

हर्षे आळविता 'विनायक' नभीं घेवोनिया मंडलें
गातां त्वद्गुण 'माधवानुज' अहा ! ब्रह्मांड हर्षें झुलें
दिव्याचे नवझोत 'बालकवि' तो भोंतीं मुदें फेंकितो
तेजस्वी स्वतुतारि 'केशवसुत' त्वत्स्वागता फुंकितो ॥ १७ ॥

ऐसें स्वागत वा सहर्ष करिती स्वर्गी महात्मे तव
ज्यातें पाहुनि अंतरीं जळफळे सासूय तो वासव
कैसा हा विधि-दुर्विलास न कळे जें त्यास सौख्यावह
अंगारासम होय तोंचि अमुतें हा हंत दुःखावह ॥ १८ ॥

— गोविंद पांडुरंग देवधर, एम्. ए., एल्एल्. बी.

'विविधज्ञानविस्तार' १९२०.

---

## लोकमान्यांचें स्वर्गारोहण

( चाल — उद्धवा शांतवन कर जा )

ती भीषण विद्युद्वार्ता । भारतीं वायुसम गेली ।
' लोकमान्य गेले ' कळतां । जनवृत्ति फार वावरली ।
गात्रांसी शक्ति न उरली । शोकानें दृष्टी थिजली ।
हृद्कंप होउनी आली । अश्रूंनीं नयनां लाली ।
काळाचा निष्ठुर घाला ।
त्या देशात्म्यावर पडला ।
चेतना मग न राष्ट्राला ।
मातृहीन जनता झाली । कुणि न यापुढें तिज वाली ॥ १ ॥

कर्तव्यमोह जनिं पडला । व्यापि तैं निराशा सकलां ।
नच आत्मतेज कवणाला । धैर्यही जाइ विलयाला ।
दैववाद लोकां पटला । स्वाभिमान त्यांचा जिरला ।
कर्मयोगि तेव्हां बघुनी ।
सेवाव्रत आपण धरुनी ।
मग तेंचि बोधि जो स्वजनीं ।
हतबुद्ध आर्यविजयाला । त्यानें ना गीता कथिली ? ॥ २ ॥

मरण हें नसे टिळकाला । तो प्राणरूप राष्ट्राला ।
जातां जणुं कालचि फिरला । स्वजनांचा आश्रय गेला ।
हा राष्ट्रवीर गत झाला । कोण वालि दुष्टां आला ।
आशेचा अरुण खुलावा ।
मग भाग्यसूर्य तळपावा ।
नच आर्यदैविकां देवा ।
अपमान दुर्दशा सेवा । हेंच कां हिंदभूभालीं ॥ ३ ॥

जें स्थूल आजवरि गमलें । सूक्ष्मत्वें जगिं तें भरलें ।
जें डोळां एकचि दिसलें । तें अनंतरूपीं सजलें ।
परमाणु अणूचे झाले । नश्वर ते ब्रह्मीं मुरले ।
उद्दिष्ट फळा नच आलें ।
स्फूर्तिरूप यास्तव धरिलें ।
जनमानसिं मग ते शिरले ।
ध्येयसाधनीं जे झाले । कर्णधार सर्वहि कालीं ॥ ४ ॥

कर्मशास्त्र लोकां कथिलें । निजशील त्यांस जाणविलें ।
मूढांसि पथा लावियलें । मग अलिप्त आपण बसले ।
बांधवां सचेतन केलें । अवतार कृत्य आटपलें ।
लोकमान्यचरणां स्मरुनी ।
तच्चरित-मर्म उमजोनी ।
कृति करुनि तेंवि दिनरजनीं ।
या राष्ट्रसूत्रभागाचें । स्मारक हें करुं हृत्कमलीं ॥ ५ ॥

— शारदाबाई परांजपे

'विविधज्ञानविस्तार' ४।८।१९२०

# लोकमान्यांचें यशोगायन

( शार्दूलविक्रीडित )

विद्येची तिलका ! सदा तुजवरी होती कृपा जी महा
तेणें सन्मति वाढली सुमतिनें सत्कर्म वाढे पहा
कर्मैं वाढुन पुण्य सत्वरपुढें पुण्येंच त्या वाढलें
वाढे त्याच यशें त्वदीय महिमा जेणें जगा मोहिलें ॥ १ ॥

शब्दीं मोहकता, मनीं विमलता, वृत्तींत शालीनता,
प्रेमीं पूर्ण उदारता, सरलता, लोकांत सन्मानता,
धर्मीं तत्परता, वचीं मधुरता, राष्ट्रीय तेजस्विता,
होते सद्गुण वंदनीय तुझिया 'एकांत' हे सर्वथा ॥ २ ॥

मागायास उशीर वाण नव्हती द्रव्यादिकांची तया
त्याचे बोल तशी तयार जनता सोत्कंठ वागावया
नाहीं चंचल जाहला न शिवली ज्यातें अहंभावना
" ऐश्वर्यांतहि थोर सज्जन कधीं सच्छील सोडीचना " ॥ ३ ॥

( शिखरिणी )

तुझ्यायोगें येई भरत विषयालागि महती
तुझीही त्यायोगें महति कळली सर्व जगतीं
सदा तूं लोकांना भजसि तुजही लोक भजती
महत्कीर्तीला तूं समुचित तुलाही उचित ती ॥ ४ ॥

( पृथ्वी )

कुणी म्हणति धर्म हा निरत राष्ट्रधर्मीं असे
कुणी म्हणति पार्थ हा अचल यत्प्रतिज्ञा असे
प्रसाद कविला गमे रुचिर वाढतां इंदु हा
कितीक तरि काजवे करिति लोकमान्यस्पृहा ॥ ५ ॥

( भुजंगप्रयात )

कुठें कुंद तैसा पयोवृंद कोठें
यशाची तुझी चारुता शुभ्र कोठें
कुठें केतकी चंदनी क्षीणगंध
तुझ्या कीर्तिचा त्याहुनीही सुगंध ॥ ६ ॥

( स्त्रग्विणी )

ती सभाधीटता भाषण प्रौढता
शब्दशालीनता बुद्धिची श्रेष्ठता
थक्क झाली कितीदां सभा अंतरीं
भाषणाची कुणा ना तुझी ये सरी ॥ ७ ॥

( स्वागता )

प्राणिसृष्टिंत असे नर धन्य
त्या नरांत नर पंडित धन्य
राष्ट्रभक्तहि तयाहुनि धन्य
धन्य त्यांत 'तिलकंप्रभु' धन्य ॥ ८ ॥

— द्. आ. तिवारी, जळगांव

---

## स्वातंत्र्यसूर्य

होता जो कर्मयोगी निशिदिनिं झटला देशकार्यें कराया ।
होता या राष्ट्रियांचीं सतत विकट तीं सिद्ध दुःखें हराया ॥
होता या आर्यभूचा मुकुटरहित जो भूपती लोकमान्य ।
राज्याचा चारुनीया कवळ निजजनां लोपला धन्य धन्य! ॥ १ ॥

स्मरुनि वच तयाचें नित्य चित्तांत जागा।
अखिल जन मिळनी त्यापरी सांग वागा।
प्रतिकृति कृति त्याची स्वांतरीं ही धराल।
सुखद सुफलदायी त्या स्वराज्या वराल ॥ २ ॥

"तिलक! तिलक!" ऐशा नाममंत्रा जपोनी।
दुमदुमवुनि टाका लोक भीष्म स्वरानीं।
तिलक खचित नोहे चंद्रमा शांततेचा।
प्रखर यश तयाचें सूर्य तो भूवरीचा ॥ ३ ॥

— काव्यभूषण वि. बा. खेडकर. पुणें

---

## लोकमान्य तिलक वार्षिक पुण्यस्मृति

( श्लोक )

आषाढ कृष्ण दिन हा पहिला उदेला।
जो देतसे जन-मनीं तिलक-स्मृतीला ॥
नेत्रापुढूनि नच दिव्य सुमूर्ति जाई।
दुःखानलें स्वजनचित्त विदग्ध होई ॥ १ ॥

संदेश हा निजमुखें दिधला जनाला।
व्हावें न तत्स्मरण कां अजि हें मनाला ॥
राज्यार्थ कष्टवुनि देह विदग्ध केला।
जेणें बहू जगति भोगुनि आपदेला ॥ २ ॥

लोकीं गाजविलें स्वनाम अवध्या 'लोकाग्रणी' होउनी।
स्वांगें कष्टुनि बोधुनी सुजनता ऐक्यत्व केलें जनीं ॥

“ भिक्षेनें नच हें स्वराज्य मिळतें यत्नाविणें ” भूवरीं ।
‘ राज्याचा मम जन्मसिद्धचि असे हा हक्क ’ तद्वैखरी ॥ ३ ॥

श्रीरामा स्वमुखें वसिष्ट मुनिनें सत्तत्त्व संबोधिलें ।
‘ कोणी पौरुष यत्न हा न करितां राज्या न संपादिलें ॥
“ जेव्हां विक्रम थोर होइल जनीं सर्वा जनांच्या करीं ।
लाभे सद्यश ” हें पुराणिं वदला वासिष्ठ ग्रंथांतरीं ॥ ४ ॥

एतदर्थ दृढभाव धरूनिया ।
यत्न नित्य स्वकरेंचि करूनिया ॥
‘ मान्य तत्त्व ’ स्वमनांतरिं आदरा ।
त्याविणें जगतिं या नच आसरा ॥ ५ ॥

— काव्यभूषण वि. बा. खेडकर, पुणें

---

# नका शोधुं अन्या भजा लोकमान्या

( भुजंगप्रयात )

करी ऋद्धिसिद्धी महातैलवुद्धी
हरेना कदा शब्दयुद्धीं त्रिशुद्धी
तया मूर्तिची कीर्ति ती काय धन्या
नका शोधुं अन्या भजा लोकमान्या ॥ १ ॥

जनाच्या हितां काढिलें केसरीला
निजज्ञान तें वालुनीयां भरीला
स्वतेजें करी दीप्त साऱ्या जघन्यां
नका शोधुं अन्या भजा लोकमान्या ॥ २ ॥

रची ग्रंथ गीतारहस्य प्रचंड
हिताचें करा कर्म बोले अखंड
जनाच्या पुढें काय ही पुत्रकन्या
नका शोधुं अन्या भजा लोकमान्या ॥ ३ ॥

स्वराज्यास द्या हा खरा न्याय सांगे
लढे भक्तिनें युक्तिनें वीर अंगें
सुधा सोडुनी कोण वे शुष्क धान्या
नका शोधुं अन्या भजा लोकमान्या ॥ ४ ॥

जगद्वंद्य सद्ग्रंथ आर्तीकहोम
दिसे ओरियानोंतही तोच जोम
स्पृहा ज्या नसे कीर्तिची लोकजन्या
नका शोधुं अन्या भजा लोकमान्या ॥ ५ ॥

" म्हणे जी खरी सांगतों तीच नीती
मनामाजिं माझ्या नसे लेश भीती "
कुठेंही तुम्ही ठेवण्याला मला न्या
नका शोधुं अन्या भजा लोकमान्या ॥ ६ ॥

किती सोशिले कष्ट कारागृहांत
सुखानें परी शांतचित्तें रहात
अहा काय ती लोकनिष्ठा अनन्या
नका शोधुं अन्या भजा लोकमान्या ॥ ७ ॥

जगाची स्थिती सांगुनी मांटिगोस
पुढें यावया लाविला दोन कोस

तप:सिद्धि ही काय साधेल अन्या
नका शोधुं अन्या भजा लोकमान्या ॥ ८ ॥

– कै. महाराष्ट्रभाषाचित्रमयूर कृ. ना. आठल्ये

' कीर्तन मासिक ' भा. शु. ११ शके १८४२.

---

## श्रीतिलक महिम्न

( जाति – चामराख्य )

लोकमान्य, देव-मान्य, मानवांत एकला
धन्य धन्य लोकमान्य दिव्य देव देखला
इंद्र, चंद्र अन् मुनींद्र वर्णितील कीर्तिला
नरेंद्र हा, सुरेंद्र हा, नरां-सुरांत शोभला ॥ १ ॥

इथेंहि थोर संत-संग त्या निवास लाधला
तिथेंहि लाल, पाल, मोतिलाल संग साधला
भवांतल्या असंभवांतही यशस्वि जाहला
तसाचि भव्य-वैभवांतही नृपाल शोभला ॥ २ ॥

महीतलींहि गाजला, तसाचि स्वर्गि साजला
म्हणोनि दिव्यशा विभूति गाति कीर्ति निस्तुला
लोकमान्य बाल तिलक भाल-तिलक शोभला
स्व-मातृ भूमिला; म्हणोनि विश्ववंद्य जाहला ॥ ३ ॥

लोकमान्य धन्य भव्य दिव्य देव भासला
म्हणोनि तत्पदीं प्रसून-गुच्छ हा समर्पिला
कितीहि वर्णितां न वर्णवेचि ज्या विभूतिला
तिथें विनम्र जाहल्याविना विवेक कोठला ? ॥ ४ ॥

'महाराष्ट्र'

– कृष्णमूर्ति, उमरावती

## कीर्तिरूपें विराजे

रत्नागिरीच्या शिखरीं उदेला
पासष्ट वर्षें दिपवूनि भूला
अहर्निशीं साधुनि लोककार्य
अस्तासि गेला तिलकाख्य सूर्य ॥ १ ॥

गंगाधराचा सुत लोकमान्य
नामें जरी बाळ, कृती वदान्य
जो हिंदभूचा तिलकस्वरूप
तो मावळे कीं, तिलकाख्य दीप ॥ २ ॥

असे ठेंगणी मूर्ति काळीं सुयोगीं
दिसे देवतांच्या स्थळीं उंच भागीं
कृतीनें फिकें पाडि गौरप्रमेया
वदूं बाळ गंगाधरीं कीर्ति गाया ॥ ३ ॥

गांगेयाच्या कृतीशीं सम, नच ढळला ध्येय साधी स्वओजें
गेला लोकांतरा जो तिलक–दिनमणी हिंद–भूभालिं साजे
विघ्नांची भीति सारी गिळुनिहि जनता सौख्यमार्गीत गाजे
सोसूनी कष्टराशी झिजवित तनुला कीर्तिरूपें विराजे ॥ ४ ॥

'केसरी'

— लक्ष्मणशास्त्री चंद्रात्रेय

---

## तिलकस्तव

स्वकार्य-निष्ठा उपकारि वृत्ति ।
स्वधर्म-श्रद्धा दृढ देशभक्ति ॥
ज्यांच्या नसे मोज मुळीं गुणांसी ।
लोकाग्रणीच्या नमितों पदासी ॥ १ ॥

स्वार्थांत ज्याचें न मुळींच लक्ष ।
असे सदा हिंदहितांत दक्ष ॥
गंगेपरी वृत्त विशुद्ध ज्याचें ॥
वंदी पदां मी तिलकप्रभूचे ॥ २ ॥

स्वराज्य हा हक्कचि जन्मसिद्ध ।
तो मागणें हें मुळिं ना निषिद्ध ॥
हें ध्येय चित्तांत वसें नितान्त ।
प्रणाम प्रेमें तिलका प्रभूंत ॥ ३ ॥

सेवा कराया प्रिय हिंद-भूची ।
सदा असे जागृत बुद्धि ज्याची ॥
निष्कामसें कर्म करी स्वभावें ।
सेवीं पदा मी बहु भक्ति भावें ॥ ४ ॥

– रा. ब. गोडबोले, पुणें

'केसरी' १९३४

---

# बंदिशाळेंतील तिलकस्मृतिदिन

स्वातंत्र्याचा प्रथम दिधला मंत्र तूं आर्यभूला ।
दास्याचा तो पथ तुडवुनी दाविली बंदिशाला ।
गांधीजींनीं पुनरपि दिला पाठ तो भारताला ।
जागा आतां तिळ न उरली दाटल्या बंदिशाला ॥ १ ॥

तूझ्यासाठीं प्रथम खुललें द्वार त्या डोंगरीचें ।
तूझ्या हस्तें खडक फुटले पुण्यभूसन्निधीचे । ( येरवडा ) ॥
मंडालेच्या तिमिरिं खपुनी शोधिला कर्मयोग ।
कारागारीं स्मृतिदिन तुझा होत हा धन्य योग ॥ २ ॥

गांधीजींनीं लवण लुटुनी दांडिचें बंड केलें ।
निर्वाणीची लढत लढण्या राष्ट्रही सिद्ध झालें ॥
वक्ते, कर्ते, अमित जनता शृंखलाबद्ध होई ।
कारागारीं तिलकस्मृतिला सार्थता आज येई ॥ ३ ॥

ज्याच्यासाठीं सतत लढुनी देह त्वां ठेवियेला ।
भाग्याचा तो सुदिन, तिलका, आज सन्नीध आला ।
इच्छा आतां, पुनरपि तुवा भारतीं जन्म घ्यावा ।
स्वातंत्र्याचा ध्वज फडकतां इंद्रप्रस्थीं पहावा ॥ ४ ॥

— यज्ञोपवीत

---

# तिलकगान

( पृथ्वी )

तव स्मरण विस्मरे जन असा जगीं ना दिसे ।
तुझ्यासमचि तूं जनीं अमर राहसी सयशें ॥
अगाध महिमा तुझा अळवुनी सदा गाउनी ।
वरेण्य तव नाम हें **'टिळक'** घेति ध्यानीं मनीं ॥

( सिंहोद्धता )

गंगाधरात्मज सुकीर्तित राजबिंडा ।
श्रीबाळ हा फडकवी जगिं कीर्तिझेंडा ॥
स्वातंत्र्यभव्यरण गर्जवि जो हतारी ।
व्हावें अजिंक्य जन हे टिळकानुसारी ॥

( शिखरिणी )

शिवाजीच्या राष्ट्रोत्सवसमयिंचा जो दिनमणी ।
गणेशी मेळ्यांचा अधिपति गुरूत्पादक जनीं ॥

सदा लोकांसाठीं अतिबिकट कारागृह वरी ।
जगीं गाती प्रेमें जन टिळकसौंदर्यलहरी ॥

— ज्ञानरत्न कवि रामराव मार्तंड भांबूरकर, बडोदें

'केसरी'

---

## नमस्कार त्या ' बाल गंगाधराला '

खरा तत्त्ववेत्ता खरा त्यागकर्ता
खरा धोरणी नित्य ज्या लोकचिंता ।
रणीं झुंजला, "लोकमान्य"त्व ज्याला
नमस्कार त्या " बाल गंगाधराला " ॥ १ ॥

जया भीति भ्याली दिशांतीं पळाली
कशाही प्रसंगीं उभा धीट बाली ।
अनाथास जो थोर आधार झाला
नमस्कार त्या " बाल गंगाधराला " ॥ २ ॥

जयाच्या मदानें फुगे राजशाही
तिला दापुनी स्थापितो लोकशाही ।
जशाला तशी तोड देई रिपूला
नमस्कार त्या " बाल गंगाधराला " ॥ ३ ॥

महा घोर निद्रेमधें हिंदराष्ट्र
बघोनी जपे बाल स्वातंत्र्यमंत्र ।
करी गर्जना कांपवी इंग्रजाला
नमस्कार त्या " बाल गंगाधराला " ॥ ४ ॥

खरा कर्मसंन्यास निष्काम कर्म
नसे देहसंन्यास गीतार्थ-वर्म ।
असे कर्मयोगी वदे जो जगाला
नमस्कार त्या "बाल गंगाधराला" ॥ ५ ॥

— गोविंद हरी हसूरकर

'हसूरचंपू'तून

---

# श्रीलोकमान्यस्मृति

( आर्या )

आमरण देशसेवाव्रत ज्यानें पाळिलें असामान्य ।
त्या लोकमान्य भारतवीराचा पुण्य दिवस हा धन्य ॥ १ ॥

ज्याचें जपतपसाधन स्वराज्यप्राप्तीविणें नसे दुसरें ।
अस्तासि जाय तो रवि परि त्याचें तेज भारतीं पसरें ॥ २ ॥

अन्य स्वदेश सेवक असती जे भारतांत वीरमणी ।
ते मौक्तिक सर त्यांच्यामध्यें हा धीर वीर हीरमणी ॥ ३ ॥

स्वातंत्र्य-देवतेनें या दिधला जो असे अम्हां मंत्र ।
तो सक्रिय आचरितां न टिकें हें पारतंत्र्य लवमात्र ॥ ४ ॥

श्रीलोकमान्य गेले स्वर्गाला भ्रमचि हा असे सकलां ।
अद्यापि यशःशशिच्या दिसती या भारतांत पूर्ण कला ॥ ५ ॥

वन गर्जन करि पूर्वी जो केसरि भारत-स्वराज्यरणीं ।
त्याच्या प्रतिध्वनीनें अद्यापिहि थरथरे पहा धरणी ॥ ६ ॥

गीतारहस्य त्यांचें ठेवुनि पुढती स्वराज्य कार्य करा ।
स्वातंत्र्य-प्राप्तीचा त्यांत असे सत्यपूर्ण मार्ग खरा ॥ ७ ॥

— पलुसकर शास्त्री, खानापूर

'केसरी'

---

## 'तिलकवंदन'

ज्यातें देउनि जन्म सार्थ नगरी ती होय रत्नागिरी ।
ज्यातें पुण्यपुरीपुढें मुदभरें घेई निजांकावरी ॥
तेजानें जगतास भासत हिरा जो हिंदभूचा खरा ।
माझे त्या प्रणिपात नित्य तिलका श्रीबाल गंगाधरा ॥ १ ॥

ज्याची लेखनि मर्म-भेदक असे, युद्धांत जैसी असी ।
जीचें तेज बघून भीतिस वरी ब्यूरॉक्रसी ती पिसी ॥
देई जागृति सर्व भारतजनां ऐशी जयाची गिरा ।
माझे त्या प्रणिपात नित्य तिलका श्रीबाल गंगाधरा ॥ २ ॥

'माझा हक्क असे स्वराज्य' सकला मंत्रास या देउनी ।
तत्प्रीत्यर्थ नितांत यत्न करण्या सर्वांस संबोधुनी ॥
जो मुंबापुरिमाजि अंत्य समयीं त्यागी तनू नश्वरा ।
माझे त्या प्रणिपात नित्य तिलका श्रीबाल गंगाधरा ॥ ३ ॥

ज्याच्या मृत्युकथेस ऐकुनि बुडे शोकार्णवीं भारत ।
झाले त्यापरि मित्र-शत्रुहि तदा यत्कीर्ति-गानीं रत ॥
कोणी त्या तिलकांजली वितरुनी दावी कवी आदरा ।
माझे त्या प्रणिपात नित्य तिलका श्रीबाल गंगाधरा ॥ ४ ॥

गातां सद्गुण-गान थोर जगिंचे वाचस्पती भागले ।
ज्याचें वांछित राष्ट्रकार्य करण्या आता सुधी लागले ।

प्रेमें ज्याप्रति 'लोकमान्य' पदवी साऱ्या जनीं अर्पिली।
सीताराम तयास अल्पमति हा वाही प्रणामांजली ॥ ५ ॥

— सी. न. साने, आबादान ( इराण )

## नमस्कार त्या लोकमान्याग्रणीला

जयें कर्मयोगा जना शीकवीलें।
स्वचारित्र्यतेजें परां दीपवीलें ॥
स्वराज्यार्थ जेणें महा यत्न केला।
नमस्कार ! त्या लोकमान्याग्रणीला ॥ १ ॥

निरोगी शरीरा जशी रक्तशुद्धि।
खऱ्या राष्ट्रभाग्या तशी स्वत्वबुद्धि ॥
तिच्यासाठिं जो स्थापि नव्यांग्लशाला।
नमस्कार ! त्या लोकमान्याग्रणीला ॥ २ ॥

स्वधर्म, स्वरीति, स्वकीयेतिहास।
स्वलाभार्थ यांचा सदा ऊपहास ॥
करीती, तया वाळि जो अंजनाला।
नमस्कार ! त्या लोकमान्याग्रणीला ॥ ३ ॥

अती गाढ व्यासंग निष्ठाहि वेदीं।
मति स्वाभिमानी, धृती, वृत्ति साधी ॥
खरा आर्य नेता जगीं तोच झाला।
नमस्कार ! त्या लोकमान्याग्रणीला ॥ ४ ॥

कितीही पडो गाढ अंधार घोर।
फिरे बाळ निःशंक, ना त्यास घोर ॥

कशाही न जो संकटा लेश भ्याला ।
नमस्कार ! त्या लोकमान्याग्रणीला ॥ ५ ॥

जरी सांवळी ठेंगणी मूर्ति, बाळ ।
स्वधैर्यें जयें लाजवीलाहि काळ ॥
जपोनी तयाची सदा गूणमाला ।
स्वराज्यार्थ नेटें करा उद्यमाला ॥ ६ ॥

— श्रीकृष्ण, परतवाडा

---

# लोकमान्यांचा स्वर्गौरव

( मंदाक्रान्ता )

शृंगारोनी कळस चढला रत्नसिंहासनाचा ।
साश्चर्यानें अमर पुसती " कोण हो यावयाचा ? " ।
तेथें स्वारी तंव विलसली बाळ गंगाधराची ।
" यावें यावें " सकल परिषत् बोलली निर्जरांची ॥ १ ॥

स्वर्बालांची कुटिल रचना ज्यांत येते दिसोनी ।
ज्यांचा गेला परिमल अहा ! सर्व भागीं भरोनी ।
कंठीं माला अमित पडली देवपुष्पद्रुमांच्या ।
कांठीं वृक्षांवर सुमनसें व्योमगंगानदीच्या ॥ २ ॥

स्वातंत्र्याच्या समरिं दिधलें पाठवोनी पतीला ।
स्वत्वासाठीं दहन-कुहरीं आत्म जोहार केला ।
" स्वर्गी आले टिळक " कळतां त्या चितोडी स्त्रियांना ।
ओवाळाया पुढति सरती दिव्य पंचारतींना ॥ ३ ॥

वात्सल्यानें बघुन नयनीं एकवेळा मुलाला ।
पाठीमागें कवळुन जिनें बांधिलें अर्भकाला ॥

झांशीवाली लढत चढली स्वर्गसोपानमाला ।
सर्वांआधीं तिलक तिलका पातली लावण्याला ॥ ४ ॥

"एकाएकी" निजमुखिं करी पृथ्विराजा विलाप ।
एकाकीही अतुल चढला शूर राणा प्रताप ॥
ते दोघेही कवळिति तया खड्गधारी नितांत ।
"सत्प्रीतीचें उपशमन तें होय आलिंगनांत" ॥ ५ ॥

गेहद्वारीं बसुन अथवा सौध-वातायनांत ।
देवी तेथें रुचिर बसल्या गौरवानें पहात ॥
नृत्यारंभीं पद चमकती यक्षिणी किन्नरींचें ।
मागोनी ते ध्वनि रमविती बाल-काव्यस्तवाचें ॥ ६ ॥

— द. आ. तिवारी

'कीर्तन' १९२०.

---

## धन्य लोकमान्य पुण्यश्लोक हिन्दकेसरी

(चामरवृत्त)

"आंग्ललोक देवदूत भरतांत पातले ।
पारतंत्र्य हें सुराज्य जाहलें !" असें भले ॥
लोक बोलले, भ्रमास ह्या निरस्त जो करी ।
धन्य लोकमान्य पुण्यश्लोक हिंदकेसरी ॥ १ ॥

"आंग्लराज्य हें सुराज्य मानिलें जरी तसें ।"
"जन्मसिद्ध हक्क आमुचा स्वराज्य हा असे ॥"
कोंडिलें यदर्थ ज्यास वर्ष षट्कपंजरीं ।
धन्य लोकमान्य पुण्यश्लोक हिंदकेसरी ॥ २ ॥

राष्ट्रनेतृमंडळांत अग्रगण्य गाजला ।
काननांत कीं मृगेन्द्र जेविं सिंह शोभला ।।
कालयोग्य क्रान्तिमार्ग शान्तिमार्ग आचरी ।
धन्य लोकमान्य पुण्यश्लोक हिंदकेसरी ।। ३ ।।

वेदसार कृष्णगीत ज्ञानसिन्धु मंथुनी ।
रत्न अमृतासमान कर्मयोग शोधुनी ।।
निर्मिला 'गितारहस्य' ग्रंथराज त्यावरी ।
धन्य लोकमान्य पुण्यश्लोक हिंदकेसरी ।। ४ ।।

सर्वश्रेष्ठ देशभक्त, पृथ्विख्यात पंडित ।
संततुल्य यच्चरित्र दंभलोभवर्जित ।।
कीर्तिदुंदुभी झडेल चंद्रसूर्य जोंवरी ।
धन्य लोकमान्य पुण्यश्लोक हिंदकेसरी ।। ५ ।।

— शंकर रामकृष्ण देशपांडे, पुणें

'दैनिक अग्रणी' १।८।१९४६

---

# लोकमान्यांचा गुणगौरव

( आर्या )

दुःखदवार्ता परिसुनि निधनाची लोकमान्य टिळकांची ।
हृदयांत चर्र झालें शक्ति गमे जाय सकल गात्रांची ।। १ ।।

औदासिन्य चहुंकडे भीषण पसरे रमे न मन कोठें ! ।
"गेले टिळक अरेरे !" वदती दुःखेंच सान वा मोठे ।। २ ।।

सौभाग्य सकल गेलें खचित महाराष्ट्र पोरकें झालें ! ।
संकट सहिष्णुता निःस्वार्थपणा अढळ धैर्य मावळलें ।। ३ ।।

अत्यंत थोर होते मुत्सद्दी राजकारणी टिळक
गाढा वीर न उरला त्यांच्यासम भारतीं पहा एक ॥ ४ ॥

निस्सीम देशभक्ति निर्भयता थोर आत्मविश्वास ॥
ते स्वावलंबनानें चढले हो 'लोकमान्य' पदवीस ॥ ५ ॥

दैदीप्यमान तारा स्वयंप्रकाशी जगांत हा झाला ।
लोकोत्तर बुद्धीनें पाश्चात्यहि जन पुरा चकित केला ॥ ६ ॥

गुणगौरव करण्या मीं पात्र नसे लवहि 'लोकमान्यां'चा ।
थोरांनीं केला बहु मी हा केला यथामती साचा ॥ ७ ॥

जें तुमच्या हृदयांतरिं दुःख गमे 'लोकमान्य' निधनानें ।
त्यांत विभागी मी हो अज्ञ परी खचित केवळ मनानें ॥ ८ ॥

— शंकर श्रीधर धनेश्वर, कर्डे ( नगर )

'लोकमित्र' १८।८।१९२०

---

# तिलकगौरव

( आर्यागीति )

निज केसरी, मराठा, पत्रें विख्यात जागृतीसाठीं ।
आपण नरकेसरिनें जन्मविलीं क्रांतिकारकें मोठीं ॥ १ ॥

तिलकां आवडला ना शक्तां किरकोळ सामनेवाला ।
राजाधिराज भूपति सत्ताधारीच मानले याला ॥ २ ॥

युद्धें अनेक केलीं सरकाराशींच राजकीय, धृति ।
श्रीमंत पंडितांनीं वाखाणावीं, अशींच तीं होतीं ॥ ३ ॥

काळें पाणी, साधी कैद, पुनः सक्तिच्या मजूरीची ।
खटला जामीनाचा; अधिकारी वर्ग त्या बहू जाची ॥ ४ ॥

झालें तथापि न उणें तिळभरिही तेज लोकमान्यांचें ।
उलटें वाढूं लागे, अग्नीसंगें जसें सुवर्णाचें ॥ ५ ॥

चतुरस्र बाळसम कुणि असतिल विद्वान् स्वदेशहितकर्ते ।
ज्यांचें धाडस पुरलें आगीपर्यंत धांवण्यापुरतें ॥ ६ ॥

मग आगींत उडी ती घेण्या झाले समर्थ ते तिलक ।
या एक्याच्च गुणानें होउनि गेले सुवर्ण-भू-तिलक ॥ ७ ॥

जैसे सुशिक्षितांचे होते ते अग्रणी, तसे नेते ।
होते अशिक्षितांचे; उभयांना साग्खेच्च आवडते ॥ ८ ॥

होती कुणी पुढारी केवल विख्यात शिक्षितांमाजीं ।
त्यांचें न नाम केव्हां होतें ठावें निरक्षरांमाजीं ॥ ९ ॥

पण लोकमान्य बाला शिक्षित तैसा अडाणि नांवाजी ।
ऐसा कोण धुरंधर झाला अधुना खरेंच सांगाजी ॥ १० ॥

आपण रत्नाकर सम गुणगणरत्नीं समृद्ध जो झाला ।
रत्नाकरासमीपचि आवडलें देह ठेवणें याला ॥ ११ ॥

गांभीर्य, ओज, अपुलें स्पर्धावें ह्या समुद्रहृदयानें ।
म्हणुनीच्च काय नेणों चौपाटी स्थान योजिलें यानें ॥ १२ ॥

इतरांच्या प्रेताचें दर्शनही मानिती न लोक बरें ।
बालप्रेतस्पर्शों जन बोले आपुलें न पाप उरें ॥ १३ ॥

राष्ट्रीय तीर्थ तेथें बनलें ज्या बोलती "तिलकतीर्थ" ।
आबालवृद्धनारीनर नमिति सर्व जाति मुक्त्यर्थ ॥ १४ ॥

काळें पाणी भोगित असतां कोणी चिरोल तो आला ।
हा बंडखोर म्हणुनी तिलकांना शब्द ठेवुनी गेला ॥ १५ ॥

षष्ठितमीं वाढदिनीं सव्वालक्षावरी; नवल वाटे ।।
आला अहेर ज्याला गणती करण्यास वेळ तो कोठें ? ॥ १६ ॥

नाहीं दाखविलें त्या मन अपुलें या विरक्त पुरुषानें ।
स्वीकृत राज्यहि जैसें देउनि शिववास रामदासानें ॥ १७ ॥

आपण देव असांना, लंपट विषयामधें बहू असतां ।
वैराग्य, लोकसंग्रह, तिलकांचा संप्रदाय घ्या आता ॥ १८ ॥

गीतेचा अर्थ तुह्मां कळला नसला तरी शिका महिमा ।
तो कर्मयोग दैवें मिनलासे मूर्तिमंत बाळ तुह्मां ॥ १९ ॥

— विष्णु विट्ठल इनामदार, विंटं

( 'तिलकपासर्ष्टा' या काव्यांतून निवडक कविना घेनल्या आहेत. )

---

## बाल-रत्न !

( मालिनी )

कालें डोळा चुकवुनि पहा चोरिलें बालरत्न
आतां प्राप्ती कधिंहि न जरी थोर केले प्रयत्न
गेला जो तो शर उलटुनी काय येईल हातां
त्राता कोणी खचितचि नुरे आर्यभूमीस आतां ॥ १ ॥

( पृथ्वी )

जरी गिरिहि कोसळे शिरिं परी जगन्नायका
तुला विसरणें सख्या वद खरा जगन्न्याय कां ?
करीं विदित भारताक्षितिजिं लोकमान्यांपरी
नरेंद्रतरणी हरी ! उगवणार केव्हां तरी ? ॥ २ ॥

'कीर्तन' मासिक — यादवसुत, नांदेड

# लोकमान्यांच्या पुण्यस्मृतीस

( सुमंदारमाला )

नसे पाहिली मूर्ति डोळां तुझी वा न तें ऐकिलें थोर वक्तृत्वही
परी दिव्य संदेश तूझा प्रणेत्या हृदीं बाणला आज संपूर्णही
" असे जन्मतां हक्क स्वातंत्र्य माझा — झटे त्यास्तवें जीवितान्तांतही
ध्वनी हाच वा लोकमान्यप्रभावें घुमे सिंधुशैलासमंतांत ही ॥ १ ॥

तुझी आस " भावी पिढीनें प्रभावी-बनावें पुढें झुंज द्यावी भली
त्वरें सार्थ स्वाधीनता मेळवावी जगीं भारता श्रेष्ठ न्याया पदीं
दिगंतीं प्रभा भारताची खुलावी ध्वजा रोवुनी त्या हिमाद्रीवरी
प्रभावें नि कर्तृत्व तेजें विराजो सदा हिंदभू अग्रभागावरी ॥ २ ॥

खुळ्या कल्पना राष्ट्रविच्छेदनाच्या महात्मे नि राजे जरी बांधिती
मुठेच्या जळीं मूठमाती तयांना अम्ही देववूं आज ही निश्चिती
उभा सिंधु आसिंधुपर्यंत सारा अखंडीत रक्षूं अम्ही भारत
त्वरें मेळवूं राष्ट्रस्वातंत्र्यही तें तुझ्या स्फूर्तिनें जाहलों जागृत ॥ ३ ॥

— शांतासुत, मुंबई

'अग्रणी' २।८।४४

---

# लोकमान्य

( रथोद्धता )

राष्ट्रभक्ति निजकार्य हें पुढें
लोकभार शिरिं ज्याचिया पडे ।
त्याविना इतर मानवास वा
लोकमान्य पदवी सुदुर्लभा ॥ १ ॥

आत्मसौख्य न दिसे जया कधीं
देशदुःख मनिं कल्पनावधि ।
कष्टतो निशिदिनीं तयामुळें
लोकमान्य पदवी तया मिळे ॥ २ ॥

झोंपतात जन हाच जागतो
चिंतनांत रजनीस कंठितो ।
भारतीय उदयास वांछितो
लोकमान्य निजराष्ट्र भक्त तो ॥ ३ ॥

व्यर्थ दंड पडला तरी पडो
बंदिवास घडला तरी घडो ।
जन्मभूमि नयनापुढें उभी
लोकमान्य बुध तोचि धैर्यधी ॥ ४ ॥

चालवी अतुल खड्गलेखणी
शत्रु शत्रुहृदयप्रहारिणी ।
बुद्धिमान् विलसतो बुधाग्रणी
लोकमान्य पद योग्य त्या जनीं ॥ ५ ॥

न्या तयास हिमशैलशेखरीं
द्या तिथून ढकलून भूवरीं ।
अंतिंही जप जपेल भारत
लोकमान्य पद तद्यशांकित ॥ ६ ॥

क्रूर काळ निज घातकी असे
लक्षही परि तयाकडे नसे ।
मातृभूमि हितरक्षणीं रते
लोकमान्य पद त्यास सेविते ॥ ७ ॥

सेवणें कधिं रसान्नभोजनें
खाउनी कधिं कदान्न राहणें ।
कष्टता परि जनार्थ तोच तो
लोकमान्य पदवीस पावतो ॥ ८ ॥

राजमान्य असतां वरोघरीं
विक्रमाविण मिळे बहादुरी ।
'श्रीयुतादि' परिपाठ चालतो
लोकमान्य विरळाच जन्म तो ॥ ९ ॥

धन्य धन्य गमते वसुंधरा
धन्य भारत तिच्यांतला हिरा ।
धन्य तें पुर गमे तयांतलें
लोकमान्य वसतीस राहिलें ॥ १० ॥

– द्वा. आ. तिवारी

'कीर्तन' १९२०

---

# नेता टिळक

(अभंग)

जन्मा येऊनीयां जगीं केली ख्याती ।
त्यासी नाहीं मुक्ती कोण ह्मणे ॥ १ ॥

कोणी म्हणे दंभी कोणी ह्मणे लोभी ।
परी कोणा न भी सर्वकाळ ॥ २ ॥

हिंदुमुसलमानीं ऐक्य तत्त्व केलें ।
प्रेम वाढवीलें सर्व जातीं ॥ ३ ॥

ऐसा लोकमान्य जन्मासी तो आला ।
तिन्हीं लोकीं झाला जयजयकार ॥ ४ ॥

कृष्णात्मज म्हणे माझी हे प्रार्थना ।
सुकार्यी वंचना करूं नका ॥ ५ ॥

— गो. वि. भागवत, निरव्हाळ

---

## स्वराज्यमंत्रा विसरुं नका

( फटका )

हिंदी जनहो ! बळवंताच्या स्वराज्यमंत्रा विसरुं नका ।
उद्योगामधिं कसर करोनी अवसर वैऱ्या देउं नका ॥

गंगाधरसुत चरितचिंतनें मनुजा स्वार्थ गमे व्यर्थ ।
स्वदेशसेवेंतच्चि इहलोकीं तयास वाटे पुरुषार्थ ॥

देशासाठीं सदैव तळमळ चळवळ धैर्यें चालविली ।
थोर गर्जना केसरीमुखें करुनी भूमी हालविली ।

प्रथम आचरी मग उपदेशी स्वजनी घेउनि जाइ पुढें ।
समय साधुनी हल्ला चढवी संकटिं धैर्या तेज चढे ॥

समोर परसत्तेच्या ठाके हिंदिजनांचा कैवारी ।
वाटे धैर्यच्चि मूर्तिमंत तें उपमा नाहीं त्या दुसरी ॥

अभिनव अर्जुन नवा शिवाजी नव्या युगाचा जगद्‌गुरु ।
लोकमान्य हा हिंदिजनांचा वंदन त्यातें चला करूं ॥

— बाळकृष्ण गणेश लेले

'सह्याद्रि' ऑगस्ट १९३५

# लोकमान्यजयंती

( शिखरिणी )

स्वराज्याला ज्यानें प्रथम दिधला जन्म हृदयीं
मुळें पाळें पानें सुमधुर फळें येति समयीं
सुगंधानें कोंदे भरतजननी प्रांत सगळे
स्मृतीयोगें सारा जनपदहित प्रांत उजळे ॥ १ ॥

( शार्दूलविक्रीडित )

बुद्धीनें दिसला अगाध जलधी मेरूपरी निश्चल
तत्त्वाच्या प्रतिपादनांत पहिला हा बाळ गंगाधर
गीतेचें कथिलें रहस्य सगळें रंगून कारावनीं
धन्या त्वन्मति आरतीस करिती लावूनि नीरांजनी ॥ २ ॥

—ग. गो. जोशी, पुणें

---

# नवजीवनाचा प्रेरक

( वसंततिलका )

जो धीर मेरुगिरिसा नर धैर्यशाली
गंभीर सत्त्वयुत जो जणुं उर्मिमाली
ज्याच्या जगीं गुणगणां तुलनाच नाहीं
त्या लोकमान्य टिळका मम वंदना ही ॥ १ ॥

मानूनि मूर्ति जनताचि जनार्दनाची
जो सिद्धता करि तिच्या नव अर्चनाची
वेंची तदर्थ तनुवाङ्मयही धनाही
त्या लोकमान्य टिळका मम वंदना ही ॥ २ ॥

हीं पारतंत्र्य निजभारत भूमिमाता
पाहोनि जो विसरला तनुपुत्रकांता
स्वातंत्र्य हींच जगिं ज्यास अभिष्ट वस्तू
त्या लोकमान्य टिळकास नमो नमोऽस्तु ॥ ३ ॥

भो लोकमान्य टिळका परलोकवासी
देहींच तूं नरवरा जरि जाहलासी
आत्मा तुझा परि गमे अमुच्यांत राहे
तेणेंचि राष्ट्र नवजीवन पावताहे ॥ ४ ॥

—भृंग

'केसरी' ३।८।३७

---

# कर्मयोगी

( वसंततिलका )

जो राजकारणरणीं चतुरस्र योद्धा
वेंची सदा तनुमनासि जनप्रबोधा
देशोन्नतीविण जयास स्पृहा न अन्या
त्या वंदितों जनहृदस्थित लोकमान्या ॥ १ ॥

ज्याची विचारसरणी शुचि गांगवारि
वाणी तशीच करणीहि वचोऽनुसारी
आदर्श यच्चरित होय सदा जनांना
त्या वंदितों जनहृदस्थित लोकमान्या ॥ २ ॥

चंडांशुही तपनशीतलता वरील
वेला नियुक्तनिजसागरही त्यजील

ज्याची मति स्थिरपरी मुनिसी चळेना
त्या वंदितों जनहृदस्थित लोकमान्या ॥ ३ ॥

स्वायत्तराष्ट्रिं जरि जन्म त्वदीय होता
लोकाग्रणी चतुर राज्यधुरा वहाता
कारानिवास विधि हाय लिही तयांना
त्या वंदितों जनहृदस्थित लोकमान्या ॥ ४ ॥

— रघुकुमार, मुंबई

'केसरी' ३१।७।३६

---

# स्वातंत्र्याचा तिलक

( अभंगांजलि )

त्रिखंडपंडित बुद्धि तीक्ष्ण फार । जणूं तरवार नवी कोरी ॥ १ ॥
कद्दा कर्मयोगी सांगे कर्मयोग । श्रोत्यांचें सौभाग्य फळा आलें ॥ २ ॥
जनताजनार्दन हाच देव मानी । धन्य त्याची वाणी रामदासी ॥ ३ ॥
मऊ मेणाहूनी असे देशदास । कठिण वज्रास भेदी परी ॥ ४ ॥
गुलामीचा आला लोकांला कंटाळा । वाटला जिव्हाळा स्वराज्याचा ॥५॥
पेटे क्षुब्धतेचा वणवा लोकांत । "असंतोषाचा तात" ख्यात झाला ॥ ६ ॥
"स्वराज्याची तहान सुराज्यें भागेना" । मंत्र सकलांना उपदेशी ॥ ७ ॥
टिळकांचें नांव गर्जे जगभर । स्वातंत्र्याचा वीर हिंदपुत्र ॥ ८ ॥

— प्रो. ना. के. बेहेरे, नागपूर

'केसरी' २।८।३५

# झेंडा तुवां रोंविला

( सुनीत )

मूर्ती धीर गभीर यद्यपि तुझी डोळ्यापुढें नाचते
कापी काळ चराचरा परि तुझी कीर्ती तया हांसते
स्वार्थाचा लवलेशही न शिवला तूं त्यासि सन्मानिला
क्रांतीचा नवभारतीय क्षितिजीं झेंडा तुवां रोंविला

होते सुप्त गुलामि जीवित बरें मानीत तेथें जन
स्फूर्तीची शिकवून त्यास वचनें जीं मूर्त तेजःकण
मोक्षांतील सुखें तयां पटविलीं ऊर्जस्वला मंगला
देशाचा इतिहास आज अपुल्या कोणामुळें रंगला ?

जेव्हां होइल हिंदभूवर नवी स्वातंत्र्यसंस्थापना
देऊं तैं पटवूनि सार्थ हृदयीं त्वत्प्रीतिच्या ज्या खुणा
या स्वातंत्र्यमिनारकाजिं रचिला पाया तुवां एकला
केला यत्न तुवांच बेडरपणें तोडावया शृंखला

*　　*　　*　　*

मानाचा मुजरा करी प्रथम मी त्या बाळगंगाधरा
जाळी हाय वियोगवन्हि हृदया... अंगार वाटे बरा

'केसरी' २।८।३५　　　　— मनमोहन, धुळें

---

# खरें लोकमान्यत्व

( भुजंगप्रयात )

जया देशसेवेविना काम नाहीं
नसे कीं सुखाची मुळीं कामना ही

जनां तोषवीतां उभा जन्म गेला
खरें लोकमान्यत्व शोभे तयाला ॥ १ ॥

जनां सेवितां सेवितां श्रांत झाला
अशी देवपूजा घडे नित्य ज्याला
मनीं मानला देह हा देव ज्याला
खरें लोकमान्यत्व शोभे तयाला ॥ २ ॥

जनांच्या हिता कष्टवीतो तनूला
जयाच्या असे मेळ वाणी कृतीला
नसे स्पर्शली स्वार्थवृत्ती मनाला
खरें लोकमान्यत्व शोभे तयाला ॥ ३ ॥

खरा धर्म तो पारतंत्र्या हरावें
खरा धर्म देशासि स्वातंत्र्य द्यावें
खरा धर्म हा देशसेवारताला
खरें लोकमान्यत्व शोभे तयाला ॥ ४ ॥

— वि. म. माटेगांवकर, मुंबई

'केसरी' २।८।३५

---

# तीन तपांपूर्वीचे तीन वक्ते

[ वसंत व्याख्यानमालेच्या हीरकोत्सवप्रसंगीं ह.भ.प. पांगारकर यांनीं शोधून पाठविलेले हे जुने श्लोक मालेच्या समारोपाच्या वेळीं म्हणण्यांत आले—नाशिक]

( आर्यागीति )

ह्या पुण्यपत्तनीं बहु असती विद्वांस थोर थोर भले
ज्यांच्या वाक्चातुर्यें लोक सकल सर्वकाल हे रमले ॥ १ ॥

'केसरिसुधारकांचे' झगडे सोत्साह पाहती सगळे
मीही त्यांताचि देखें वादार्थी बुद्धि सर्वदा पघळे ॥ २

व्याख्यात्यांची येथें नित्य पहा झोड ही उठायाची
त्यांत तिघेचि निवडले छाप श्रोत्यांवरी पडे ज्यांची ॥ ३ ॥

तो राजनीतिनिपुणप्रख्यात सुधारकाग्रणी शांत
झटला माधवराव स्वजनाभ्युदयार्थ जो अविश्रांत ॥ ४ ॥

विषयप्रतिपादन तें अंबरगंभीर धीर ती वाचा
चौरस चतुरस्र भला अवतारचि सत्य होय जीवाचा ॥ ५ ॥

हंसवी रडवी श्रोत्यां पैजा बांधूनि आठवे साची
त्या श्रीधरपंतांची वाणी ती स्फूर्तिदा जिव्हाळ्याची ॥ ६ ॥

गीर्वाण भारतीचा कंठमणी स्वेतिहास भास्कर हा
हा आर्यसंस्कृतीचा तेजस्वी पुत्र खचित या सम हा ॥ ७ ॥

तच्छिष्योत्तम मित्र प्रथितयशा सज्जनां महामान्य
हा **लोकमान्य तिलक** प्रज्ञा धृति ज्याचिया महामान्य ॥ ८ ॥

परपक्ष-खंडणी हा, शूर नसे कर्मवीर सामान्य ।
हा विजयवीर्यशाली होइल लोकां न या कसा मान्य ॥ ९ ॥

झटतो राष्ट्राच्या हा कायावाचामनें समुद्धरणीं ।
निःस्वार्थ प्रेमानें वश जेणें केलि ही पहा धरणी ॥ १० ॥

यांचें इतरांचेंही संगति-संभाषणादि सुख घडलें ।
तेणें त्यांच्या ठायीं गुरुबुद्धिप्रेम मन्मनीं जडलें ॥ ११ ॥

**—ह. भ. प. लक्ष्मण रामचंद्र पांगारकर,** बी. ए.

(आर्या ८।९।१० या लोकमान्य टिळक यांच्याविषयींच्या आहेत. परंतु कै. पांगारकरांचा रसाळपणा सलगपणें वाचकांच्या मनांत भरावा—आणि ता आकर्षकहि आहे — एतदर्थ सर्व आर्या दिल्या आहेत.)

# टिळकगुणरहस्य

( वंशस्थ )

सुपुण्य होतें बहु पूर्वसंचित
म्हणोनि विप्रत्व सुवांशिं लाधत
विशुद्ध बीजीं जननास पावला
श्रेष्ठां गुणां ठाव म्हणोनि जाहला ॥ १ ॥

निःस्वार्थवृत्ती मति सर्व भेदक
निरीक्षिली देशगती भयानक
स्वसंस्कृतिप्रेम अगाध मानसीं
म्हणोनि चित्तीं जडली अहर्निशीं ॥ २ ॥

स्वदेशभाषा निजधर्म उन्नत
अभ्यासयोगें मनिं हेंच बिंबत
येणें गुणें पंडितता प्रकाशली
तेणें उपायें मति नित्य लागली ॥ ३ ॥

मती विशाला क्षमता धनार्जनीं
त्यागासि तेणें बहुमान्यता जनीं
स्वार्थासि टाकोनि करीत उज्ज्वल
सर्वां गुणांचें हि सुरम्य मंडळ ॥ ४ ॥

स्वदेशनिष्ठा मनिं दीप पाजळे
तद्दुःख देखूनि निजांतरीं जळे
संपादुनीं निर्भयता सुवैखरी
म्हणोनि लोकप्रिय होत केसरी ॥ ५ ॥

प्रेमें जनांच्या धन अर्जिलें निकें
निर्लोभ औदार्य तया गुणें टिकें
उदारतेनें जनकार्य जोडिलें
तया गुणें अंगिं बळासि आणिलें ॥ ६ ॥

— सदाशिवानुज, पुणें

'केसरी' १९।७।३०

---

# पुण्यस्मृतिजागृति

( वसंततिलका )

आर्या ! तुझी विमल कीर्ति कितीक गाऊं
कैशा सुरम्य उपमा तुज अन्य देऊं
संबोधनें सुवचनें तुज लोकमान्य
झालास तूं जगतिं या बहु धन्य धन्य ॥ १ ॥

व्हावा महोन्नत जगीं निजजन्मदेश
हा लागला तव सदा हृदयास ध्यास
कार्यांत मग्न असतां अभिव्यक्त चित्तें
भ्यालास ना तिळभरी खलसंकटांतें ॥ २ ॥

जें राजकारण तुवां कथिलें जनांत
त्याचाच मार्ग धरिती अजि कार्यकर्ते
तें ध्येय आजिं धरिलें मनिं भारतानें
पुण्यें तुझ्या सफल होइल शीघ्र जाणें ॥ ३ ॥

— विवेक

'केसरी' २९।७।३०

# लोकमान्यांचें पुण्यस्मरण

( शार्दूलविक्रीडित )

पुण्यश्लोक नरावलींत पहिला जो भारतीं जाहला ।
जो नेता प्रिय राजकारणिं जना देशांत या लाभला ॥
केले कष्ट भगीरथासम जया स्वातंत्र्य देण्या जया ।
येतां दुष्टकृतांतदूतदिन हा सोडूनि गेला तया ॥ १ ॥

धैर्याचा पुतळा नरेश सजला धैर्ये वनीं केसरी ।
पावित्र्यें भरला सदैव तरणीतेजें नभोगव्हरीं ॥
गांभीर्यें नगवृंद लाजत असे पाहोनि ज्याला सदा ।
येतां दुष्टकृतांतदूतदिन हा स्वर्गासि गेला तदा ॥ २ ॥

— मारुति नारायण कात्रे, सातारा

'केसरी' २२।७।३०

---

# तिलकप्रशंसा ( स्तोत्र )

( शिखरिणी )

करी अन्वर्था जो निजवसतिनें पुण्यनगरी
विशुद्धा कीर्तीनें निखिल धरणी भूषित करी
ऋणी केलें ज्यानें स्वजननिवहं भारतजन
घडावें आम्हां त्या स्मरण तिलकाचें अनुदिन ॥ १ ॥

करी छात्रावस्थेमधिंच दृढ जो ध्येय अपुलें
जयें स्वार्थत्याग व्रत तदनु आजन्म वरिलें
स्वदेशातें अर्पी विमलगुण जो वाक्तनुमन
घडावें आम्हां त्या स्मरण तिलकाचें अनुदिन ॥ २ ॥

करा कारावासामधिंहि गहन ग्रंथरचना
जयाची पाश्चात्याप्रतिहि गमते धन्य रसना
चरित्रातें ज्याच्या क्षण करिं निराशा न सदन
घडावें आम्हां त्या स्मरण तिलकाचें अनुदिन ॥ ३ ॥

स्वराज्याचा ज्यानें शुचितर महामंत्र जपला
तदर्थ प्रेमानें झिजवि अपुला देहहि भला
जयाचें वाटावें श्रुतिसम अनुलंध्य वचन
घडावें आम्हां त्या स्मरण तिलकाचें अनुदिन ॥ ४ ॥

स्वदेशस्वातंत्र्यास्तव वरुनि कारागृह सुखें
विपत्ती जो भोगी मलिन करि तैसी रिपुमुखें
जयातें भक्तीनें कितिक करिती लोक नमन
घडावें आम्हां त्या स्मरण तिलकाचें अनुदिन ॥ ५ ॥

— मुकुंदराय, पुणें

'लोकसंग्रह' १।८।१९२१

---

# श्रीमत्तिलक-स्मृति !

( पृथ्वी )

अतिप्रिय जसा असे तिलक चंदनाचा जनां
तसाचि बहु आवडो टिळक बाळ माझ्या मना
परार्थ झिजतो स्वतां झिजविना परां थोर तो
तरी टिळकवंदनीं जन न कां मनें हो रतो ॥ १ ॥

स्वयें न झिजतां मुळीं झिजविते सदा चंदना-
सहाण निज सोडुनी वरि न चंदनाच्या गुणां

शहाणपण तें वरें झिजत चंदनासारिखें
सहाणपण तें बुरें झिजवि चंदना सारखें ॥ २ ॥

सुभाल परि जाहलें फिकट भारतीचें पहा
झिजोनि सुकुमार हो मळवटासि तीतें वहा
स्वयें तिलक होउनी टिळक दाविती त्या पथा
धराल तरि तत्स्मृतीदिनहि साजरा सर्वथा ॥ ३ ॥

– रा. द. पंत पराडकर

'केसरी' ३।८।१९२६.

---

# देई अतां तव स्फूर्तीसी

( चाल –'मी समजुं तरि काय० )

कां मान्यवर तिलक विलोपसि कां ?
निःशस्त्र निघतां आम्ही
दुर्दैवें सेनापति गळसी ॥ ध्रु० ॥

ध्येयास्तव आजन्म कष्टतां । ध्येय जरा जों ये दृष्टिपथा ।
तोंचि जासि या सोडुनि जगता । खिन्न करुनिया बंधुजनांसी ॥ १ ॥

बलवंतासह बलची गेलें । तिलकासह सौभाग्य हरपलें ।
नरकेसरिसह विभव लोपलें । दीनत्वचि ये महाराष्ट्रासी ॥ २ ॥

जाय राष्ट्रिंची मुत्सद्देगिरि । राजकारणीं सकलहि थोरी ।
वृत्ति धोरणी कार्यचातुरी । काय देश होणार अपेशी ॥ ३ ॥

कर्मठतेचें स्तोम माजलें । राजनीतीचें निघे दिवाळें ।
परि बलवंता चित्त पोळलें । देइं अतां तव स्फूर्तीसी ॥ ४ ॥

'केसरी' ५।८।१९२४ – 'चंद्र'

# वंदनांजलि

( शार्दूलविक्रीडित )

लोभाचा लवलेश ठेवि न कधीं कार्यीं धरी निश्चया
कष्टांनीं स्वपदा जरा न ढळवी वार्धक्य येवो वया
मानी वीर उभाच तो परिसुनी शिक्षेस मेरूपरी
" न्यायाधीश असे दुजा वर " म्हणे 'निर्दोष' त्याचे घरीं ॥ १ ॥

वंगाची चिरफाड हो मग तिथें कष्टा न कोणी गणी
दक्षा दक्षिण पाहुनी स्वजनते साह्यार्थ धांवे झणीं
नड्गें खड्ग तशा सतेज कृतिला ज्यातें सुनेतृत्व दे
घ्यावा तो अवतार आजहि तया वाणी जनांची वदे ॥ २ ॥

( २ )

लोकां दावि स्वराज्यमार्ग म्हणवी हा क्षुब्धतेचा पिता
" कष्टांना जन हो नका भिउं " म्हणे दे दाखवूनि स्वतां
मानी उन्नतिला स्वदेश चढतो एका स्वराज्यामुळें
न्या देशा तिकडे कसेंहि करुनी त्यासाठिं लावा बळें ॥ ३ ॥

वंदूं आज पुन्हां तया नरवरा दे स्फूर्ति त्याची स्मृती
दक्षत्वें करुनी तयासम कृती भोगा स्वराज्याप्रती
नन्दात्मा शिकवी रणीं पथ महाराष्ट्रास दे सांगुनी
घ्या चित्तीं समजूनि निश्चय करा या पुण्य ऐशा दिनीं ॥ ४ ॥

– केशव नारायण गडबोले, बी. ए., चिंचणी ( ठाणें )

# लोकमान्य म्हणणें मग तेव्हां

( रथोद्धता )

वित्तलाभ करण्या बहु शक्त
बुद्धिचे असुनिया प्रिय भक्त
स्वार्थहानि करिती जन जेव्हां
लोकमान्य म्हणणें मग तेव्हां ॥ १ ॥

घेउनी निज करीं निज शीर
शत्रुला दमवुनी अनिवार
साधिती जनहिता नर जेव्हां
लोकमान्य म्हणणें मग तेव्हां ॥ २ ॥

आर्यधर्म महती गुणगान
मातृभूमिचरणीं बलिदान
वृत्ति ही जडतसे दृढ जेव्हां
लोकमान्य म्हणणें मग तेव्हां ॥ ३ ॥

—अ. वि. पाटणकर, बी. ए., माखजन

'केसरी' ३१।७।१९४४.

---

# लोकमान्यवंदन

( मंदाक्रांता )

राष्ट्रासाठीं खडतर असा साहिला बंदिवास
केला प्रेमें सहन कुमती-लोक-निंदोपहास
कर्तव्याला त्यजुनि न परी कार्य केलें अपार
वीरांमाजी तुजसम असा तूंच वा एक वीर ॥ १ ॥

सत्पक्षाला स्वकरिं धरुनी ध्येय साधावयास
ज्ञानासीनें समितिसमरीं जिंकिलें पंडितांस
त्वत्कार्याची नवलपरिची पाहुनीयां धडाडी
वैऱ्यांनींही हलवुनि शिरें ठेविलें हात तोंडीं ॥ २ ॥

स्वातंत्र्याची तळमळ तुला लागली जी जिवास
ती निश्वासीं दिसलि तुझिया प्रत्यहीं भारतास
त्याच्यासाठीं तनमनधनस्फूर्तिनें वेंचियेलें
लोकश्रेष्ठा ! अभिनवयशें भारता भूषवीलें ॥ ३ ॥

दिव्यस्फूर्ति स्फुरविलि जनीं कर्मयोगेश्वरा हे
सत्त्वासाठीं सतत फिरुनी जन्मभूच्या स्वदेहें
व्हायाचें तें विधिहि न शके चूकवायास होणें
दाटे कंठीं गंहिवर परी त्वद्‌गुणांच्या स्मृतीनें ॥ ४ ॥

धीरोदात्ता प्रगतिपर जें उच्च शीलाभिजात
पावित्र्यानें गुरुपद जया प्राप्त झालें जगांत
सम्राटांनीं कुतुक करुनी प्रत्यहीं ज्यांस गावें
पुण्यश्लोका ! तव सुचरिता वंदितों प्रेमभावें ॥ ५ ॥

— ल. ग. वझे, आचरें

'आत्मानुभव'

( कांहीं निवडक कविता घेतल्या आहेत. )

---

# भारतभूषण कर्मयोगी लोकमान्य

( स्रग्धरा )

पूर्वींचे कर्मयोगी जनकविदुरही द्रोणभीष्मादि योद्धे
जे होती संप्रतीही गुरुमस सकलां वर्तनें आणि बोधें

त्यांच्या दावूनि पंथा निजचरित गुणें बोधिलें कर्म ज्यानें
त्या वंदूं लोकमान्या "तिलक" म्हणुनियां भारताचा नयानें ॥ १ ॥

( शार्दूलविक्रीडित )

लोकीं जो विलसे सदैव अपुल्या ज्ञानेंचि ज्ञानेशसा
कर्मांचा बहु व्याप मांडुनि जनीं निर्लेप जो दाससा
मानीं नित्य ' जनीं जनार्दन ' असे साक्षात् तुकाराम जो
न्यस्तस्वार्थ असा विभूति तिलक प्रेमातिरेकें भजो ॥ २ ॥

धैर्या सोडुं नका सुखा भुलुं नका टाका पराधीनता
कष्टा सोसुनियां स्वदेशजननीसेवा सदा तत्त्वतां
स्वत्वाला विसरूं नका परि नव्या ज्ञाना अव्हेरूं नका
ऐसें तैलककेसरी गरजुनी सांगे महाराष्ट्रिकां ॥ ३ ॥

ज्ञानीं तत्पर राहतो मनुज जो तो वंद्य साऱ्या मही
कर्मीं कौशल दावुनी शिकवितो लोकांस सद्धर्मही
धर्मज्ञान विराग वैभव यश श्री हे सहा सद्गुण
तो वंदूं तिलकस्वरूप भगवान् जो भारता भूषण ॥ ४ ॥

— रा. गं. भागवत, वणी

---

# श्रीलोकमान्य

शुचिष्मान् तुझें नांव ठावें न ज्याला
असा कोण तो मान्य भूमंडळीं ?
अभागी असा कोण या भूमिभागीं
नसे ज्यास चारित्र्य हें ठाउक ?

झुकें मस्त हस्तीपरी दृप्त तेंही
तुझ्या कार्यदीप्तीपुढें मस्तक
तुझें मूळसामर्थ्य राष्ट्रध्वजाला
महत्ता ध्वजानें तुझी फांकली ॥ १ ॥

तुझ्या घेत पायीं धडे देश आधीं
युगाची नवी गर्जना गाजतां
रहस्यें जगा कर्मयोगास बोधी
स्वतां कर्मयोगी तुझें जीवन
स्वराज्यास ये पातता जन्मसिद्ध
तुझा मंत्र राष्ट्रास संजीवन
व्यक्ती नसे शक्तिही लोकमान्य
तुझ्यानेंच लोकांस या मान्यता ॥ २ ॥

पायीं तुझ्या शृंखला घट्ट होई
तदा अल्प मातेगती मुक्तला
नेला कुशींतून हा बाळ दूरी
जनीं यास हृन्मंदिरीं ठेविलें
भेदावया मत्त सिंहासनें कीं
नवें वज्र हें आइचें पातलें
छायेंत या वाढले क्रांतिवीर
म्हणा यास "विद्रोहितेचा पिता" ॥ ३ ॥

दृष्टी जशी मूलगामी मुनींची
कवीची मती आणि द्रष्टेपणा
गांभीर्य हिंदी महासागराचें
हिमाद्रीपरी धैर्य स्वाभाविक

सह्याद्रिचा सिंह हा शौर्यशाली
नि आचारचारित्र्यगंगोदक
तुझी थोरवी वाढवी हिंदवी-भू
महाभारताच्या महाभूषणा ॥ ४ ॥

— 'मरंद', बा. अ. कोटनीस, बी. ए., बेळगांव

---

# लो. टिळकांची थोरवी

( शिखरिणी )

स्वयें मोठे गंगाधरतनय ते बाळ **टिळक**
स्वभालींचा मानी धरणि टिळकांतें सुटिळक ।
स्वराज्याचा मंत्र प्रथम टिळकांनीं शिकविला
स्वचित्तीं वंदावें म्हणुनि टिळकांला सुकविला ॥ १ ॥

खरा धीमान् नेता न कुणि टिळकांहूनि दुसरा
' डरावें ना कोणा ' सुगुण टिळकांचा न विसरा ।
धरा निष्ठा ऐशी अचल टिळकांत व्रतपरा
वरा स्वातंत्र्यातें ' **टिळक टिळक** ' ध्यानचि करा ॥ २ ॥

— दा. वि. जोशी, मुंबई

' आमोद रत्नावलि '

[ 'टिळक' शब्दांचीं सर्व विभक्तींचीं रूपें यांत " रामो राजमणिः " प्रमाणें क्रमानें आलीं आहेत. मात्र तीं दोन श्लोकांत आहेत एवढाच फरक. ]

## वंदन

( मंदारमाला )

लोकीं असे मान्य नेता असामान्य झाला जगीं धन्य धीराग्रणी
संदेश देशास जो देतसे खास 'वागा जशाला तसें' योजुनी
सद्ग्रंथ गीता स्वयें पारखोनी रहस्या जनीं सांगतो आचरा
कर्तव्यकर्मी सदा ध्यान ठेवा फलेच्छा त्यजा कर्मयोगा करा ॥ १ ॥

निःशंक चारित्र्य तेजस्विता दिव्य वाणी वदे गर्जना केसरी
माघार वा हार ठावी न लाचार नाहीं क्षमायाचना संगरीं
हा हिंदभूभालभूषा जणूं लाल-तिलकापरी मंगला शोभतो
पुण्यस्मृतीचे दिनीं आज त्या बाळगंगाधरा वंदितों वंदितों ॥ २ ॥

— ग. गो. मामण, सांगली

'मित्र' १।८।४६

---

## टिळक-स्मृति

( शार्दूलविक्रीडित )

देशा पूर्ण स्मृती तशीच विभुती लोकोत्तरा होय ती
जेणें मंत्र दिला स्वतंत्र करण्या या आर्यराष्ट्राप्रती
होतें राष्ट्र निशांत गाढ अवघें संजीवनी देउनी
केलें जागृत कष्ट सोसुनि स्वयें हें दास्य कीं जाणुनी

आहे उद्धट जो तयास बनणें विश्वांत या उद्धट
नीती हीच खरी तुवां शिकविली कृष्णास जी संमत
बंदीवास परी न खंतहि मनीं गीतार्थ संशोधुनी
केला ग्रंथ रहस्यबोध शिकवी निष्कर्मता सांगुनी

आहे तेवत ज्ञानदीपचि पहा हा केसरी या जनीं
इच्छा भारत मुक्त होउनि चढो स्वातंत्र्यसिंहासनीं
पुण्याई गमते खरीच मजला देशास जी लाभली
राष्ट्राचे गुरु लोकमान्यपदिं त्या ही वाहुं पुष्पांजली

– सौ. सरस्वतीबाई अफझुलपूरकर

'समर्थ' १९४६

---

## केसरी

( अभंग )

मेरूंत पहिला हिमाद्रि वरिष्ठ । वृक्षगणीं श्रेष्ठ कल्पवृक्ष ।
कृष्णादि यमुना सरितासंघांत । गंगा ही वरिष्ठ ख्यातलोकीं ॥
नाना चक्रें यंत्रीं घेतीं आवर्तनें । काय सुदर्शनें लेखावें त्या ।
असंख्यात तारे एका चंद्राविणें । नीलांबर सूनें विलोकितां ।
गजादिश्वापदा येईल कां सरी । नृपती "केसरी" सार्वभौम ॥ ४ ॥

– 'अरुण', कराची

'मोहनमाळ' काव्यसंग्रह

---

## तव स्मरण

तव स्मरण संतत स्फुरणदायि आम्हां घडो ।
त्वदीय गुणकीर्नध्वनि सुरम्य कर्णीं पडो ।
स्वदेशहित चिंतनाविण दुजी कथा नावडो ।
तुझ्यासमचि आमुची तनुहि देशकार्यीं पडो ॥ १ ॥

– लक्ष्मणशास्त्री लेले

• केसरीचें मुखपृष्ठ

## कृतज्ञतेचे अश्रु

गेला गेला राष्ट्रमार्तंड गेला ।
झाला झाला घोर अंधार झाला ॥
त्याचे जागीं वीर कोणी दिसेना ।
झाली चिंतामग्न राष्ट्रीय सेना ॥ १ ॥

— नारायण बळवंत कुलकर्णी, झांशी

---

## तिलकाभिवंदन

( वसंततिलका )

जो सोशिला घाव तुवां घणाचा
लाभे तरी मान हिरेपणाचा ।
तो दोष यामाजिं नसे कुणाचा
तो दोष तूझ्याच असे गुणाचा ॥ १ ॥

जी घेतली लोकहितार्थ दीक्षा
झाली तिची आज गमे परीक्षा ।
लाभे तदंतीं तुज चांदवाच
माळा तया घे चिरकाल वांच ॥ २ ॥

— रामचंद्र करंडे, गोमांतक

---

## तिलकप्रतिमाभिनंदन

( स्रग्धरा )

शोकावर्तात लोकां ढकलुनि सहसा स्वर्गलोकांत जाशी ।
आर्या ! तेव्हां जनानें अतिकरुणरवें प्रार्थिलें ईश्वरासी ॥

बाळाला जन्म द्यावा पुनरपि जगतीं लोककल्याण व्हाया ।
येशी त्याच्या निदेशें अवतरुनि सख्या काय या आज ठाया ॥१॥

जोराचा गार वारा मुसलसम महाघोर पर्जन्यधारा ।
चंडांशूंच्या करांचा निकर पसरला काय जाणी निखारा ॥
गारांचा थोर मारा हिमगिरिवर ज्या देतसे नित्य थारा ।
या सर्वा साहणारा मुनिसम असशी वंद्य आम्हां उदारा ॥ २ ॥

पौरांनो निद्रितांनो ! झडकरि उठुनी दृष्टि फेंका सभोंतीं ।
उद्योगालागि लागा जमुनि कृति करा सोडुनी बुद्धि कोती ॥
राखा धर्मप्रयत्नें स्वनियमित करा स्वीय भाषा स्वदेश ।
ऐसा हा मर्मराचा सुधवल पुतळा मूक सांगे निदेश ॥ ३ ॥

— के. प्रो. लक्ष्मणशास्त्री लेले, पुणें

‘ केसरी ’ १९।७।२४

---

# लोकमान्यांस

( वृत्त – भामिनी : राग – जोगी )

राजराजेश्वरा हो दयाळा । तांतडी कां असे हो निघालां ।
अंधकारीं पहातां नभांत । फिरे बोले अजूनीहि रात ।
देहकष्टामधीं रोड झाला । रात्र सारी न निद्रा तुम्हांला ।
कुक्कुटाचा नसे शब्द झाला । पाहटेचा न तारा उदेला ।
कैंवी उठाउठी हो निघाला । काय झालें असें हो दयाळा ।
हांक कोणी दिली हो तुम्हांला । तांतडी कां असे हो निघालां ॥ १ ॥

त्याप संताप सोसूनि सारा । वैरियांचा साहुनि मारा ।
लाथ हाणोनियां हो सुखाला । कष्टवीलें सदा कीं जिवाला ।
वास नाहीं सुखाचाहि ठावा । नाहिं ठावा शरीरा विसावा ।
त्याप ज्यासाठिं हा थोर केला । नाहिं भानू अजूनी उदेला ।
काय याहूनि ओढी तुम्हांला । तांतडी कां असे हो निघालां ॥ २ ॥

शांत या जाहल्या पाउलांला । नाहिं संधी चुराया मिळाला ।
नाहिं पत्रें फुलें पूजण्याला । वेळ आम्हां मिळाली दयाला ।
कोठ आतां बघूं त्या मुखाला । वंदुं कैसें अतां पाउलांला ।
नाहिं मार्गार्थ केली शिदोरी । नाहिं हातांत तांब्या न दोरी
गूढ संदेश कोठून आला । तांतडी कां असे हो निघाला ॥ ३ ॥

आमुच्या हो जरी काळिजाचें । आमुच्या हो जरी आंतड्याचें ।
दोर बांधू पहातीं पदांला । नाथ तत्रापि कां हो निघालां ।
शीघ्र सारा त्यजोनी पसारा । कांहिं केल्याविना हो विचारा ।
काळिजांतील साऱ्याहि गीती । आडव्या कीं तुम्हां साश्रु येती ।
पाहुनीयां तरीही न त्याला । तांतडी कां असे हो निघाला ॥ ४ ॥

कोणतें हो असें शिंग दूरी । घोर गर्त्रीं तुम्हां हांक मारी? ।
कोणता हो तरी मंत्र आतां । भूल घाली महाराज आतां? ।
कोठली हो स्मृती होय जागीं । केंवि वारे भरे शीघ्र अंगीं? ।
दुर्ग कोठील कोठील वाडे । बाग कोठील कोठील झाडें? ।
मोह घालूनि नेती तुम्हांला । तांतडी कां असे हो निघालां? ॥ ५ ॥

— **भा. रा. तांबे**

'तांबे यांची समग्र कविता', संपादक मा. त्रिं. पटवर्धन.

## पुण्यस्मृति

( चाल – नरजन्मामधिं )

झुळुक वायुची वाहुनि जाते लपते गगनोदरीं
मागुता डोल उरे तरुंवरी ॥ १ ॥

हिमबिंदूंनीं तुषारसिंचन केलें पृथ्वीवर
नांदतें पानावरिं दंहिंवर ॥ २ ॥

गायक ठेवी विणा खालता लोपति रागध्वनी
स्यंदनें उरतीं तारांतुनी ॥ ३ ॥

संगें घेउनि किरणां जातो अस्ता संध्यारवी
राहते क्षितिजीं अरुणच्छवी ॥ ४ ॥

ही जिवाजिवांच्या प्रेमाची माधुरी ।
भक्तांच्या हृदयीं स्मृति ठेवुनि हांसरी ।
लोकमान्य गेले देवांच्या मंदिरीं ।
देशभक्तिची ज्योत जागती निजहृत्कोनांतली ।
ठेवुनी तेवत कोटिस्थलीं ॥ ५ ॥

– साधुदास

'तरुणभारत', जुलै-ऑगस्ट १९३३

---

## लोकोत्तर लोकमान्य

वर्तमान ज्यातें नित्य स्मरे । तो धन्य जया काळ न विसरे ।

पोलादाचें अजस्र वेष्टन
काळ बसे भंवताली वढुन

त्यांत ठसा जो ठेवी खोदुन
प्रताप त्याचा अजब ठरे ॥ १ ॥

देशभक्तिचें नसानसांतुन
ज्याच्या उसळे अखंड जीवन
प्रिय नच कांहीं ज्यातें त्याहुन
लोकोत्तर तो कां न वरें ? ॥ २ ॥

जनतेचा तो प्रचंड सागर
कहर करी उसळतांच क्षणभर
परंतु सत्ता ज्याची त्यावर
धुरीण तो हें मात्र खरें ॥ ३ ॥

त्या योध्याला अमुचें वंदन
वंदनेंच होऊंही पावन
स्मरणांतहि पावित्र्य विलक्षण
चैतन्य दिलें जें तेंचि उरे ॥ ४ ॥

— अज्ञातवासी

---

# स्वराज्यध्येयाचा नंदादीप

( चाल – भारतीं सृष्टीचें )

लोकमान्यभक्ती भारतीं खेळे ।
दावीत संप्रतीं रूप आगळें ॥ ध्रु० ॥

हिंददेवीचा जो कौस्तुभ साजे ।
जनमनसिंहासनीं विराजे ।

पुण्यस्मरणानें स्फूर्ति संचरे ।
युवकांच्या मनीं आवेश भरे ।
देशस्वातंत्र्यार्थ कराया रण ।
प्राणत्यागाचाही करीती पण ॥ १ ॥

जनक हिंदवी असंतोषाचा !
गाजला विश्वांत मेरू धैर्याचा ।
मुंबापुरीमाजीं सागरतीरीं ।
सेनानी हा उभा पश्चिमद्वारीं ।
आव्हान देतसे पाश्चात्यलोकां ।
स्वयंनिर्णयाचा धरोनि हेका ॥ २ ॥

बृहस्पतीतुल्य बुद्धी जयाची ।
कर्मयोगी खरा मूर्ती सेवेची ।
संपदा आपदा ज्यासी समान
स्थितप्रज्ञ जैसा समाधी-लीन
रहस्य गीतेचें सांगाया जनीं
ये जणुं श्रीहरी पुन्हां अवनीं ॥ ३ ॥

स्वराज्यध्येयाचा नंदादीप तो ।
राष्ट्राच्या मंदिरीं आज तेवतो ।
लाविली तूं ज्योत त्या प्रकाशांत ।
चाले राष्ट्रपथीं पूर्ण निभ्रान्त ।
येई येई त्वरें तिलकराया ।
देश-दैन्य-दुःख दूर साराया ॥ ४ ॥

—वि. प. भागवत, चाळीसगांव

'केसरी'

# टिळकपुण्यतिथि

( जाति – भूपती खरं तें )

निजदेश विमोचनिं बाहु ज्याचे स्फुरले
ज्यांचे स्फुरले ।
विकसलें हृदय परदुःखमोचनीं धालें ॥ ध्रु० ॥

आक्रंदे अमुचें पुराण तो इतिहास
तो इतिहास ।
मन उचंबळो श्रीवीरकथा गाण्यास ॥

( चाल ) ऋषि कुणी आपुलीं हाडें । अर्पिती
कुणि रुधिरानें भूमीतें । न्हाणिती
कुणि तुरुंगांतले हाला । सोशिती

निजदेशालागीं सुखत्याग सुख झालें ।
श्रीलोकमान्यचरणारविंदिं शिर नमलें ॥ १ ॥

कष्टाचे कंटक स्वराज्यपथिं विखुरले
पथिं विखुरले ।
तुडविती त्यास हे देह विकल मग झाले ।
श्रीलोकमान्य पचविले तुरुंगद्वारीं
तुरुंगद्वारीं ।
परहृदयें झालीं मूर्च्छित तेजें सारीं ॥

( चाल ) सोशितां कष्ट विलसे तें । तेज हो
कळ दिसतां जन जागे व्हा । सर्व हो
नच गमो देशसेवेला । लाज हो

निज देशाचें हें मूर्तपुण्य जगीं ठेलें
या पुण्यदिनीं त्या नमनें वाहू सगळें ॥ २ ॥

— काव्यतीर्थ का. र. वैशंपायन, येवलें

भारतभूषण मेळा पद्यावलि, येवलें

---

## तिलक-वंदना

वंदन हे तिलकराज ! भक्तिप्रेमभावें
पुण्यकीर्ति ! कार्यकुशल ! नित्य तुज नमावें ॥ ध्रु० ॥

पारतंत्र्य घोर तिमिर
नाशाया बालमिहिर
उदित होय अर्घ्यदान त्याजला करावें ॥ १ ॥

गगनिं तारका अनेक
बालसूर्य मात्र एक
जनमानस कमलपुष्प यत्करें फुलावें ॥ २ ॥

परसत्ता रोग कुटिल
करि भारतभूस विकल
राष्ट्रप्रेम संजीवनि देह आत्मभावें ॥ ३ ॥

मानवास मुक्तिधर्म
निष्कामें नियतकर्म
गीतार्थी हेंचि मर्म नित्य आचरावें ॥ ४ ॥

निजसत्ता प्राप्त करूं
जन्मसिद्ध हक्क वरूं
मंत्र वदे जो द्रष्टा त्याजला भजावें ॥ ५ ॥

ध्येय थोर यत्न थोर
यातना सही अघोर
कर्मयोगि हाच खरा यास अनुसरावें ॥ ६ ॥

— दा. ल. अडोणी, एम्. ए., सागर

---

## सानंद पुण्यस्मरण

लोकमान्या ! हिंदभूसंजीवना !
त्या स्मृतीला आजला ही वंदना ॥ ध्रु० ॥

केसरीची गर्जना ती ऐकुनी
होत जाग्या भारताच्या भावना !
मुक्तता कारागृहीं ही भोगिली
कर्मयोगाची कराया घोषणा !

आज कोठें तीं प्रभावीं मंडलें
सुन्न झाल्या आमुच्या संवेदना
'पालटावा काळ हा' — गातों अम्ही
एक आतां आमुची ही प्रार्थना

— 'अशोक', नाशिक

'न्यू इंग्लिश स्कूल मासिक' टिळक विशेषांक, १९४२

---

## श्रीलोकमान्यांस

( जाति — वीरभद्र : राग — शंकरा )

आज तुजवांचुनी शून्य साऱ्या दिशा
ध्येय प्रेरी तया लोकमान्या ॥ ध्रु० ॥

क्रूर उन्मत्तता दुष्ट मनिं गांजतां
दैन्य दारिद्य्र तें भारतीं पीडितां
तडतडा बंधनें तोड परतंत्रता
धांव रे तूं झणीं लोकमान्या ॥ १ ॥

वीर निद्रा त्यजीं केसरी या क्षणीं
कडकडा फोडुनी गर्जना काननीं
पौरुष प्रेषुनी कर्मयोगा जनीं
खवळवीं जनपदा लोकमान्या ॥ २ ॥

पूर्वजांची स्मृती करुनि लोकाग्रणी
जागवीं पेटवीं लोक सारा मनीं
ऐक्य राष्ट्रीयता संतत स्थापुनी
खड्ग घे तूं करी शत्रुनिर्दालना ॥ ३ ॥

— वामन शिवराम आपटे, एम्. ए., पुणें

'विकास', १।८।४५

---

## टिळकपुण्यस्मरण

पारतंत्र्य घनघोर तमोमय भारतभू झाली
नयनाश्रू ओघळति अहर्निश हृदयीं व्याकुळली

हिमालयाच्या सह्यगिरींच्या कडेकपारांत
परदास्याचीं भूतपिशाचें नाचतिं दिनरात

पूर्वार्जित धनवैभव गेलें सोडुनि देशाला
चराचराला मानव्याला आली प्रेतकळा

( चाल ) इतक्यांत चेतनागुलाल उधळित कुणीं
प्रकटली स्फूर्तिमय उषा अरुण प्रांगणीं
टवकारुनि बघती अवघे जन त्या क्षणीं

गंगाधरसुत तिलककुलोद्भव बाल तिलक आला
खडतर तप भारतमातेचें जणुं ये उदयाला ॥ १ ॥

— वैद्यकुमार रायकर, चिपळूण

---

## पुनः माउली गे तुझ्या बाहुपाशीं !

(कै. सुब्रह्मण्य भारती यांच्या 'In thy arms again' या कवितेचा अनुवाद)

पुन्हां माउली गे तुझ्या बाहुपाशीं
सुखस्पर्शनें ! स्नेहले ! प्रेमले ! ।
तुझी गोड वाणी पुन्हां येइ कानीं
दिसे तें पुन्हां तेज नेत्रांतलें ॥
तुझा दाटला कंठ गे बाळ येतां
महामान्यता पावला जो जनीं ।
तुझा वत्सल स्पर्श होतां तयाला
पुन्हां प्रेमअश्रू तुझ्या लोचनीं ॥ १ ॥

पुन्हां माउली गे तुझ्या बाहुपाशीं
सहा लोटतां दीर्घ वर्षें दुरी
बहू कष्टला एकला बंदिवासीं
जिवा यातना जेथ नानापरी ॥
युगें वर्तलीं जाहलीं आड विश्वें
तरी आइची दृष्टि बाळाकडे

तिच्या प्रीतिची ज्योत नित्य प्रकाशे
न काळस्थळांचें तिला सांकडें ॥ २ ॥

कसा काळ हा मायवत्सांसि तोडी
तुझ्या घाव घाली कलीजावरी
तया जिंकुनी पुण्यभूमे ! तुझा गे
पहा श्रांत हा बाळ आला घरीं ॥
पुन्हा माउली गे तुझ्या बाहुपाशीं
करो हा सुखें सर्वदा आसरा
बलोत्साह-संपन्न चैतन्यशालीं
चिरायू करी लाडक्या लेकरा ॥ ३ ॥

अनुवादक : ज. गं. करंदीकर, बी. ए., बी. टी., बार्शी
'सह्याद्रि', ऑगस्ट १९४०

---

# लोकमान्य टिळक

( सौ. सरोजिनी नायडू यांच्या 'Lokamanya Tilak' या कवितेचा अनुवाद )

स्तवावी कशी मानवी भावनांनीं
तुझी भव्यता वृत्ति वीरोचिता
तुझ्या थोर सह्याद्रि राजीपरी त्या
यशाला तुझ्या कोणि तुळंधिता
महामान्यता पावली भूवरी ती
तुझी सत्कृती मृत्युला जिंकुनी
जिच्या दिव्य तेजें पहा भारताचें
तमोजाल तें जाइ विध्वंसुनी ॥ १ ॥

प्रभावी तुझें शौर्य चातुर्य विद्या
तपस्या तशी एक वाणा तुझा
अहा ! दुःखदैन्याचिया पार जाशी
उभारूनियां कर्मयोग ध्वजा
नमो वीरसिंहा तुवां घोषवीलें
स्वराज्यासि गायत्रि मंत्रापरी
नमस्ते महर्षे वसिष्ठोपमा ती
तुझी धैर्यशाली कृती वैखरी ॥ २ ॥

तुवां लोकिं चैतन्य जें निर्मियेलें
असो आमुचा वारसा त्यावरी
तुझ्या सद्यशाला न सीमा कुठेंही
कधींही न त्या अंत कालोदरीं
तुझें वीरचारित्र्य गाती स्वभावें
महासिंधु चौफेर जे गर्जती
परी अंजली आम्हि सद्भावनांची
तुला अर्पिली सान ही संप्रती ॥ ३ ॥

अनुवादक : ज. गं. करंदीकर, बी. ए., बी. टी., बार्शी

'सह्याद्रि', ऑगस्ट १९४२.

---

## " समीप आहे स्वातंत्र्याचा अरुणोदय आतां "

पुण्यतिथीच्या पुण्यस्मरणीं गान तुझें गावें
सद्गुण सारे आदरभावें जगता सांगावें ॥ १ ॥

पुण्याईचा थोर आमुचा महाराष्ट्र देश
म्हणुनि लाभला असा पुढारी जगास आदर्श ॥ २ ॥

दांभिकतेच्या दिव्यत्वाच्या वृथा कल्पनेस
राजकारणीं कधीं न थारा दिलास केव्हांच ॥ ३ ॥

मिळेल तें घ्या अधिकासाठीं झुंजा सत्तेशीं
व्यवहाराची दिशा दाउनी दिलीस आम्हांसी ॥ ४ ॥

त्याच दिशेनें स्वातंत्र्याचें मंदिर लागेल
ठाउक असुनी कां न कळे परि होइ दिशाभूल ॥ ५ ॥

स्वर्गामधुनी आशेनें तूं पहात असशील
कधीं एकदां भूमाता ही स्वतंत्र होईल ॥ ६ ॥

विश्वासानें त्याच सांगते तुजला ही जनता
समीप आहे स्वातंत्र्याचा अरुणोदय आतां ॥ ७ ॥

— द. कृ. पेंटे, पुणें

'काळ' १।८।४२

---

# लोकमान्यप्रशस्ती

( 'महाराष्ट्रदेश' या खंडकाव्यांतील उतारा )

समरीं संगर खेळुनि दमले या पुढतीं हात
महाराष्ट्रा तव मस्तक करि मग रिपूवरी मात
धनंजयाला सांगे समरीं गीता गोपाळ
सांगे गीतारहस्य कारागृहीं तुला बाळ

वाणी करणी एक जयांची असे लोकमान्य
आर्यनिवासस्थान शोधिती हें विद्वन्मान्य
रत्नागिरिचें रत्न चमकलें हिंदुस्थानांत
प्रभा तयाची दूर फांकली साऱ्या जगतांत

ज्ञान झटे अज्ञानासी वा शक्तीसह युक्ती
परदास्याचें नरडें फोडी देशाची भक्ती
स्वार्थाला दे लाथ सुखाच्या मानेवरि हात
कर्मयोग निष्काम आचरी हा भगवद्भक्त

महाराष्ट्रिंचा पंचानन हा बाळ टिळक वीर
शहर पुण्याचा लोकमान्य हा पंचप्राण धीर
शिवरायाची कर्तबगारी दासांचें ज्ञान
महाराष्ट्रा तुज तारायाला आलें धांवून

विद्वन्मणि नरशार्दुल योगी भक्तां टिळकवरा
महाराष्ट्राच्या अनभिषिक्त भूपाला हा मुजरा
राष्ट्रकारणी मुत्सद्दी हा महाराष्ट्र-प्राण
स्वार्थत्यागी वीर अरींची करि दाणादाण

विद्वानांच्या भिषग्वरांच्या वक्त्यांच्या देशा
समयज्ञांच्या सुजाण देशा लोकमान्य देशा
गुणगणमंडित पवित्र सुंदर लोकमान्य देशा
गोड करुनि घे मनोहराची भक्तीची भाषा

— 'मनोहर' ऊर्फ गो. गं. पोतदार, एम्. ए., एल्. टी.

---

## मायदेश

( मंदारमाला )

स्वार्थावरी लाथ देवावरी चित्त धर्मावरी भिस्त न्यायीं रती
कर्तव्यप्रीती सदा धर्मनीती तशी राष्ट्रभक्तीहि आचारिं ती ।

ऐसे महाभाग ज्या मायदेशामधें कोणताहि असो देश तो
उत्कर्ष पावेल तो देश ते लोक तो धन्य भूभागही वाटतो ॥ १ ॥

— गो. गं. पोतदार

'पद्यावलि'

---

## पुण्य-स्मरण

( चाल – मी समजुं तरि काय. )

स्मरण करूं आज तया गुरुचें ।
प्रवर्तिला शुभरम्य महोत्सव महाभाग त्या परंतपाचें ॥ ध्रु० ॥

गंगाजलसम जीवन गाजे
देशभक्तिचीं भेरी वाजे
प्रज्ञापर्वत संज्ञा साजे

मूर्तिमंत जें पुण्य पुण्याचें ॥ १ ॥

— ॲ. श्री. गं. भट, एम्. ए., एल्एल्. बी.

'गणेशसाहस्री'

---

## पंचांगवाद व टिळक

( चाल—हें रम्य नील नभ रचिलें । तेजानें सारें भरलें । कुणि वरें )

वेधज्ञ आणि गणितज्ञ । मानिती केरुतें तज्ज्ञ । सुजनहो ।
पंचांग शोधिलें त्यानें । धर्माच्या अभिमानानें ॥ सुजनहो ।
चालना त्यास टिळकानें । दिधली कीं उत्साहानें ॥ सुजनहो ।
बोलती टिळक पंचांग । प्रत्ययीं संग । सकल उत्तुंग ।

मान्य हो जगतीं । सद्धर्मीं वाढवी प्रीती ॥ सुजनहो ।
पंचांगवाद हा कुठला । महाराष्ट्र मत्सरें विटला ॥ सुजनहो ।

( आर्या-गीति )

तिलकस्नेहें शिशिरीं होय सदा सुखद मकर मित्रकर
पंचांगशुद्धि नावें देतों मी तिलक भरुनि मित्रकर ॥ १ ॥

– रा. गं. भागवत, वणी

' छापील पत्रक '

## स्मृतिसुमनें

स्मृतिसुमनें पदयुगुलीं वाहतों तुझ्या हीं ॥ ध्रु० ॥

गंध न मुळिं यास जरी गोड करुनि घे हीं
वाहिलेंस वित्त तुझें
अर्पिलेंस चित्त तुझें
त्यागिलेंस सौख्य तुझें
राष्ट्रहितापायीं ॥ १ ॥

दास्यपूर्ण जीवनांत
स्फुरविलीस दिव्य ज्योत
तेज जिचें उजळवीत
नित्य दिशा दाही ॥ २ ॥

व्हावयास मुक्त देश
क्लेश किती सोसलेस
आठवतां ते मनास
हृदय भरुनि येई ॥ ३ ॥

कोमलता कुसुमाहुन
प्रखरताहि रविसमान
परि त्यांचें मधुमीलन
होत तुझ्या ठायीं ॥ ४ ॥

– माधव नावडीकर, अष्टें (सातारा)

'टिळक हायस्कूल त्रैमासिक'

---

## 'गाउं आरती'

(चाल – बहु असोत०)

लोकमान्य राष्ट्रपुरुष धन्य भारतीं
कोरावी कांचनाक्षरांत तत्कृती ॥ ध्रु० ॥

सिंहासम गर्जविला नित्य 'केसरी'
भाल्याची फेंक 'मराठा' सदा करी
जिंकण्यास भाग्यलक्ष्मि सज्ज संगरीं
शस्त्रहीन भारतास 'कृष्ण-सारथी' ॥ १ ॥

तेजस्वी ओघवती तीव्र लेखणी
ओजस्वी मर्मभेदि शब्दफेंकणी
स्फूर्तिप्रद दिव्य सद्विचार-पेरणी
जिव्हाग्रीं मूर्तिमंत श्रीसरस्वती ॥ २ ॥

जन्मसिद्ध तो स्वराज्यमंत्र घोषिला
'उद्धटासि उद्धट' हा धर्म शिकविला
बंदिवास भोगुनि झुंजार झगडला
स्वातंत्र्यप्राप्तीस्तव लोकजागृती ॥ ३ ॥

विद्वत्तापूर्ण असें ग्रंथलेखन
कर्मयोग सिद्ध करी सार्थ जीवन
देशोन्नति हेंच अहोरात्र चिंतन
सच्चरित्र वर्णुनियां गाउं आरती ॥ ४ ॥

— शं. ना. बर्वे, पुणें

'केसरी' १९४६

---

## लोकमान्यांच्या दहाव्या दिवशीं

( फटका )

गेला गेला भरतभूमिचा टिळक बाळ गेला
वार्ता पडतां श्रवणीं स्तंभित जन सारा ठेला ॥ १ ॥

प्रातःकाळीं पक्षीजन कुणि बोलाया जाई
शब्द न उमटे शून्य तयातें सृष्टी ही होई ॥ २ ॥

निज बाळाच्या मुखीं घालुनी स्तन माता बसली
दुग्धाचें जल नयनीं झिरपे स्तन झाले खालीं ॥ ३ ॥

शिशु आक्रंदे तयास जवळीं घेईना कोणी
थोर असोनी शिशुसम रडती बाइलसे बनुनी ॥ ४ ॥

प्रभुपूजन जो करण्या वाली आसन ती भामा
रामा ! रामा ! हाय न्हाणिते अश्रुजलें रामा ॥ ५ ॥

जणुं चेतनता नष्ट जहाली पुष्पांचा गंध
तेज निमालें रत्नाचें कीं तुटे राष्ट्र-बंध ॥ ६ ॥

सूत्रधार राष्ट्राचा जातां मणिसे ओघळले
भिरि भिरि पाहति रडती गेला लोकमान्य बोले ॥ ७ ॥

जनतात्म्यातें बसला धक्का काळें ओढीतां
सर्व सृष्टितें अश्रुलोचनीं आपैसें बघतां ॥ ८ ॥

भारतभूची दैन्यावस्था झांकियली ज्यानें
निज तेजानें जगा दिपविलें राष्ट्रभास्करानें ॥ ९ ॥

विद्वत्तेची दांतखीळ कां बैसे ही आज
काव्याचा रस नवविध कां नच ? शोकाचें राज्य ॥ १० ॥

ज्योतिष सारें निष्प्रभ झालें शास्त्र मूक झालें
स्थितप्रज्ञता दाखविण्याला स्थान न तें उरलें ॥ ११ ॥

धैर्य जयाचें शत्रूलागीं निशिदिनिं रडवीत
आतां आलें धैर्य कराया कोल्हेकुई त्यांत ॥ १२ ॥

(२)

जनांतरंगा ! हे श्रीरंगा ! तुज पडली चिंता
भूमातेच्या सत्यस्थितिची कोण करिल वार्ता ॥ १३ ॥

सुरवर सारे जमला कां रे अवतरण्या येथें
सन्मति पुसण्या प्राणा अमुच्या नेलें कां तेथें ॥ १४ ॥

सूर्या चंद्रा तेज तुम्हां तें सत्यापासून
सत्यप्रभ भास्कर हा अमुचा तुम्हांहूनि न्यून ॥ १५ ॥

गुणवर्णन कां सागरतळिंचा क्षुद्र जीव करिल
दिव्यांबरिचें किंवा लाघव मानव बोलेल ॥ १६ ॥

जनमनसाक्षी हा दीर्घाक्षी लोकमान्य गेला
तद्गुणगायन अश्रूमोचन काव्यविषय झाला ॥ १७ ॥

कविते ! आतां पुरे पुरे हा शोक करी न गडे
मूक होउनी अश्रू गाळी हृदयीं पडाति तडे ॥ १८ ॥

जिवंत असतां मानव होता आतां हो देव
त्रैलोक्याला वंद्य म्हणोनी लोकमान्य नांव ॥ २९ ॥

– वसंतमित्र, राजकोट

'संदेश' १९२०

---

## हा लोकमान्यराया !

( चाल – आनंदकंद. )

देवास वाहि काया । हा लोकमान्यराया ॥ ध्रु० ॥

बोले जसा मुखानें । वागे तसा कृतीनें
दवडी क्षणा न वाया । हा लोकमान्यराया ! ॥ १ ॥

निजदेह कष्टवोनी । निजसौख्य तें त्यजोनी
स्वजनास लावि माया । हा लोकमान्यराया ! ॥ २ ॥

उपदेशि कर्मयोगा । करि देश सर्व जागा
पळवी विमोह माया । हा लोकमान्यराया ! ॥ ३ ॥

शोभे जनांस नेता । गाजे जगीं विजेता
लावी खळां नमाया । हा लोकमान्यराया ! ॥ ४ ॥

देशास जागवीलें । जीवंत राष्ट्र केलें
घाली स्वराज्यपाया । हा लोकमान्यराया ! ॥ ५ ॥

ही हिंद भाग्यशाली । तिलकें जगांत केली
सकलांस लावि गाया । हा लोकमान्यराया ! ॥ ६ ॥

हा बाळ हिंदभूचा । कलिजा तिच्या जिवाचा
जनताहृदासनीं या । हा लोकमान्यराया ! ॥ ७ ॥

हें रत्न हिंदभूचें । जगतीं अमोल साचें
हृदयीं सदा जपूं या । हा लोकमान्यराया ! ॥ ८ ॥

कर लागती नमाया । ते नेत्रही बघाया
मुख लागतें वदाया । हा लोकमान्यराया ! ॥ ९ ॥

प्रेमें तयास गाऊं । भावें तयास सेवूं
ध्यावूं सुखें चलाया । हा लोकमान्यराया ! ॥ १० ॥

'मुकुलिका' काव्यसंग्रह — कै. भास्कर विनायक देवासकर, बडोदें

## श्रीतिलकस्तवन

वंदन बलवंता ! बलवंता ! स्वातंत्र्यदेविच्या संता ॥ ध्रु. ॥

हिंदभूमि ही परदास्यानें दीना हीना झाली
तुझ्या प्रतापें बुद्धिभास्करा । सुकली कलिका फुलली ॥ १ ॥

कारागार स्वर्ग मानिलें । शृंखलेस सुमनाला ।
तुझ्या बंधनें निज देशाचा । मोक्षकाल हा आला ॥ २ ॥

सर्वस्वाला वाहुनि केली । व्यक्तिसुखाची होळी ।
स्वातंत्र्याचा मार्ग दाविण्या । अम्हां दीपिका झाली ॥ ३ ॥

तुझी भरारी राष्ट्र-अंबरीं । चंडोलासम गमते ।
रजनी सरतां भाग्यरवीला । स्तविशी स्वागतगीतें ॥ ४ ॥

गुंफितील तव नाम सदोदित । शाहिर सुंदर कवनीं
खड्गाच्या तालावर रमतिल । शूर वीर तव गानीं ॥ ५ ॥

सर्व खरें परि तव मुक्तात्मा । सर्व थोर मानेल ।
स्वातंत्र्याचें निशाण जोंवरि । गगनीं ना फडकेल ॥ ६ ॥

'केसरी' ३।८।१९२६ — मंजुमाधव

# हिंदभूमीचा सुपुत्र

( चाल – किती प्रभूची थोर कृपाहि. )

हिंदभूमिचा सुपुत्र झाला बालतिलक हा खरा
वाटतें कोहिनूर दूसरा ।
कीर्तिकेतु हा फडकावोनी लोकमान्य पदविला
चढोनी भूषविलें निजकुला ।
निजदेहाला मातृभूमिच्या वाहुनि चरणांवरी
सोशिले कष्टहि नानापरी ।
देशसेवका कारागार प्रासादचि भासती
शृंखला मालांपरि शोभती ।
बलवंतानें स्वातंत्र्याचा नाद नभीं घुमविला
भारता कर्मयोग शिकविला ।

( चाल ) भारता ऊठ अतां बा तरी
निश्चयें कर्ममार्ग आचरीं
सोडवीं मातृभूमि सत्वरीं

न्यायनीतिचा कैवारी जो समर्थ परमेश्वर
पाठिशीं आहे नीरंतर ।

– श्रीपाद

'केसरी' २९।७।३२

---

# श्रीटिळकवंदन

( चाल – बाळा जो जो रे० )

जय जय जनतेशा । श्रीमंता । लोकमान्य बलवंता ।
वंदन तुज करितों ॥ ध्रु० ॥

नश्वर जगता या । सोडुनियां । स्वर्गा जाशी सदया ।
व्हावी गति कैसी । जनतेची । दीन अभागी साची ॥ जय० ॥
गुणवंता । लोकमान्य बलवंता । वंदन तुज करितों ॥ १ ॥

स्वराज्य सौख्याच्या । दातारा । सुळिं नच उरला थारा ।
भारतमातेला । तिलक खरा । तुजविण नव्हता दुसरा ॥ जय० ॥
धीमंता । लोकमान्य बलवंता । वंदन तुज करितों ॥ २ ॥

दुर्बल राष्ट्रा या । बल दिधलें । उदयोन्मुख त्वां केलें ।
फिटेल ऋण कैसें । हृद्रोग । दूर करी पथ सांग ॥ जय० ॥
भगवंता । लोकमान्य बलवंता । वंदन तुज करितों ॥ ३ ॥

साक्षी ठेवुनियां । तव पाय । सतत करूं जनकार्य ।
स्वराज्य कार्यातें । यश द्यावें । पैल थडीला न्यावें ॥ जय० ॥
यशवंता । लोकमान्य बलवंता । वंदन तुज करितों ॥ ४ ॥

— सेवानंद बाळकाका कानिटकर, पुणें

'केसरी' ३।८।३७

---

## वीरकेसरी

( चाल – बहु असोत सुंदर० )

लोकमान्य टिळक अम्ही नमित तव पदा
तव नामें दग्ध होति राष्ट्र-आपदा ॥ ध्रु० ॥

पुण्यपुरींतील तुम्ही वीरकेसरी
शूर मराठ्यांसि तुम्ही देवतेपरी
अश्रुसिंचनानें तुज पूजितों सदा ॥ १ ॥

हिंदूंच्या राष्ट्राचा तूंच कुलपती
राष्ट्राला चेतविलें तूं महामती
राष्ट्राला तूंचि खरी पूज्य देवता ॥ २ ॥

त्यागाची नाहीं तुज वाटली क्षिती
शिक्षेची नाहिं कधीं वाटली भिती
कारागृह मानिलेंस राजसंपदा ॥ ३ ॥

निपजतील टिळक किती युवजनांतुनी
सांगावें कोणि कसें छाति ठोकुनी
बीजाला अंकुर परि फुटतसे तदा ॥ ४ ॥

'केसरी' ६।८।३७ — 'किरण', हिंदु विश्वविद्यालय, काशी

---

## विभूतिपूजन

( चाल – अखिल हिंदु विजयध्वज० )

उठवुं वीरभूषण टिळका ! करुनि वंदना ॥ ध्रु. ॥

लोककार्यिं देहें झटला
हिंदवी स्वराज्या झिजला
लोकमान्य होउनि गेला । जिंकुनी मना ॥ १ ॥

व्यक्तमूर्ति जरि ती गेली
कार्यरूप घेउनि उरली
पूर्णता कराया झटुनी । दावुं भावना ॥ २ ॥

जन्मसिद्ध हक्का लढुनी
अग्रभागिं लोकीं वसुनी
तिलकनाम सार्थचि झाला । राष्ट्रभूषणा ॥ ३ ॥

लोकमान्य सांप्रत नसले
तत्त्वरूपि विजयी ठरले
पुनः पुनः जयध्वनि करुनी । घेउं चेतना ॥ ४ ॥

रक्त-कुंकुमातें लावूं
प्राण-अक्षतांतें अर्पूं
वाहुं या स्मृतीच्या सुमना । विभुतिपूजना ॥ ५ ॥

— सौ. उषा सुलाखे, बी. ए.

---

# लोकमान्यांचें स्मारक

चला गाउं या मंगलगीतें लोकमान्य नरवरा । सुजनहो
महाराष्ट्र-भू-तिलक निमाला अतुलनीय जो खरा ॥ १ ॥

सरस्वतीच्या कंठांतिल जो दिव्य लोल हरपला । खरोखर
जया पाहुनी स्वर्गामाजीं सुरगुरु मनिं तोषला ॥ २ ॥

दीर्घयत्न देखुनी तयाचा भगीरथहि लाजला । मानसीं
वदला पुनरपि समर्थ सद्गुरु रामदास जन्मला ॥ ३ ॥

स्वार्थत्यागचि अपूर्व पाहुनि भारतजन बोलला । तेधवां
झाले होतिल आहेतहि बहु परि यासम हा भला ॥ ४ ॥

अद्भुत सद्गुणसमूह पाहुनि भारतजन बोलला
प्रेमातिशयें लोकमान्य त्या गंगाधर सूनुला ॥ ५ ॥

अगाधज्ञानांबुधि मंथुनियां पीयूषा काढिलें । रहस्या
ब्रह्मज्ञानपिपासूंना मग यथेष्ट तें पाजिलें ॥ ६ ॥

स्वराज्य माझा जन्मसिद्ध हा हक्क मंत्र हा स्मरा। बंधुहो
'कर्मयोग' आचरा कृतीनें त्यांचें स्मारक करा ॥ ७ ॥

– विद्याधरानुज, नाशिक

---

## स्फूर्ति मिळवुं नित नमुनी

( चाल – बहु असोत० )

हिंदुभूमिपुत्र बाल तिलक धन्य हा
आठवुनी या समयीं गाउं गुण अहा ॥ ध्रु० ॥

राष्ट्रार्थचि झिजवोनी देह आपुला
कारागृहिं कितिक कालि विकट कष्टला।
स्वातंत्र्याप्रति नेण्या भरतभूमिला
तनमनधन अर्पुनियां सतत झुंजला।
वंदन तुज शतदां अम्हि करित हें पहा ॥ १ ॥

लाल पाल मालवीय वीरमाळ ती
बालसूर्य जगतनयन दिपवितो किती।
पुण्यस्मरण होइ यदा येइ चेतना
अंतरिंच्या खळबळुनी उठति भावना।
स्फूर्ति मिळवुं नित नमुनी विभुतिंना महा ॥ २ ॥

– सौ. उषा सुलाखे, जी. ए. बार्शी

## तेजस्वी उद्गार

( झंपा )

न्याय हा मम मना मान्य नाहीं ॥
दूषिलें जरि मला सकलिकांहीं ॥ ध्रु० ॥
ईशशक्तीं असे श्रेष्ठ सर्वांहुनि ।
न्याय मजलागुनी तीच देई ॥ १ ॥
पूर्ण निर्दोष मी देशसेवा करीं
घाल शिक्षा तरीं भीत नाहीं ॥ २ ॥
मी न केला गुन्हा साक्ष ही मन्मना
इतर करु वल्गना कालयासी ॥ ३ ॥
बंदिशाळेंत मज पाठवी श्रीहरी
कार्यसिद्धी करी तोचि माझी ॥ ४ ॥
जन्मसिद्धचि पुरा हक्क माझा असे
आपुलें राज्य मी मेळवीन ॥ ५ ॥

– धेनुदास डोळे

'टिळकआख्यान'

---

## प्रभुप्रार्थना

( चाल – मनिं धीर धरीं० )

या टिळकानें हिंदभूमि नटवावी
उत्कर्षगिरीवर न्यावी ॥
या जगतीं ती नंदनवन चमकावी
सुखशैलिं नित नांदावी ॥

आरोग्य दिलें विष्णूनें
'बाळास' आयु गोपूनें
दे 'दादा' आशीर्वचनें

तीं विश्वेशा आज व्यर्थ कां झालीं । हृदयाची आस निमाली ॥
त्या निष्प्रभशा अवलोकुनि देहातें । आकाशहि ढळढळ रडतें ॥

हे नैष्ठुर्या ! डोळे उघडुनि पाहा
उरलाच मूकनायक हा
या राष्ट्राचें आत्मतेज हें निवलें
चैतन्य अचेतन झालें

भरतभू परांच्यां पाशीं
हर ! हर ! कां बाळा हरिसी
काम त्या काय कैलासीं ?

जो आत्मबलें मंथनविषही प्याला ।
तुजहुनी सवाई झाला ॥
दे आणुनि तो बाळ आमुचा परत !
तुज हरा बजावित भक्त ॥

**– पु. पां. गोखले, एम्. एल्. ए.**

( निवडक चरणें घेतलीं आहेत )

---

# लोकमान्यांचें पवित्र स्मरण !

( चाल – उद्धवा शांतवन० )

त्वां देशकार्य जें केलें । परिमितता नाहीं त्यातें ।
अर्पिलें स्वराज्याकरितां । तनमनधन सर्वस्वातें ।
लोकापवादही प्रेमें । देशार्थ सहन करिशी ते

ध्येय एक पुढती खास
स्वातंत्र्यसुखाची आस
पुरविण्या अमित कष्टास
साहण्या सिद्ध जो झाला । गेला हो सोडुनि गेला ॥ १ ॥

सद्बोध जनां करितांना । लावी त्या ईश कसाला ।
बंदिवास जनतेसाठीं । तीन वेळ भोगुनि आला ।
परि लेशमात्रही ज्याचा । इष्ट हेतु नच मावळला ।
मंडालेंहुनि तिसऱ्यानें
स्वगृहा परतुनी ज्यानें
चालविलें कार्य त्वरेनें
तो दिनमणि लुप्त जहाला । गेला हो सोडुनि गेला ॥ २ ॥

अनभिषिक्त भूपति होता । हा खास हिंदराष्ट्राचा ।
हा केवळ स्वराज्यमूर्ती । बुद्धीचा सागर साचा ।
अधिकारी वाणी ज्याची । अतिपवित्र आचरणाचा ।
ही कर्तव्याची खाण
धैर्याचा मेरू जाण
सत्याचें आगर कोण ?
जगिं याविण होते बोला । गेला हो सोडुनि गेला ॥ ३ ॥

— रा. वि. कुलकर्णी, चाफळ

( निवडक कडवीं घेतलीं आहेत. )

# नाहीं कुठें 'बाळ गंगाधर'!

कारागृहीं भोग भोगावया सज्ज
जे सर्वदा वीर शस्त्राविना।
त्या राष्ट्रभक्तां नमाया मदीया
मनीं स्फूर्ति देई त्वरें चेतना॥

हे लोकमान्या! तुझी आपदा
सर्व हें आठवीं दीन माझें मन।
शोका वृथा मानसीं यातना या
छळी अंतरीं सर्व रात्रंदिन॥

संसार निःसार मानूनि धिःकार
तूं त्यागिले मोहपाशास या।
देशार्थ देहार्पणा सज्ज होवोनि
मृत्यूभया दूर लोटोनिया॥

बंदी तुझ्या पादपद्मा स्फुरे दिव्य
ती भावना रोमरोमांतुनी।
त्वच्चेतना बालवृद्धांत नांदे
पहा धांवते राष्ट्रसंरक्षणीं॥

वानूं किती गूण मी अज्ञ जाणून
ठेवी पदीं शीर हें सत्वरीं।
होते स्मृती आज काव्यांतुनी सान
वाहीं तुला भक्तिभावें परी॥

नाहीं जरी योग्यता अंतरीं स्फूर्ति
नाहीं करी गुण वानावया ।
हे बोबडे बोल माझे परी ते
झुका मी पदीं तेचि अर्पावया ॥

तूं राष्ट्रनेता मिळावा म्हणोनी
करी प्रार्थना सर्वदा मन्मनीं ।
ही आस माझी करी पूर्ण आतां
न इच्छा दुजी कोणतीही मनीं ॥

अश्रू किती ढाळिले शोधिलें सर्व
नाहीं कुठें " बाल गंगाधर " ।
अदृश्य रूपें तुझें गोजिरें रूप
नेत्रापुढें आज तें सुंदर ॥

— त्र्यं. गो. अंदूरकर, पुणें

---

## श्रीलोकमान्यस्मृति

( चाल – राजहंस० )

भारतास भूषण झाला । त्या नमन लोकमान्याला ॥ ध्रु० ॥

सौभाग्य उजळिलें भूचें । त्या नमन दिव्य टिळकाला ।
व्रत एक मातृसेवेचें । त्या नमन वीर बाळाला ।
निजधर्म विभूषित केला ।
वाढविलें कुल-कीर्तीला ।
केलेंहि सार्थ नांवाला ।
पुण्यपुरा शोभुन गेला । त्या नमन लोकमान्याला ॥ १ ॥

जणुं पहाड माथ्याचा तो । छातीचा फत्तर होता ।
म्हणुनीच तिथें पाझरली । जीवंत झऱ्यांची सरिता ।
संकटीं न चळली दृढता । दुबळ्यांस तीच भीषणता ।
छल वृथा नको सुजनांचा ।
नय शठाप्रती शाठ्याचा ।
हा मंत्र खरा शांतीचा ।
प्रतिपादन धैर्यें केला । त्या नमन लोकमान्याला ॥ २ ॥

किति राजमान्य राजश्री । मान्य जनीं होउन गेले ।
साऱ्याहुन न्यारा होता । लोकमान्य पद त्या आलें ।
सुरमान्य होउनी तैसें । तप एक त्यास लोटीलें ।
स्मृतिदिनीं तपी योगी तो ।
वंद्य हिंद मोदें नमितों ।
स्मृति-गीता जीवें गातों ।
स्फुरवि यत्स्मरण हृदयाला । त्या नमन लोकमान्याला ॥ ५ ॥

— केशवतनय

'केसरी' १९३२.

---

# लोकमान्यजयंती

( चाल – भला जन्म हा तुला लाभला )

भारतभूला ललाम झाला बाळ टिळक हा भला ।
तयाला प्रथम नमन करुं चला ॥ ध्रु० ॥

हाल सोसुनी सर्व कालही, जनता जागृत करी ।
रोविलें स्वराज्य-ची अंतरीं ॥

बाळ नव्हे, रिपुकाळचि केवळ, ऐसा रणकेसरी ।
तयाची, नच ये कोणा सरी ॥
' हिंदि असंतोषाचा जनक ' हें पद रिपुपासुनि वरी ।
धुरंधर सर्व गुणाभीतरीं ॥
( चाल ) कारागृहीं गीतारहस्य तें निर्मिलें ।
वेदांतुन प्राचिन, आर्यस्थान शोधिलें ।
निष्प्रतिम लोकमान्यत्वातें मिळविलें ॥
प्रतियोगी सहकार्य करोनी, अभीष्ट साधा चला ।
मंत्र हा अमूल्य उपदेशिला ॥ १ ॥

— गंगाधर माधवराव देशपांडे, फत्तेखर्डा

---

## तिलकस्मरण

( चाल – भपती खरं नं० )

अजि स्मरण करूं या लोकमान्य टिळकांचें ।
मनिं भक्तीनें ' जय टिळक ' गर्जु या वाचें ॥ ध्रु० ॥

या हिंदुस्थानीं वास अशा सर्वांचे ।
हें राशीभूतचि भाग्य टिळक लोकांचें ॥ १ ॥

राष्ट्रीय पक्ष जो त्यांतिल व्यक्तिगणांची ।
सुप्रेमभावना बनवटलेली साची ॥ २ ॥

श्रीगीताग्रंथीं प्रतिपादित योगांचें ।
हें सारभूत सत्तत्त्व दिव्य तेजाचें ॥ ३ ॥

( चाल ) सत्तत्त्व दिव्य तेजाचें । लोपलें ।
सुप्रेम मनोभावाचें । मंगलें ।
सौभाग्य भारतीयांचें । नष्टलें ।

जें तत्त्व प्रेम आणि भाग्य शरीरीं होतें ।
अजि काय हीन परि अमर मर्त्यलोकीं तें ॥ ४ ॥

मी कार्यप्रेमीं प्रेम धरा कार्याचें !
हें नित्य स्मरा मनिं टिळक बोलले वाचें ॥ ५ ॥

अजिं स्मारक त्यांचें कार्य साधुनी व्हावें ।
स्वातंत्र्य मिळे जन सौख्यभरें नांदावें ॥ ६ ॥

जनशिक्षण द्या झणिं कार्य सुलभता आली ।
स्मारका कराया इतर स्मारकें झालीं ॥ ७ ॥

( चाल ) निजग्रंथलेखनें साऱ्या । या क्षितीं ।
स्वातंत्र्यसंघ स्थापूनी । भारतीं ।
निःस्वार्थी जनसेवेनें । जनमती ।

हीं सर्व स्मारकें टिळक उभारुनि गेले ।
झणि एक करा जें अपुल्या हातीं आलें ॥ ८ ॥

—वा. रा. फणसळकर, बी. ए.

'स्वावलंबन' पाठशाळा, चिंचवड

# तिलकगुणवर्णन

( चाल — मजला धरिल सुभद्रा काय )

नरतनु जन्मुनि पुरुष भला । नांदे टिळककुळीं ॥ ध्रु० ॥

नामें जो गंगाधरसुत ।
कृतिनें भासे गौरीपूत ॥
जयाचे विचारही अद्भुत ।
न होई च्युत कदा काळीं । नरतनु० ॥ १ ॥

असुनी विद्याविनयसहित ।
स्वप्नीं न करि कोणाचें अहित ॥
ऐसे थोडे वसति महींत ।
स्मरणवहींत नित्य लिहा । नरतनु० ॥ २ ॥

परोपकारीं झिजवी काय ।
नृपनीतीचे भोगि अपाय ॥
ऐशा राखी तूं प्रभुराय !
धन्य ती माय पुत्रवती । नरतनु० ॥ ३ ॥

पाहुनी महिवरी कीर्ति उदंड ।
दुर्जन म्हणति ती सारें बंड ।
झटले यश मळवाया अखंड ।
परि न वाग्दंड करित तया । नरतनु० ॥ ४ ॥

नमुनि रंगतनय गणराया ।
इच्छित सज्जन संगति व्हाया ॥
तेणें निरसेल ही भवमाया ।
जीवित वांया न जाय ही । नरतनु० ॥ ५ ॥

'स्वावलंबन' — वि. रं. गुपचुप, संस्थान चिंचवड

## तिलक-चरित्ररहस्य

( चाल – प्रेमसेवा )

हिंदवीरा नमन, तिलका वाला, तुला ।
भारतोदयासि अवतार जणुं घेतला ॥ ध्रु० ॥

त्यागनीतिची मूर्त । राष्ट्रकार्य अभय करित ।
लोकमान्य शुभपदा । धरितसे एकला ॥ १ ॥

बंदिवासिं जरि पडे । गीतेचें गूढ वदे ।
आचरा कर्म सतत । सोडुनियां फला ॥ २ ॥

स्वराज्यासि प्राण होत । अनभिषिक्त नृपति वदत ।
देव या जन म्हणत । सांवळ्या मूर्तिला ॥ ३ ॥

– वा. त्र्यं. आपटे, बी. ए., जमखंडी

---

## बाळ-लेणें

( चाल – केशवचरणीं )

रत्नपुरीनें राष्ट्रा केलें टिळक-रत्न अर्पण ।
शोभतें कोंकणचें कोंदण ॥ ध्रु० ॥

तांबुस रंगीं स्निग्ध मृत्तिका तेजस्वी तेथली ॥
नयनयुग्मा दीप्ति लाभली ॥ १ ॥

नक्र सुसर सागरीं जलचरें, दाहक वडवानळ !
बाळ-हृदयांतरिं तशि खळबळ ॥ २ ॥

सर्व-संग्रही, अथांग, गंभिर गर्जतसे दारुण ।
सागरें ओपियले सद्गुण ॥ ३ ॥

गर्द वाटलीं बहू आगरें नारळिचीं त्या स्थळीं ।
हृदय मृदु बाह्य टणक हा बळी ॥ ४ ॥

वृक्ष विपुल सर्वत्र चारोंकर्ती फणसाची माधुरी ।
तीक्ष्ण वर बाळ गोड अंतरीं ॥ ५ ॥

स्वतंत्रतादेवीस निमंत्रण आया पुगीफल ।
मिळालें ऐसें जन्मस्थळ ॥ ६ ॥

जलचक्राने फिरति पोहरे फुटके तुटके जरी ।
ओपिती अल्प-स्वल्प जळ तरी ॥ ७ ॥

संघशक्तिचा जलौघ वाहे माळी पिकवी मळा ।
तेंचि करि कार्य टिळक सांवळा ॥ ८ ॥

सुज्ञ-अज्ञ वा विविध वृत्तिच्या लोकां हातीं धरीं ।
युक्तिनें सद्गुण-संचय करी ॥ ९ ॥

अखंड चळवळ-प्रवाह वाहे प्रभाव हा करणिचा ।
शिंपिला मळा देश-भक्तिचा ॥ १० ॥

— धेनुदास डोळे, पुणें

'केसरी' १९.२.१

# नमन मम लोकमान्य टिळकांला

( चाल — भला जन्म हा० )

महाराष्ट्र जननिच्या गळ्यांतील ताइत जो शोभला,
नमन त्या लोकमान्य टिळकांला ॥ ध्रु० ॥

मातृभूमिच्या उद्धारास्तव रात्रंदिन कष्टला,
तिलांजलि देउनिया सौख्याला ॥

राजदंडना, कायाक्लेशा भिउनी नच जाहला,
पराङ्मुख अंगीकृत कार्याला ॥

शुद्ध आचरण, धैर्यमेरुसम, त्याग-गुणें जाहला,
वंद्य जो वृद्धा-तरुणांला ॥

( चाल ) परदास्य—घोरनिद्रेनें ग्रासिला
ऐश्वर्य-भाग्य-भोगांही वंचिला
गदगदा हलवुनी देश उठविला,

मार्ग परम दाविला सुखाचा, कर्मयोग शिकविला,
जसा श्रीभगवंतें जिष्णुला ॥ १ ॥

ध्यानिं-मनीं-स्वप्नीं न कुणाच्या, कुणि नच जो पाहिला,
मंत्र अति दिव्य, बळें आगळा ॥

परदास्याची घोर कष्टमय तोडाया शृंखला,
दुजें नच शस्त्र दिसे दृष्टिला ॥

जन्मसिद्ध मम हक्क स्वराज्यचि, मिळविन तो मी भला,
मंत्र हा सर्वां उपदेशिला ॥

( चाल ) प्रतिकूल परिस्थिति, परिणाम न पाहिला,
संदेह मनामधिं किमपिहि नच आणिला,
बहु कष्ट सोसुनी मार्ग भला दाविला,

शरीर पार्थिव टाकुनिया जो अजरामर जाहला,
नमन मम लोकमान्य टिळकांला ॥ २ ॥

– विनायक, सोलापूर

---

## धन्य धन्य टिळका !

( चाल – धन्य शिवाजी तोरण गाजी )

प्रणाम तुजला नरशार्दूला महाराष्ट्र-टिळका ।
गंगाधर-सुत बालकेसरी वीरमणी टिळका ॥

स्वातंत्र्याच्या मांगल्याच्या तेजोमय टिळका ।
निःस्पृहतेच्या आत्मबलाच्या धैर्यमेरु टिळका ॥

धर्मपालनीं आयु खर्चिलें गणपतिच्या टिळका ।
प्राण जाय जरि, वचन एकची दृढनिश्चय टिळका ।

अंतर्बाह्य स्वदेशप्रीति दीनांच्या टिळका ।
वदे जनाला वर्ते तैसा वंदू त्या टिळका ।

जिव्हाग्रीं ज्या वसे शारदा विद्वन्मणि टिळका ।
स्वराज्य माझा जन्म-हक्क हा बोले त्या टिळका ॥

अखिल भारता जागृत केलें धन्य-धन्य टिळका ।
असा मोहरा झाला नाहीं जोड न त्या टिळका ॥

गणेश, मुंबई

# लोकमान्य पुण्यस्मरण

( भूपाळी )

उठा बंधुनों, धरा जागृती, जयजयकार करा ।
बंधुनों, जयजयकार करा ।
वीरस्मरणें, अंतःकरणें, पुलकित शुद्धचि करा ॥ ध्रु० ॥

माय आपुली, धाय मोकली, पारतंत्र्य गारीं ।
मायभू, पारतंत्र्य गारीं ।
त्या हांकेला, बाळ धांवला, वैऱ्यावरि केसरी ॥ १ ॥

करि न वल्गना, करी गर्जना, गंभिर नरकेसरी ।
गर्जना, गंभिर नरकेसरी ।
असंख्य उठती, ध्वनी चहुंकडे वीरवृत्ति थरथरी ॥ २ ॥

वाक्शरपीडित शत्रू उठला, सांपळ्यांत धरिला ।
केसरी, सांपळ्यांत धरिला ।
परी स्वहस्तें, मातृकपोला, यशोतिलक लाविला ॥ ३ ॥

करुनि घोषणा, जन्मसिद्ध हा हक्क स्वराज्याचा ।
आपुला, हक्क स्वराज्याचा ।
कर्मयोग गीतेचा, शिकवी अखिल भारताला ॥ ४ ॥

रहस्य सांगुनि, देशजागृती, अपूर्व जी केली ।
तयांनीं, अपूर्व जी केली ।
दिव्यस्मृति ती, आज आपणा, होइ स्फूर्तिशाली ॥ ५ ॥

त्या स्फूर्तीनें, पुलकित होउनि, नमवूं निजमाथा ।
टिळकां, नमवूं निजमाथा ।
निज करणीनें, तोष देउं त्या, स्वर्गभुवनिं आतां ॥ ६ ॥

राहि, अखिल जन-मानस-मंदिरिं, लोकमान्य मूर्ती ।
धन्य ही, लोकमान्य मूर्ती ।
जयजयकारें, भरवु दिगंतीं लोकमान्य कीर्ती ॥ ७ ॥

—सौ. गंगुताई वैद्य, हेडमिस्ट्रेस, वेटावद

---

## लोकमान्यांस प्रणाम

लोकमान्या ये प्रणामा ! हिंदभूच्या भूषणा ॥ ध्रु० ॥
भारताच्या आर्यपुत्रा ।
वीररमणा सगुणरत्ना ।
वैभवांनि हिंदराष्ट्रा । परमश्रेष्ठा लोपला ॥ १ ॥

सागराची शांतमूर्ति ।
केसरीची दिव्य कीर्ति ।
पैलतीरिं अमर झाला । हिंदभूचा वीर गेला ॥ २ ॥

धर्मभक्ति देशप्रीति ।
ज्ञानज्योति मोहशांति ।
स्वार्थ तुडवी ध्येय गुंफी । ध्येय मार्गे चालला ॥ ३ ॥

ध्येय-पूर्ति आस मोठी ।
अग्रणी हा विविध योगी ।
धीरवंता अतुल स्फूर्ति । आकळितो कोण त्याला ॥ ४ ॥

कर्मयोगी ध्येय ठेवी ।
कर्ममार्गी कार्य घडवी ।
झिजविताही देह अपुला । सगुणरूपीं पावला ॥ ५ ॥

बंदी होतां मंडलेला ।
कर्मयोगी ग्रंथ स्फुरला ।
दाखवीण्या मार्ग जगता । कृष्णलीला रेखिल्या ॥ ६ ॥

ध्रुवतारा अढळ झाला ।
नम्र केलें अंतराला ।
उद्धरीता मातृभूला । वंदि जनता आजला ॥ ७ ॥

त्रिविध स्मृतिंचा रुचिर मंत्रा ।
बंधुजनहो आज घ्यावा ।
सादरानें अर्पि आपणां । हिंदभूची एक माला ॥ ८ ॥

'केसरी' – सिंधु शिरवाडकर

---

## काय म्हणतात

( चाल – प्रतिकूल होईल कैचा कृष्णदेव माझा )

लोकमान्य तारा केवीं लुप्त तुम्हां झाला ।
करुनि पाहुं सांगड ह्याची वनवुं ज्ञान माला ॥ १ ॥

मान्य तुम्हां आहे प्रभुकीं सजवि विश्वखेळा ।
टिळक वदे हंसवी सजवी, मांडि कौतुकाला ॥ २ ॥

कितिक तुम्ही जाणुनि आहे पोत खालिं केला ।
जयज्वालावरती चढुनि झटति धैर्य याला ॥ ३ ॥

लोकमान्य प्रेमें देई स्फुर्ति बांधवांना ।
मित्रैकार्य वृद्धी होई, साक्ष सभा याना ॥ ४ ॥

कर्मवीर गांधी तेवीं लाल, पाल यांना ।
राखवी सुधारकसिंधु सर्व पुढाऱ्यांना ॥ ५ ॥

केसरी तसें नवजीवन राष्ट्र मासिकांना ।
लोकमित्र मार्मीकांत तिलकहुरूप आला ॥ ६ ॥

— दिनकरसुत

---

## तिलक-स्तवन

( चाल - महाराष्ट्र गीत )

लोकमान्य बाळ टिळक वंद्य भूतला ।
कीर्तिध्वज दिक्प्रांतीं उंच उभविला ॥ ध्रु० ॥

हिंद देश-बंदिवास-क्लेश-वारणा ।
'केसरी'स काढुनि; करि रिपु-विदारणा ॥
धन्य ! धन्य ! महाराष्ट्र वीर शोभला ॥ १ ॥

स्वर्गींच्या सुरगणांत मानवी हिरा ।
अंबरिच्या तारकांत चांद गोजिरा; ॥
जणुं विलसे हिंद-देवि — 'बाळ' तान्हुला ॥ २ ॥

— दत्तात्रय काळगांवकर, कऱ्हाड

---

## हिंद देवीचा विलाप

[ वृत्त – राजहंस ]

माशीं बोल एकदां बोल । बोल रे लाडक्या 'बाळा'
तव बोलाची मज भूक । लागली आज वेल्हाळा
तुज कसला आला राग । उघडून सांग हृदयाला

कां मिटिलेंसी नयनांला
कां मूकपणा तूं धरिला
अप्रिय कां ? झालें तुजला
वद वद वद उघडुनि डोळा । बोल रे लाडक्या 'बाळा' ॥ १ ॥

तव खेळगडी हे आले । प्राणाहुनि प्रिय जे तुजला
ते 'मोहन' 'लजपतराय' । बोलाया तुजशीं 'बाळा'
किति खिन्नवदन हें झालें । पाहुनी तुला लडिवाळा
हें काय बरें तूं करिसी ?
रुचतें कां सांग मनासी
किति 'बाळ, आळवूं तुजसी
हा कंठ सुकुनिया गेला । बोल रे लाडक्या 'बाळा' ॥ २ ॥

धरुनिया चुबुक स्वकरांत । विनविलें किती तरि 'बाळा'
नवनीतासम हृदयाला । केलेंस कठिण या काला
कधिं आज्ञाभंग न केला । ऐकुनी मदिय वचनाला
मग एकाएकी असली
विपरीत रीति कां रुचली
तुज, सांग सांग मम खुटली
बुद्धी ही सारी बाळा । बोल रे लाडक्या 'बाळा' ॥ ३ ॥

तुज भारत-भू ही सारी । पुरली नच खेळायाला
मग आज असा कां येथें । रमलास सांग स्नेहाळा
आवडली तुज ही भूमी । विश्रांति काय घ्यायाला ?
तुज निद्रा लागुनि झाला
बहु काळ बाळ वेल्हाळा
उठ ऊठ झणिं या काला
बोल रे उघडुनी डोळा । बोल रे लाडक्या 'बाळा' ॥ ४ ॥

तव भगिनींचा हा मेळा । पातला तुला नवण्याला
प्रेमाचे बोलुनि बोल । तोषवीं तयां तरि विमला
मधु हास्याचें नव तेज । पसरुनी चहुंकडे छकुल्या
आनंद नंद-तनयाचा
मुरलीधर गोपाळाचा
करि व्यक्त आज बा साचा
करुनिया त्यापरी लीला । बोल रे लाडक्या 'बाळा' ॥ ५ ॥

या क्षोणीवर जे कोणी ! पंडिताग्रणी असतील
त्या डोलविणार थोर । निर्मून ग्रंथ अनमोल
अंगुली तदीय मुखांत । त्वां घालविली ना बाळ
दावुनी चिकाटी मोठी
पुरविली 'चिरोल'ची पाठी
परि ठरलि जनाशा खोटी
अशि उज्ज्वल तव गुण-माला ! बोल रे लाडक्या 'बाळा' ॥६॥

" वर्षती सुमन-संभार । मानुनी तुला निजदेव
ऐश्वर्य बघुनि तव बाळा । झुरतील स्वर्गींचे देव
सोडुनी अम्हां सगळ्यांना नेलास राष्ट्रिंचा देव
रे निर्दय निर्घृण काळा !
तूं समाह्य असशी काळा
हा अनुभव आम्हां आला "
वदती जन ऐशा बोलां । बोल रे लाडक्या 'बाळा' ॥ ७ ॥

हा मेल्या निष्ठुर काला ! । काशि दया न ये हृदयाला
हृदयाचा प्राण-विसांवा । हरुनिया कसा तूं नेला
हा प्राण बहिश्चर माझा । नव्हतें कां ठावें तुजला

हा ! हाय ! ! हाय ! ! ! हें काय
किति तरी मोकलूं धाय
मिरवूं हा कैसा काय
या पुढती निर्दय काला ! । मी बनलें दुबळी अबला ॥ ८ ॥

— कै० रामकृष्ण घेडू रंगारी, शेंदुर्णी

सन १९२० मध्यें सभेंत वाचून प्रसिद्धिलेली

---

# तिलकस्मृति

( चाल – नरजन्मानार्धि० )

अर्पुनि अंजलि शब्दसुमांची पवित्र चरणांवरी
करूं या तिलकस्मृति साजरी ॥
विस्मृति पडली जनां कधीं नच हृदयीं नित राहिला
उन्नत कर्मयोग शिकविला ॥
जगतीं येउनि राष्ट्रकार्य बहु केलें चिर जाहलें ॥
वाङ्मयतप उज्ज्वल सेविलें ॥
" स्वराज्य माझा जन्म सिद्ध हा हक्क " मंत्र बोधिला
जनांला दिव्यमार्ग दाविला ॥
( चाल ) पाठीस लागती अनेकविध आपदा
देशास लागला शाप सुटेना कदा
ही दुही करितसे घात सदा सर्वदा
जाणीव कुणा मग कर्तव्याची वदा
कृपादृष्टितें वितरा नरवर लोकमान्य सत्वरीं
व्याकुला भारतभूमी खरी ॥

'राष्ट्रतेज' २०।७।३६ — कृ. के. रहाळकर

# टिळक

( चाल – मन पोळें सदा हें० )

देशसेवा करी त्या मान्यता मिळे ॥
मान्यता मिळे हो क्रियेच्या बळें ॥ ध्रु० ॥

बहु हाल होती प्रसंगीं जिवाचे ।
परी निश्चयो तो कधीं नाढळे ॥ देशसेवा० ॥

तळमळती जनकार्यीं निरंतर ।
परमार्थ हाची तयांसी कळे ॥ देशसेवा० ॥

महाराज-राजांस हा मान नाहीं ।
खरे लोकमान्य हिरे आगळे ॥ देशसेवा० ॥

धीमान पंडित कित्येक असती ।
तयां राजतंत्र मुळीं नाकळे ॥ देशसेवा० ॥

महात्मा महाराष्ट्र सूत्राधिकारी ।
स्वतंत्रावतारीं तत्त्व मिळें ! ॥ देशसेवा० ॥

'पद्यावलि' — नी. भा. गांधी, चिपळूण

---

# स्मारकासन्निध

( चाल – बहु असोत० )

वाहो तव सुगुणकीर्ति सुमनसौरभा ॥ ध्रु० ॥

बाल तिलक कर्मवीर धर्मभास्करा
वनमाली पुण्यपुरुष श्रीहरी गिरा —
तेजस्विनि गीतेची विकसली प्रभा ॥ १ ॥

मातृभूमि दास्यहरणकारणीं रणीं
पुण्यवंत मूर्ति तुझी कीर्ति त्रिभुवनीं
भारतभूकंठांतिल दिव्य कौस्तुभा ॥ २ ॥

ध्रुवसमान अढळपदीं तारका शुभा
तेजाचा दिव्यदीप उजळशी नभा
सुरसभेंत प्रतिभासंपन्न तूं उभा ॥ ३ ॥

— शं. ना. बर्वे

'केसरी' १९३८.

---

## टिळकांची पहिली भीषण शिक्षा

[ शाहीर भिडे यांनी लोकमान्यांचा १८ चौकी एक पोवाडा लिहिला आहे. त्यांतून एक छोटासा उतारा खालीं घेतला आहे. ]

तुरुंगांत डांबलें टिळकाला । पण हाल भारी जीवाला ।
कोरडी भाकर सदा खाण्याला । दुध तूप नव्हतें कोणाला ।
उपासमार रोज टिळकाला । कमि वजन लागलं व्हायाला ।
काथ्या कुटुन दोर वळण्याचें काम दिलें त्याला ॥
अन्याय झाला टिळकाला । ही वार्ता गेली विलायतेला ।
झालें दुःख सर्व लोकांला । अगणीत व्यक्तिनी अर्ज केला त्या वेळां ॥
झणिं सोडा बाळटिळकाला । मॅक्समुल्लर मोठा पंडित ।
प्रमुख त्या वेळा । टिळकांचा ओरायन आवडला त्याच पंडिताला ।
इकडे मोठा छळ चालला । द्रव्यकीर्ति चालली बुडण्याला ।
अशा वेळीं ज्यानें ग्रंथ लिहिला । पवित्र ग्रंथ हा भला ।
असें त्याचें मनोधैर्य सांपडलं कुठें या वेळां ॥
विद्वान नेव्हिसन असा तंवा बोलला ।

असा कांहीं काळ चालला ।
सप्टेंबरच्या सहा तारखेला ।
रात्रींच्या रात्रीं सरकारनें सोडलें टिळकाला ॥
आनंदी आनंद झाला महाराष्ट्राला ।
किर्तीनें माळ घातली बाळ टिळकाला ॥

— शाहीर नि. दि. भिडे, विलेंपारलें

---

## लोकमान्य टिळक

( चाल – दुर्दैवें हेतु झाला० )

वनिं विहरे व्याघ्र परि तो वनराजा होईना ॥ ध्रु० ॥

जाहले तसे होतील । आहेत पुढारी विपुल ।
परि वीर खरा तो बाळ । काळ गमे खलजनां ॥ १ ॥

प्रखर ती विषारी वाणी । करि अरिच्या अंतःकरणीं ।
व्रण दारुण बाणावाणी । दुर्धर त्या वेदना ॥ २ ॥

हिंदवी स्वराज्यासाठीं । राष्ट्रांत करी हाकाटी ।
ध्येयावर ठेवुनि दृष्टि । भोगी सदा यातना ॥ ३ ॥

मालक मी माझ्या घरचा । निभ्रांत वदे ही वाचा ।
तिळहि सदा सरकाराचा । धाक मनिं मानिना ॥ ४ ॥

जो बोल बोलला ओठें । तो खरा कराया कष्टें ।
रात्रंदिन झगडे नेटें । तुच्छ गणीं जीवाना ॥ ५ ॥

स्वातंत्र्य हाच मम धर्म । स्वातंत्र्य हेंच मम कर्म
स्वातंत्र्य हेंच मम मर्म । घुमवी ही घोषणा ॥ ६ ॥

स्वातंत्र्य-वीर तो कोठें । स्वातंत्र्यपीर हे कोठें ।
चालिले कोठुनी कोठें । हें न कळे मन्मना ॥ ७ ॥

खळबळ ती कोठें त्यांची । वळवळ ही कोठें यांची ।
तळमळ त्या बालमनाची । येइ कशी या जनां ॥ ८ ॥

सांवळी कांति वरकांती । परि आंत विजेची दीप्ती ।
ती बालमूर्ति हृत्प्रांतीं । ठसवा ही प्रार्थना ॥ ९ ॥

— सन्मित्रसमाज मेळा, पुणें

---

# टिळकपणा म्हणजे ?

( चाल – धन्य शिवाजी० )

टिळकपणाचा विशेष म्हणजे स्वाभिमान होता ।
स्पष्टपणाचा बाणा साधा झगझगीत पुरता ॥ ध्रु० ॥

सत्यव्रत वा धर्मपताका टिळकपणा म्हणती ।
तनमनशीलाच्या शुद्धीला टिळकपणा म्हणती ॥ १ ॥

विचारसरणी उच्च, राहणी साधी हें तत्त्व ।
टिळकपणाच्या ठळकपणाचें गूढ मुख्य सत्त्व ॥ २ ॥

संकटकाळीं न कदां डगमग लगबग धैर्याची ।
टिळकपणा घडवितो शांतशी सांगड कार्याची ॥ ३ ॥

शक्ती-भक्ती-युक्ती यांच्या योग्य योजनेला ।
कर्तव्याला ना डर, बोला टिळकपणा याला ॥ ४ ॥

टिळकपणा जागरूक विश्वा जागा जागवितां ।
ऋद्धिसिद्धि यश हां हां म्हणतां टिळकपणा असतां ॥ ५ ॥

" कुटुंब माझें विश्व जागतें " म्हणणें टिळकपणा ।
" तिलांजली स्वार्थावर देणें " जाणें टिळकपणा ॥ ६ ॥

" नवजोमाच्या उत्साहानें झटणें " टिळकपणा ।
" परोपकारीं झीज तनूची " जाणें टिळकपणा ॥ ७ ॥

बोले तैसा चाले ऐशी वृत्ती टिळकपणा ।
समाधान संतोष राखणें तेव्हां टिळकपणा ॥ ८ ॥

" दुबळ्यांचा कैवारी होणें " तेव्हां टिळकपणा ।
" परामर्ष हीनांचा घेणें " अखंड टिळकपणा ॥ ९ ॥

संकट स्वागत आनंदानें करणें टिळकपणा ।
परिस्थिती वादळांत होतो उन्नत टिळकपणा ॥ १० ॥

टिळकपणा म्हणजेच टिळकपण अन्य न टिळकपणा ।
टिळकत्त्वें टिळकपणा येतो, टिळकपणा बाणा ॥ ११ ॥

— राम

' उद्योगी भारतमाला ' १९२०

---

## श्रीतिलकाय नमः

(पोवाडा)

प्रणामोऽस्तुते श्रीशिवनृपते धीमन् छत्रपते ।
जयोऽस्तु भगवन्, यशोस्तु राजन् जनपदसुखकर्ते ॥ धु० ॥

गोब्राह्मणप्रतिपालक तुह्मी; छत्रपती या हो ।
हाक मारिते दीन आर्य-भू तिला भेट द्या हो ॥ १ ॥

श्रीरामा ये, श्रीकृष्णा ये, ये बलभीमा ये ।
अज्ञानार्णविं पूर्ण बुडाले; मजला तारी ये ॥ २ ॥

अजुनि न सखया, कां बा येसी मजला ताराया !
परावलंबन डोहिं बुडाले गेले मी वांया ॥ ३ ॥

कालिययवनें मही छळियली झाला रे कहर ।
ऐकुनि ऐशी थोर गर्जना घेशी अवतार ॥ ४ ॥

असुर मर्दुनी भूमातेला देशी सौख्याला ।
परंतु तिचिया पाठि लागली पुन्हा दैन्यमाला ॥ ५ ॥

देशघातकी चांडाळांनीं थोर घात केला ।
परस्परामधिं कलह करोनि स्वदेश बुडविला ॥ ६ ॥

एकवीत हें पोट भराया न मिळे खायाला ।
म्हणुनी रिपुजनहस्त धरोनी नरकीं जन पडला ॥ ७ ॥

धिक् धिक् देवा नरकीं टाकीं निर्दय नीचांना ।
प्रणाम अमुचा सांग सांग त्या हिंद सुपुत्रांना ॥ ८ ॥

झाली, झाली सीमा झाली राष्ट्रविनाशाची ।
भूमोतला फळें लाभलीं दुर्दिन दास्याचीं ॥ ९ ॥

सर्व जगाची मायभूमि जी निर्मळ भूमाता ।
ती दुसऱ्याची दासि जाहली विपरित ही वार्ता ॥ १० ॥

कशी सांगु मी कवण्या तोंडें मुरहर घननीळा
आतां तरि तूं धांवत येईं प्रियतम गोपाळा ॥ ११ ॥

पतीतपावन नामाचा तूं टेंभा मिरवीसी ।
नामा ऐशी कृती कराया सवड न कां तुजसी ॥ १२ ॥

भूमातेचा करुणारव कां श्रवणिं न तव पडला ।
आतां तरि ये धांवत सखया कौसल्या बाळा ॥ १३ ॥

( चाल ) ऐकुनि या जन विनतीला । प्रभू गहिवरला ।
देत वचनाला । भूदेवकुळीं येईन ।
लेखणी शस्त्र घेईन ।
रिपुदर्पा संहारीन ।
परंतु अमुची एक मागणी सोडा कलहाला ।
उठा आर्य हो करा तयारी स्वराज्य घेण्याला ॥ १४ ॥

— शाहीर अ. ना. प.

---

## जय लोकमान्य

हिंद देविच्या उज्ज्वलपुत्रा ! जनतेच्या देवा !
स्वतंत्रतेच्या प्राणा ! राजा ! स्फूर्तीच्या भावा ! ॥ १ ॥

भारत-भाग्या ! राष्ट्रसभेच्या दिव्यालंकारा !
मोहतमामधिं लखलखत्या दृढ-निश्चय-ध्रुव-तार्‍या ! ॥ २ ॥

परवशतेचें कंबरडें त्वां मोडियलें ज्यांनीं,
त्या तव चरणा नमन असो मम; बोलो जय वाणी ! ॥ ३ ॥

तव चरणांचे रज मी झालों असतों, तरि तिलका !
त्या भाग्यानें तुच्छ लेखिलें असतें स्वर्लोका ! ॥ ४ ॥

समीर-लहरी वरुनी विहरत स्वर्गी जाओनी
कथिला असतां हर्ष मनाचा देवा गाओनी ! ॥ ५ ॥

शिरें हजारों नमलीं; जुळले हस्त हजारांनीं;
नेत्र हजारों पाझरले सुख-दुःख विकारोंनीं ! ॥ ६ ॥

नमला, रमला वदनीं साक्षात् विराट परमेश !
तव चरणाचा महिमा वर्णन काय करिल शेष ? ॥ ७ ॥

वंदित असतां तव चरणांचें तेज शिरा लाभो ॥
तेथिल जावो बधिरपणा, ही विनती. बाला ! भो ! ॥ ८ ॥

* * *

पाश तोडुनी मातृभूमिच्या प्रेमाचा, स्वर्गी–
गेला कां हा ? दुःख अर्पुनी अनुयायी-वर्गी ! ॥ ९ ॥

भीरुपणाचा, अभिमानाचा पूर्ण विनाशाचा,
सौख्यशृंखला–मोहकतेचा, अधर्म–माधुरिचा ॥ १० ॥

निजरूपाच्या विस्मरणाचा, सेवाप्रेमाचा,
अंधकार हा हिंदभूवरी तांडव करि साचा ! ॥ ११ ॥

प्रलयकालच्या या रात्रीं किति भारतमातेचे
तारे खळखळ निखळुनि पडले मेरू धैर्याचे ! ॥ १२ ॥

धृतिचा परि हा अढळ राहिला तेजस्वी तारा,
अभिनव या भू-बाल-ध्रुवाचा झाला लोभ सुरां ! ॥ १३ ॥

म्हणुनि पळविला त्या चोरांनीं भाग्याचा चंद्र
तारामंडळ हार सजविला, धन्य होत इंद्र ! ॥ १४ ॥

खरी अर्पिली "लोकमान्य" ही पदवी लोकांनीं !
"देवमान्यता" देण्या त्यांना नेले देवांनी । ॥ १५ ॥

सुरासुरांचें संगर माजें स्वर्गी घनघोर; ।
सुधा-स्त्रियांना मोहुनि हतबल झाले सकल सुर ॥ १६ ॥

त्यांच्या कर्णी गर्जविण्याला स्फूर्तीची भेरी,
सुरेश्वरानें नेली स्वर्गी टिळकांची स्वारी ॥ १७ ॥

खूप समज तूं इंद्रा अमुच्या पळविलेंस हृदया।
धुळीस मिळवूं सारा स्वर्गहि खासचि करितां या ॥ १८ ॥

— 'श्रीमंगलमूर्ति', कुरुंदवाड

'जय लोकमान्य' या पुस्तिकेंतून 'नमुना'

---

# तिलक-स्मृति

बीजारोपण केलें तिलकें स्वदेशभक्तीचें।
स्वोदाहरणें ध्येय दाविलें स्वावलंबनाचें ॥ १ ॥

"राष्ट्रसेवनीं तन मन धन निज वेंचावें लागे।
राष्ट्रभक्त तो कैसा असतो, कसा काय वागे ॥ २ ॥

विपत्प्रसंगीं धैर्य धरावें, प्रभुवरि विश्वास।
ठेवोनी कर्तव्य करावें, सोसावा त्रास ॥ ३ ॥

कर्म सर्व निष्काम करावें, नको फलासक्ति।
यशप्राप्तिची गुरुकिल्ली ही सर्वांना कथति ॥ ४ ॥

अशा प्रकारें निज चारित्र्यें स्वजना बोधियलें।
अधःपतित निज देशबांधवा जागृतची केलें ॥ ५ ॥

लोकमान्य सोडुनिया गेले नश्वर देहाला।
वर्षें झालीं दहा आज त्या दुःखद दिवसाला ॥ ६ ॥

लोकमान्य जो दावुनि गेले पथ तो अनुसरणें।
योग्य देशसेवनांत जीवन-व्यय आम्हां करणें ॥ ७ ॥

— श्री. बलवन्तकुसुम

# अवतरो पुनः

( चाल – बहु असोत सुंदर संपन्न० )

प्रभुचरणीं हिंदराष्ट्र करित प्रार्थना ।
लोकमान्य बाल तिलक अवतरो पुनः ॥ ध्रु० ॥

नौकेचा कर्णधार जाय सोडुनी ।
केविं तरे नौका ही वादळांतुनी ? ॥

संकटिं तव आठवते कार्यकुशलता ।
शत्रु-डाव हाणुनि जी मिळवि सफलता ॥

देवो तव मूर्ति अम्हां स्फूर्ति-चेतना ।
लोकमान्य बाल-तिलक अवतरो पुनः ॥ १ ॥

* * *

सुरतेची धीर मूर्ति नेत्रिं संचरे ।
नवभारत मुग्ध होय, तेज नभिं भरे ॥

न्यायालयिं सिंहनाद दिव्य ऐकुनी ।
पुलकित जन, न्यायमूर्ति जाय चमकुनी ॥

दावाया मार्ग नवा राष्ट्रमोचना ।
लोकमान्य बाल तिलक अवतरो पुनः ॥ २ ॥

'केसरी' — सौ. विजया जोशी

# स्वागतपर पद्य

[ १९१७ सालीं 'वऱ्हाडच्या दौऱ्यावर टिळक असतांना यवतमाळ येथें त्यांना मानपत्र देतेवेळीं म्हणण्यांत आलेलीं स्वागतपर पद्यें. ]

( चाल – पंचशरें गयवरं० )

सुस्वागत अर्पण हो तिलक मुनिवरा।
उग्रतपें आश्वासिनि ही वसुंधरा ॥ ध्रु० ॥

दीन वदनकष्टनता। जाणुनि ही हिंदसुता।
होसि प्रभो अवतरता। जगतिं नरवरा ॥ १ ॥

'होमरूल' दिव्य ध्येय। अभिनव धरिलें चिन्मय।
"याच देहिं सिद्ध होय'। बोल हा खरा ॥ २ ॥

लोकमान्यांची स्वराज्याची पहिली मोहीम या अंकांतून

---

## स्वागत

( चाल : दे ऽ हा ऽ ऽ ता० )

दीर्घायूऽदेऽलोकनायका।
जनहित निज धृतव्रता ॥ अनुसरता,
सुतनुलता, जयाची क्रांताऽदेऽऽलोकनायका ॥ ध्रु० ॥

संपूर्ण तपचि झालें। फलश्रुति मात्र उरलें ॥
सुफल कां विलंबविलें। करि झडकरी पूर्तता।
प्रभू आतां, भगवंता, देउनीया स्वराज्याऽ या लोकनायका ॥

## स्वागत

( चाल : नमन नटवरा )

नमन मुनिवरा रहस्यकारा ।
कर्मयोगिया जगतोद्धारा ॥ ध्रु० ॥

अवनत बघुनी देश आपुला ।
उद्धाराया जगिं अवतरला ॥
हिंद भालवृत तिलक शोभला ।
सुस्वागत त्या नरवीरवरा ॥ १ ॥

जनहित व्रत खडतर आचरिलें ।
तत् सिद्धिस्तव कष्ट सोशिले ॥
अंतीं कारागृहहि सेविलें ।
गणुनि तुच्छ मनिं सर्व पसारा ॥ २ ॥

कारागृहही लोक हितास्तव ।
शांति न दे निज चित्तानें लव ॥
गीतामृत मंथुनि अभिनव ।
अर्पि जनकरीं रहस्य तारा ॥ ३ ॥

—आ. क. ऋषी

---

## लोकमान्या भजा

( चाल – भवतारक या तुझ्या पादुका० )

लोकमान्य हें नाव ठेविलें अमान्य नच कोणा । लोकां पटल्या अंतरखुणा
कमाल केली देशभक्तिची अति चतुराईनें । कशी ती वर्णावी कविनें

माना म्हणतां नको बळें तो आलिंगन देई । मानि निज मान टिळकपाई
न्यास करिति ते कर्मफलांचा म्हणुनि संन्यासि । न्यायें कां न म्हणूं त्यासी
भजती अद्वैताच्या मार्गा द्वैत भाव नाहीं । भयाचें नाहिं काम कांहीं
जागवुनी आर्यावर्तानें आर्यतिलक झाले । जाणत्या जगाहि दिपवीले

– 'श्रीहरियंत्र' धुंडिराज कृष्ण अष्टेवाले, उज्जयिनी

'केसरी' १९३५

---

# केसरी पत्राचे जनक नरकेसरी

( आर्यागीति )

केलें स्वराज्य शूरें शिवनेरीं दुर्गीं सत्य जन्मून
सद्भाव तोच होता श्रीटिळकांनाहि त्या मनांतून ॥ १ ॥

री ओढिली जयानें स्वातंत्र्याचीच आयु खपवून
परदास्यशृंखलांना 'तोडा तोडा' वदे मुखांतून ॥ २ ॥

त्रागा कधीं न केला सेवाया देवधर्म राष्ट्राचा
चेला जगतीं झाला शिवबासम तरि समर्थ हो गुरुचा ॥ ३ ॥

जन्मुनि सार्थक केलें स्वराज्य रिपुचें निशाण रोंवून
नमवी आंग्लनृपवरा कर्तव्याचा दिमाख ठेवून ॥ ४ ॥

करि कर्मयोग आपण पूर्णत्वें मग भवांत राहून
नरकेसरी पदाला चढला गीतारहस्य दावून ॥ ५ ॥

रविपरि तळपें भूवरि होता जेव्हां स्वयंप्रकाशानें
केळकरांना दिधली सिंहाची ढाल साच प्रेमानें ॥ ६ ॥

सन्मान नित्य देऊं परम अशा पूज्य लोकमान्यांस ......
रीती हृदयीं ठेवूं एक अहा बाळ देत आम्हांस ॥ ७ ॥

— 'गणेशतनय', चिं. ग. देशपांडे, चाळीसगांव

"केसरी" १९३७.

---

## लोकमान्यांचा दिव्य संदेश

(आर्या)

लोकीं इह परलोकीं निजतेजें गाजला असामान्य —
कवण असा मान्य जगीं ? तिलकाविण दाखवाल कां अन्य ? ॥ १ ॥

मान अभंग मिळेना मानासाठीं दिल्याविना मान
न्याय असा मानाचा, तिलकाविण दाखवी जगा कोण ? ॥ २ ॥

चालविलें तिलकानें मंडाल्याच्या मठांत घोर तप
दिव्य अशा गीतेचा केला तेथें अगण्य नित्य जप ॥ ३ ॥

व्यग्र मना सांवरुनी, लिहिलें गीतारहस्य बंदींत
संदेह दूर करुनी, दाखविला कर्म-धर्म-मर्म-पथ ॥ ४ ॥

देशविदेश हलविला तिलकानें आपुल्या प्रतापानें
शतशतकें तरि पुढलीं अखंड गातील यत्कथागानें ॥ ५ ॥

ध्यानीं-मनिं-स्वप्नींही भारत-हित नित असें स्वकर्मरत
नीति, नियम, धर्मादिक तिलकांचीं एकमेव देशहित ॥ ६ ॥

धरिला ध्यास अखंडित, 'स्वराज्य हा जन्मसिद्ध हक्क मम'
राहो अमुच्या ध्यानीं तिलकांचें ब्रीदवाक्य दिव्यतम ॥ ७ ॥

— कृष्णमूर्ति, कविरत्न

# मान्यवर गुरु लोकमान्य टिळक-पुण्यस्मरण

लोकमान्य तिलका ये बाला
भारता विरह जाणवला ॥ ध्रु० ॥

मार्ग दाखविल अचुक जनाला
कर्णधार कुणी आम्हां नुरला
वालिल आला पुच्छ-प्रगतिला
राजकीय डाव सगळा फुजला ॥ १ ॥

दूर धोरणें राजकारणी
कार्यकुशलता प्रकट करोनी
पर सत्तेशीं झुंज खेळुनी
स्वराज्यपथ स्वजना दाखविला ॥ २ ॥

तव मार्गानें जनता जाइल
स्वातंत्र्याचा पल्ला गाठिल
समाज जागा केव्हां होइल
अंधार घोर सर्व पसरला ॥ ३ ॥

पुण्यप्रद तव स्मरण अम्हांला
देत उठावणी कर्तव्याला
शपथ घेतसों स्मरुनि पदाला
कधिं नच विसरू मायभूमिला ॥ ४ ॥

— रा. वा. दाते

'दीपावलि प्रकाशन' : य. गो. जोशी

# टिळक-कवच

राष्ट्रमुकुट झळकतो । कोहिनूर चमकतो ।
प्रकाशसूर्य प्रकटतो । तिमिर दूर लोटितो ।
स्फूर्ति वायु वाहतो । कुंद हवा पळवितो ।
कर्मयोग शिकविला । आम्रवृक्ष लाविला ।
राजशास्त्र पढविलें । राजदंड कळविले ।
मायभूमिची दशा । मीन तळमळे जसा ।
अहोरात्र झगडला । राजदंड भोगिला ।
स्वराज्य भोगणें मला । जन्म हक्क लाधला ।

* * *

सार्थ नांव केसरी । वीर गर्जना करी !
राष्ट्रतारूं वल्हविलें । वादळीं बचाविलें ।
राजक्षोभ जाहला । त्यांत मार्ग काढिला ।
संकटें बहू जरी । हीच परीक्षा खरी ।
कसोटिला टिकाल रे । पहाल स्वराज्यभानु रे ।

* * *

बाळ टिळक विठ्ठला । अवतार संपला ।
स्वराज्य मंदिरांतला । बाळकृष्ण चालला ।
बेलपुष्प राहिलें । स्वराज्यकार्य ठेविलें ।
टिळकगूण गाइले । काव्यसिंधु आटले ।
काव्यछंद लागला । एक बिंदु लाधला ।
अज्ञ राम लेंकरूं । काय काव्य मी करूं ।
चार वेडेवांकुडे । असति मांडिले खडे ।
स्वराज्यकार्य चालवा । हेंच गणित सोडवा ।

स्वावलंबना शिका । टिळकबोध आयका ।
टिळक टिळक विठ्ठला । राम शरण ये तुला ।

— रा. वा. दाते

'तिलकशोकगीतां'तून — निवडक

---

## लोकमान्यांच्या पुतळ्यावरील पद

( चाल — परतंत्र भारतासि० )

रुसलासि काय बाळा येथें असा उभा कां ॥ ध्रु० ॥

तुज बोलिलें कां कोण । वरिलेंसि कां हें मौन ।
मशि बोल शब्द दोन ॥ १ ॥

अपराध तव मी केला । राग कां म्हणोनी आला ।
चल लाडक्या गृहाला ॥ २ ॥

चुकली जरी निज माय । कोपे तरी ना तनय ।
लागे मनासि हाय ॥ ३ ॥

झालें जिवाचें रान । रोखूं नको ते नयन ।
घुसती उरांत बाण ॥ ४ ॥

प्रिय केसरी तव लाडका । बघ मारितो तुज हांका ।
नुरली मनीं कृपा कां ॥ ५ ॥

गेले शिवाजी बाजी । फडणीस नाना गाजी ।
आधार तूंचि आजी ॥ ६ ॥

मी पुण्य-नगरी दीन । झालें सख्या तुजवीण
व्याकूळ होइ प्राण ॥ ७ ॥

हीं घोर संकटवेळा । योग्य कां रुसाया बाळा ।
पुसि आपुल्या मनाला ॥ ८ ॥

टिकला प्रसंगीं तात्या । अणुही न ढळला सत्या ।
चल धीर द्यावया त्या ॥ ९ ॥

गाईन गाणीं गोड । पुरवीन सगळें कोड
चल गेहिं राग सोड ॥ १० ॥

— क. पु. डोंगरे, पुणें

' छत्रपतीच्या छायेंतून '

---

# लोकमान्यांची आरती

जयदेव जयदेव जय श्रीबलवंता ।
अगणित तव महिमा हा निरुपम वर्णितां ॥

अनुपम लेखन बुद्धी मेरू धैर्याचा ।
शोधक प्रेरक चालक नेता जनतेचा ॥

कट्टा स्वदेशसेवक इहपरकीर्तीचा ।
फडके झेंडा तोची पुतळा दैवाचा ॥ जय० ॥

नानापरिचीं दुःखें सोसुनियां सारीं ।
केली सेवा भूची काय वदूं थोरी ॥

स्वराज्य हा मम हक्कचि गर्जत केसरी ।
गोरखसंमत मत की निधडा कैवारी ॥

गंगाधरसुत मंगलमूर्ती देहाची ।
रक्षा उरे न साक्षी लोकप्रेमाची ॥

अवतारीं चालेना शंका तर्कांची ।
नर होतो नारायण प्रचिती हे साची ॥ जय० ॥

'गोग्रास'मध्यें प्रकाशित

---

# लोकमान्य टिळकांची आरती

सागरतीरीं सुंदर रत्नागिरि नगरी ..
जन्मुनि धन्या केली जननीजनक खरी ॥

समर सुरासुर करिती मंथिति सागर तो
उज्ज्वल दीप्तिमणी हा बाल मला गमतो
जय देव जय देव जय टिळकाराया हो । श्रीटिळकराया ।
या या अनन्यशरणा आर्या ताराया ॥ जय० ॥

शीलाचा महिमा तूं भूषण वीरांचें
विद्वत्ता तुज पाहुनि आनंदें नाचे
कारावास भयप्रद सुजना तुज घडला
देशस्वातंत्र्यास्तव त्वां तो साहियला ॥ जय० ॥

अवतरला शिवगुरु तो पुनरपि मज वाटे
शिकवी सकल जनांतें स्वराज्य हे सुमते
अस्तंगत होतां तूं विकल होय जनता
घे घे तिज ताराया अवतारा संता ॥ जय० ॥

— काव्यतीर्थ का. र. वैशंपायन, येवलें

'भारतभूषण मेळा पद्यावलि', येवलें

# कवितांचीं प्रथम चरणें

## ( संस्कृत विभाग )


| | |
|---|---|
| कति वा न भवंति भूतले | ३ |
| अहर्निशं भारतभूजनानां | ४ |
| गत्वा यः श्रुतिशब्दशास्त्रजलधेरंतं तलं प्राप्य च | ५ |
| न्यायासनेन निर्णीतम् | ६ |
| लोकः स्वीयः स्वदेशोऽयं स्वराज्यं संसदा युतम् | ७ |
| भो आर्यदेश गतमद्य न किं त्वदीयं | ७ |
| वेदार्थविच्छास्त्ररहस्यवेत्ता | ८ |
| टिळकनामसमुच्चरणं मुदे | १० |
| सर्वत्र क्रमते निसर्गनिपुणा धीर्यस्य सर्वंकषा | १२ |
| यतते विगणय्य संकटान् | १२ |
| इयं भगवदर्चना कृशजनो यदभ्यर्थितो | १३ |
| टिळकस्मरणादेव | १४ |
| लोकाग्रणीर्निखिलबुद्धिमतां वरिष्ठो | १५ |
| अस्मिन्नरा न कति वा जगति श्ववृत्त्या | १६ |
| यदांग्लजनसंस्कृतिप्रसरणाद्वयं मोहिताः | १७ |
| सकलभारतदेशनिवासिनः | १८ |
| ऐतिह्यके रत्नपुरे सुपुण्ये | १९ |
| लोकावतंसीभूतेषु तेष्वभिप्रणता वयं | २० |
| गीतारहस्यकथनेन च कर्मयोगं | २१ |
| मुमो च राष्ट्रं यवनाक्रमात् शिव- | २१ |
| समाप्यविद्याध्ययनं यथाक्रमं | २३ |
| ननाम पार्वती सूयं | २६ |

| | |
|---|---|
| निर्यातस्य दिवं शरत्समभवद्यस्य स्वराज्यात्मनो | २७ |
| लोकानां हृदये वसन्नपि पुनः को भाषते त्वं मृतः | २८ |
| धर्मचिंतनपरं हि जीवनं | २९ |
| पुराऽभूद्वाल्मीकिः कविषु गणनीयादिविबुधः- | ३० |
| षष्ठ्यामाषाढकृष्णे गजनगनगभूसंमितेऽब्दे हि जातो | ३१ |
| विभाव्यते यो मनसापि लोकै- | ३२ |
| हे राष्ट्रदेवि ! विफलं तव भागधेयं | ३३ |
| येन स्वबुद्धिबलतोऽखिलपंडितानां | ३४ |
| तिलकं तिलकाचार्यं | ३५ |
| यश्चोपनाम्ना टिळको भूदेव्यास्तिलकायितः | ३६ |
| श्रीमद्भगवद्गीताव्याख्यातिलको व्यधायि तिलकेन | ३७ |
| यः पारतंत्र्यप्रतिमोचनाय | ३७ |
| अनुपमसुखहेतुं निःस्पृहैणैकगम्यं | ३८ |
| लोभो नासीदणुरपि कदा ते तु कस्यापि लोके | ४१ |
| बालोभूत्वा ध्रुव इव यशोदेहमासाद्य लोके | ४३ |
| यावद्धर्मावलंबीस्यात्तावद्देवो नरेश्वरः | ४४ |


## ( मराठी विभाग )


| | |
|---|---|
| जय जय टिळका अपरसमर्था धीरा धीभास्करा | ४७ |
| अनंत तुज प्रणिपात दयाळा सुजन सुमंगल करा | ५२ |
| लाजविलेंस निजयशें धवलें त्वां सत्य हिमनगा तिलका | ५३ |
| स्वागतानति भवच्चरणांसी | ५४ |
| अहो दशदिशा अशा वरिति कां उदासीनता | ५६ |
| सौभाग्य हिंदभूमीचें राखा राखा आर्यांनो | ६० |
| तो केसरी गवसला अजि सांपळ्यांत | ६० |
| झालें सतीचेंच वाण | ६२ |

मी साहिन हाल सुखानें ६३
अमुचा वसंत कोणी नेला ६४
अद्भुतरम्य असें कारंजें ६६
ज्यानें स्वता शिव खरोखर ओळखीला ६७
पुण्यपुरीरत्न कुठें राष्ट्राचा रामदास तो कोठें ६८
राष्ट्र-प्रेम-लता हृदीं रुजविली, ती भारता भूषवी ७०
सुटले टिळक अशी ही शुभवार्ता परिसिली जधीं कानीं ७१
चिरायु लाभो बाल तिलका ७२
हें दुःख कसें मी साहूं ७२
कोठें जाशी राष्ट्रप्राणा ७६
हा हाय कसा सूर्य आज मावळला ७७
जनमान्य परम गुणवंत ७९
नमन नटवरा रहस्यकारा ८०
पद अढळ लोकमान्यांतें ८१
कसा झाला सर्वांवरि तरि असा निष्ठुर विधी ८२
कसे कोपले प्रभु करुणाधन महाराष्ट्र भूवरी ? ८३
श्रीमंता बलवंता जनमान्यवरा नरोत्तमा टिळका ८५
गेला पुण्यपुरीचा तिलक नव्हे हाय अखिल वसुधेचा ८६
मृत्युच्छाया पडुनि दिसते भूमि ही आज दीना ८७
म्होटा घात देशाचा या झाला र लोकमान्य हिरा हरपला ८८
प्राणाहूनि प्रियतर असा जाहलेला जनाला ८९
अदय हृदय काळें रत्न चोरूनि नेलें ९०
हत दैवारे बाळ कसा मम नेला ९१
प्रक्षोभाचा जनक अमुच्या आर्यभूबालकांचा ९२
स्वातंत्र्याच्या सौभाग्याचा दिनमणि मावळला ९४
केलें तूंचि बा सजीव ९६

राष्ट्रप्रेमद्युति जनमनीं कोण देशाभिमानी ९७
झालें काय कसें अकल्पित अहा ! हें आज हो ना कळे ९९
ती भीषण विद्युद्वार्ता १०३
विधेची तिलका ! सदा तुजवरी होती कृपा जी महा १०५
होता जो कर्मयोगी निशिदिनिं झटला देशकार्यें कराया १०६
आषाढ कृष्ण दिन हा पहिला उदेला १०७
करी ऋद्धिसिद्धीं महातैलबुद्धी १०८
लोकमान्य, देव-मान्य, मानवांत एकला ११०
रत्नागिरीच्या शिखरीं उदेला १११
स्वकार्य-निष्ठा उपकारि वृत्ति १११
स्वातंत्र्याचा प्रथम दिधला मंत्र तूं आर्यभूला ११२
तव स्मरण विस्मरे जन असा जगीं ना दिसे ११३
खरा तत्त्ववेत्ता खरा त्यागकर्ता ११४
आमरण देशसेवाव्रत ज्यानें पाळिलें असामान्य ११५
ज्यातें देउनि जन्म सार्थ नगरी ती होय रत्नागिरी ११६
जयें कर्मयोगा जना शीकवीलें ११७
शृंगारोनी कळस चढला रत्नसिंहासनाचा ११८
" आंग्ललोक देवदूत भरतांत पातले ११९
दुःखदवार्ता परिसुनि निधनाची लोकमान्य टिळकांची १२०
निज केसरी, मराठा, पत्रें विख्यात जागृतीसाठीं १२१
कालें डोळा चुकवुनि पहा चोरिलें बालरत्न १२३
नसे पाहिली मूर्ति डोळां तुझी वा न तें ऐकिलें थोर वक्तृत्वही १२४
राष्ट्रभक्ति निजकार्य हें पुढें १२४
जन्मा येऊनीयां जगीं केली ख्याती १२६
हिंदी जनहो ! बलवंताच्या स्वराज्यमंत्रा विसरूं नका १२७
स्वराज्याला ज्यानें प्रथम दिधला जन्म हृदयीं १२८

जो धीर मेरुगिरिसा नर धैर्यशाली
जो राजकारणरणीं चतुरस्र योद्धा
त्रिखंडपंडित बुद्धी तीक्ष्ण फार
मूर्ती धीर गभीर यद्यपि तुझी डोळ्यांपुढें नाचते
जया देशसेवेविना काम नाहीं १
ह्या पुण्यपत्तनीं बहु असती विद्वांस थोर थोर भले १३
सुपुण्य होतें बहु पूर्वसंचित १३
आर्या ! तुझी विमल कीर्ति कितीक गाऊं १३५
पुण्यश्लोक नरावलींत पहिला जो भारतीं जाहला १३६
करी अन्वर्था जो निजवसतिनें पुण्यनगरी १३६
अतिप्रिय जसा असे तिलक चंदनाचा जनां १३७
कां मान्यवर तिलक विलोपसि कां ! १३८
लोभाचा लवलेश ठेवि न कधीं कार्यी धरी निश्चया १३९
वित्तलाभ करण्या बहु शक्त १४०
राष्ट्रासाठीं खडतर असा साहिला बंदिवास १४०
पूर्वींचे कर्मयोगी जनकविदुरही द्रोणभीष्मादि योद्धे १४१
शुचिष्मान् तुझें नांव ठावें न ज्याला १४२
स्वयें मोठे गंगाधरतनय ते बाळ टिळक १४४
लोकीं असे मान्य नेता असामान्य झाला जगीं धन्य १४५
देशा पूर्ण स्मृती तशीच विभुती लोकोत्तरा होय ती १४५
मेरूंत पहिला हिमाद्री वरिष्ठ १४६
तव स्मरण संतत स्फुरणदायि आम्हां वडो १४६
गेला गेला राष्ट्रमार्तंड गेला १४७
बा सोशिला घाव तुवां घणाचा १४७
शोकावर्तांत लोकां ढकलुनि सहसा स्वर्गलोकांत जाशी १४७
१४८
राजराजेश्वरा हो दयाळा

झुळुक वायुची वाहुनि जातें लपते गगनोदरीं १५०

वर्तमान ज्यातें नित्य स्मरे १५०

लोकमान्यभक्ती भारतीं खेळें १५१

निजदेश विमोचनिं बाहू ज्याचे स्फुरले १५३

वंदन हें तिलकराज ! भक्तिप्रेमभावें १५४

लोकमान्या ! हिंदभूसंजीवना ! १५५

आज तुजवांचुनी शून्य साऱ्या दिशा १५५

पारतंत्र्य वनघोर तमोमय भारतभू झाली १५६

पुनः माउली गे तुझ्या बाहुपाशीं ! १५७

स्तवावी कशी मानवी भावनांनीं १५८

पुण्यतिथीच्या पुण्यस्मरणीं गान तुझें गावें १५९

समरीं संगर खेळुनि दमले या पुढतीं हात १६०

स्वार्थावरी लाथ देवावरी चित्त धर्मावरी भिस्त न्यायीं रती १६१

स्मरण करूं आज तया गुरुचें १६२

वेधज्ञ आणि गणितज्ञ १६२

स्मृतिसुमनें पदयुगुलीं वाहतों तुझ्या हीं १६३

लोकमान्य राष्ट्रपुरुष धन्य भारतीं १६४

गेला गेला भरतभूमिचा टिळक बाळ गेला १६५

देवास वाहि काया १६७

वंदन बलवंता ! बलवंता ! स्वातंत्र्यदेविच्या १६८

हिंदभूमिचा सुपुत्र झाला बालतिलक हा खरा १६९

जयजय जनतेशा १६९

लोकमान्य टिळक अम्हीं नमित तव पदा १७०

उठवुं वीरभूषण टिळका ! करुनि वंदना १७१

चला गाऊं या मंगलगीतें लोकमान्य नरवरा १७२

हिंदभूमिपुत्र बाल तिलक धन्य हा १७३

न्याय हा मम मना मान्य नाहीं १७४
या टिळकानें हिंदभूमि नटवावी १७४
त्वां देशकार्य जें केलें १७५
कारागृहीं भोग भोगावया सज्ज १७७
भारतास भूषण झाला १७८
भारतभूला ललाम झाला बाळ टिळक हा भला १७९
आजि स्मरण करूं या लोकमान्य टिळकांचें १८०
नरतनु जन्मुनि पुरुष भला १८२
हिंदवीरा नमन, तिलक बाला, तुला १८३
रत्नपुरीनें राष्ट्रा केलें टिळकरत्न अर्पण १८३
महाराष्ट्र जननिच्या गळ्यांतील ताइत जो शोभला १८५
प्रणाम तुजला नरशार्दूला महाराष्ट्र-टिळका १८६
उठा बंधुनो, धरा जागृती, जयजयकार करा १८७
लोकमान्या घे प्रणामा ! हिंदभूच्या भूषणा १८८
लोकमान्य तारा कैंवी लुप्त आज झाला १८९
लोकमान्य बालतिलक वंद्य भूतला १९०
मशीं बोल एकदां बोल १९०
अर्पुनि अंजलि शब्दसुमांची पवित्र चरणांवरी १९३
देशसेवा करी त्या मान्यता मिळे १९४
वाहो तव सुगुणकीर्ति सुमनसौरभा १९४
तुरुंगांत डांबलें टिळकाला १९५
वनिं विहरे व्याघ्र परि तो वनराजा होईना १९६
टिळकपणाचा विशेष म्हणजे स्वाभिमान होता १९७
प्रणामोऽस्तुते श्रीशिवनृपते धीमन् छत्रपते १९८
हिंद देविच्या उज्ज्वलपुत्रा ! जनतेच्या देवा ! २००
बीजारोपण केलें तितकें स्वदेशभक्तीचें २०२

प्रभुचरणीं हिंदराष्ट्र करित प्रार्थना २०३
सुस्वागत अर्पण हो तिलक मुनिवरा २०४
दीर्घायुऽदेऽलोकनायका २०४
नमन मुनिवरा रहस्यकारा २०५
लोकमान्य हें नांव ठेविलें अमान्य नच कोणा २०५
केलें स्वराज्य शूरें शिवनेरीं दुर्गीं सत्य जन्मून २०६
लोकीं इह परलोकीं निजतेजें गाजला असामान्य — २०७
लोकमान्य तिलका ये बाला २०८
राष्ट्रमुकुट झळकता २०९
रुसलासि काय बाळा येथें असा उभा कां ? २१०
जयदेव जयदेव जयश्री बलवंता २११
सागरतीरीं सुंदर रत्नागिरि नगरीं २१२

परिशिष्ट दुसरें

# कवींचीं टिळकविषयक सुवचनें

## ( संस्कृत विभाग )

जनमंगलबद्धकंकणा । करयोर्नृत्यति लेखनी ययोः — विद्यावाचस्पति राशिवडेकर

राष्ट्रव्याधिहरं भिषग्वरमणिंविद्यावतां शेखरं (टिळक) — लोकनायक अणे

अनागाः परिपूर्णोऽहमिति मे निश्चिता मतिः — काव्यतीर्थ का. र. वैशंपायन

यो लोकसौख्यकरणे मनुते नितांतम् – आत्मारामशास्त्री ओडलमने

❖ ❖ ❖

धनपरा न पराक्रमशीलता ( तिलकस्य ) – काव्यतीर्थ का. र. वैशंपायन

❖ ❖ ❖

भरतोद्धरणाय केवलं । निजमायुः क्षपितं किलामुना – बागेवाडीकर शास्त्री

❖ ❖ ❖

निर्भयत्वं निसर्गाद्धि । लोकमान्यस्य विश्रुतम् – काव्यतीर्थ का. र. वैशंपायन

❖ ❖ ❖

टिळको युगदीपकः – काव्यतीर्थ का. र. वैशंपायन

❖ ❖ ❖

आहोपुरुषिका तस्य । स्वदेशस्यैव गौरवः – काव्यतीर्थ का. र. वैशंपायन

❖ ❖ ❖

यस्यात्मा निजभूस्वराज्यकुसुमे विद्धैकदृक् सर्वदा – आत्मारामशास्त्री ओडलमने

❖ ❖ ❖

गंगोदकेन सदृशं विमलं चरित्रम् – वि. र. रिसबूड

❖ ❖ ❖

निर्भीकत्वमुदारता च भुवने लोकादरं त्वाऽनयत् – पं. करमळकरशास्त्री

❖ ❖ ❖

न हि विच्छेदने धर्मः । ऐक्ये धर्मः प्रतिष्ठितः – टिळकसूत्रम्

## ( मराठी विभाग )

[ ‘ काव्यमय टिळक ’ या काव्यसंग्रहांत ज्या कवींच्या कविता आल्या आहेत, त्यांतून विशेष आकर्षक तेवढींच वचनें येथें एकत्रित केलीं आहेत. ]

तुझे पवाडे गातिल पुढती तोफांचे चौघडे – गोविंद

❖ ❖ ❖

विद्वत्तेच्या अंकावरती देशभक्ति खेळते टिळक ही — गोविंद

देशमंगलासाठीं भोगिलें त्वां वा कारागार — गोविंद

दुःसह छल सोसावा लागे या आर्यभालतिलकाला — स्वा. वी. सावरकर

चरित्रपरिशीलनें तव नुरेल देशापदा — द. भि. रणदिवे

स्वतंत्रतेचें रामायण जो नित्य कथी विश्वाला — गोविंद

स्वार्थच्छेदक नरहरि असत्यनाशक सुवीर तो कोठें — कृ. रा. संत

वीर धुरंधुर सर्वशक्तिचा — 'चंद्रचूड'

परवशता शल्यचि वाटे । तुझ्या हृदयाला — का. रा. धर्माधिकारी

स्वातंत्र्याचा उद्गाता हा अखेर पडला रणीं — ग. त्र्यं. माडखोलकर

देशासाठीं तिलकसखया काय केलेंस नाहीं ? — ज. र. अजगांवकर

पुण्यपुरीच्या कंठस्थलिंचा लाल गळुनि पडला — शामराव जोशी

तिलकसम झिजावें देशकार्यीं जनांनीं — पु. वा. जोशी

राष्ट्रैक्याची रुजविलि तुवां भावना चित्तहारी — गो. पां. देवधर

ऐश्वर्यांतहि थोर सज्जन कधीं सच्छील सोडीचना — कै. दु. आ. तिवारी

नका शोधुं अन्या भजा लोकमान्या — महाराष्ट्र भाषा चित्रमयूर आठल्ये

कृतीनें फिके पाडि गौरप्रमेया — लक्ष्मणशास्त्री चंद्रात्रेय

जया भीति भ्याली दिशांतीं पळाली — हसूरकर

आमरण देशसेवाव्रत टिळकें पाळिलें असामान्य — पलुस्करशास्त्री

कशाही न जो संकटा लेश भ्याला — श्रीकृष्ण

झोंपतात जन हाच जागतो चिंतनांत रजनीस कंठितो — कै. दु. आ. तिवारी

अभिनव अर्जुन नवा शिवाजी नव्या युगाचा जगद्गुरु — त्रा. ग. लेले

जो राजकारणरणीं चतुरस्र योद्धा — रघुकुमार

निःस्वार्थ प्रेमानें वश जेणें केलि ही पहा धरणी — ह. भ. प. पांगारकर

भ्यालास ना तिळभरी खलसंकटांतें — विवेक

घडावें आम्हां त्या स्मरण तिलकांचें अनुदिन — मुकुंदराय

परार्थ झिजतो स्वतां झिजविना परां थोर तो — पंत पराडकर

नरकेसरिसह विभव लोपलें — 'चंद्र'

पावित्र्यानें गुरुपद जया प्राप्त झालें जगांत — ल. ग. वझे

तुझा मंत्र राष्ट्रास संजीवन — मरंद

सार्वभौम भूपाल परी तूं जनादराचा असे — स्वातंत्र्यकवि गोविंद

जनतेचा तो प्रचंड सागर - कहर करी उसळतांच क्षणभर — अज्ञातवासी

लाथ हाणोनियां हो सुखाला — कष्टवीलें सदा कीं जिवाला — भा. रा. तांबे

स्वराज्यध्येयाचा नंदादीप तो। राष्ट्राच्या मंदिरीं आज तेवतो — वि. प. भागवत

निजदेशालागीं सुखत्याग सुख झालें — काव्यतीर्थ का. र. वैशंपायन

राष्ट्रप्रेम संजीवनि देह आत्मभावें — प्रा. अडोणी

जनमनसाक्षी हा दीर्घाक्षी लोकमान्य गेला — वसंतमित्र

संसार निःसार मानूनि धिःकार तूं त्यागिलें मोहपाशास या — अंदूरकर

शीलाचा महिमा तूं भूषण वीरांचें — काव्यतीर्थ का. र. वैशंपायन.

REFBK-0006912

REFBK-0006912